||श्री||

हरिभक्त परायण संतकवि श्री श्रीराम महाराज कृत अथ

# || श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ ||

(पारायण प्रत)



- ग्रंथाचे नावः **।। श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ ।।** (पारायण प्रत)
- ग्रंथलेखनः **ह.भ.प. संतकवि श्री श्रीराम महाराज अंबादास**
  रा. इंच, ता. जि. हिंगोली. (महाराष्ट्र)
- संकलनकर्ताः **प्रा. डॉ. उमा विद्याधर धमाने**
  रा. बरबडी, ता. जि. वर्धा – ४४२ ००१ (महाराष्ट्र)
- प्रकाशकः **डॉ. धीरज हनुमानसिंग नागोरे**
  © **डॉ. गायत्री धीरज नागोरे**
  पुणे – ४११ ०२७ (महाराष्ट्र)
- प्रथम आवृत्तीः **१० जानेवारी २०२०** (पौष शुद्ध १५, शके १९४१)
- अक्षरजुळणीः **जयभारत कॉम्प्युटर्स,** वर्धा
- मुखपृष्ठ व सेटींगः **मनकर्णिका पब्लिकेशन,** चिंचवड, पुणे– ४११ ०३३.
- मुद्रणस्थानः **भाग्यश्री प्रिंटर्स,** संगमवाडी, पुणे– ४११ ००३.
- सेवा शुल्क : **५१/–** (एकावन्न रुपये मात्र)



समाधी मंदिरातील श्री परमहंस रामकृष्ण मौनीबाबांची जाज्वल मूर्ती

।।श्री।।

# ।। प्रस्तावना ।।

## ।। ॐ नमो मौनीबाबा ।।

साधारण ११४ वर्षांपूर्वी परमहंस रामकृष्ण मौनीबाबा हे या भूतलावर अवतीर्ण झाले. त्यांचे चरित्र सर्व दृष्टीने अलौकिक आणि पावन आहे. श्री दत्तप्रभूच्या कृपेने त्यांनी केलेले चमत्कार आम्ही भक्तांनी अनुभवले आहे. बाबा नेहमी म्हणायचे माणसाचे कर्मानुसार त्याचे संचित व संचितानुसार त्याचे जीवनमान ठरते व घडते. ते मोजक्या शब्दांत नेहमी संदेश द्यायचे, ''ज्याचे त्याला.'' बाबांच्या हृदयात आत्मज्ञान आणि सत्य ही सूर्यप्रकाशासारखी प्रकाशमान होती. त्यामुळेच ते खरेखुरे संत होते. परमपुज्य बाबांनी आषाढ शुद्ध पौर्णिमा 'गुरूपुजा' ता. ५ जुलै १९९० या दिवशी देहाचा त्याग करून स्वतःला अनंत ब्रह्मात विलीन करून घेतले. संत नामदेवांच्या शब्दात सांगायचे म्हणजे ''गेले दिगंबर ईश्वर विभूति। राहिल्या त्या कीर्ती जगामाजी।।'' श्री संत मौनीबाबा यांचा कृपाप्रसाद, मौनीबाबा देहांत असतानाच ''मौनीबाबा जीवनामृत ग्रंथा''च्या रूपाने तयार झाला आहे. सामान्य माणसाना संतचरित्रात जो रस असतो तो त्यांचे कार्य, त्यांच्या जीवनातील बोधप्रद प्रसंग, त्यांचे वाङ्मय व त्यांचे चमत्कार यांच्यात असतो.

आज आमच्या मौनीबाबा संस्थानमधील विश्वस्त मंडळास अत्यंत आनंद होतो की, भगवान मौनीबाबा यांचे चरित्र आणि साक्षात्कार व चमत्कार समाविष्ट असलेल्या मौनीबाबा जीवनामृत ग्रंथाचे

(लेखक– श्रीराम महाराज रा. इंच) छोटे स्वरूप प्रा. डॉ. उमा धमाने रा. बरबडी, वर्धा यांनी पुन्हा लिहून प्रकाशित केले आहे. आम्हा भक्तांसाठी ती एक प्रकारे पर्वणीच आहे. त्याकरिता मी मौनीबाबा संस्थानातर्फे त्यांना धन्यवाद देऊन त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो आणि ही लघु प्रस्तावना समाप्त करतो.

॥ श्री मौनीबाबा की जय॥

चिखली,
आश्विन शु.५, ललिता पंचमी
नवरात्र
दि. ३/१०/२०१९

संतसेवक
**सुरेश दत्तात्रय सावजी**
अध्यक्ष विश्वस्त मंडळ
प. हं. रामकृष्ण मौनीबाबा संस्थान,
चिखली, बुलढाणा.



ह.भ.प. संतकवी श्री श्रीराम महाराज - ग्रंथकार

।।श्री।।

# ।। मनोगत ।।

**यज्ञयाग जपे गोविंद पै भेटे। परि साधु न भेटे भाग्याविना।।**

रामायण, महाभारत या ऐतिहासिक चरित्र ग्रंथांमध्ये भगवंताच्या अवताराचे चरित्र आले आहे. या पौराणिक चरित्र ग्रंथांचे स्वरूप कथात्मक असते आणि त्यात अद्‌भूत हा रस असतो. अद्‌भूत रस वाचकाच्या अन्तकरणात त्या चरित्राविषयी भक्ति आणि श्रद्धा निर्माण करतो. मौनीबाबा जीवनामृत ग्रंथामध्ये दत्तभक्त परमहंस रामकृष्ण मौनीबाबा यांचे चरित्र, श्रीदासगणू महाराजांचे शिष्य श्रीराम महाराज यांनी लिहले आहे.

जन्मतःच मौनीबाबांमध्ये अद्‌भूत शक्ती असल्यामुळे आणि भगवंतप्राप्तीची ओढ असल्यामुळे त्यांनी कठोर अशी तपश्चर्या सातपुडा पर्वतावर केली. ईश्वर प्राप्तीकरिता मौनीबाबांनी अतिशय कष्ट सहन केले. त्यांना दत्ताचा साक्षात्कार झाल्यामुळे त्यांच्यात दैवी शक्ती निर्माण झाली आणि त्यामुळेच त्यांनी दत्ताच्या कृपेने अद्‌भूत चमत्कार केले. या चमत्कारिक घटनांमुळेच त्यांच्याविषयी बहुजन समाजाच्या अंत:करणात भक्ति आणि श्रद्धा निर्माण झाली. त्यांच्या या जीवन चरित्रामध्ये त्यांनी केलेल्या तप साधनेचा आणि काही चमत्कारिक घटनांचा समावेश केला आहे.

या ग्रंथाच्या पारायणामुळे वाचकाच्या सर्व व्याधी दूर होतात, असा भक्तांचा अनुभव आहे. सर्व

जन्मीचं पाप समूळ नष्ट करणारा असा हा ग्रंथ आहे. मूळ ग्रंथ फार मोठा आहे त्यामुळे त्याचीच छोटी आवृत्ती करण्याचा हा प्रयत्न मी केला आहे. श्रीराम महाराजांच्या शब्दामधील गोडवा आपल्याला या ग्रंथामधून अनुभवाला मिळतो, म्हणूनच सर्व भक्तांना पारायणाकरिता सुलभ व्हावा असा हा एकतीस अध्यायाचा छोटा ग्रंथ, हरिभक्त परायण संतकवि श्री श्रीराम महाराज, मु. इंच, ता. हिंगोली, जि. परभणी यांच्याच शब्दातून मी आपल्या समक्ष ठेवला आहे. श्री परमहंस रामकृष्ण मौनीबाबा यांच्या कमलचरणी मी हा ग्रंथ अर्पण करते.

माझ्यावर विश्वास दाखवला आणि मौनीबाबांची सेवा करण्याची संधी मला मौनीबाबा संस्थान चिखली यांनी दिली, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानून माझ्या शब्दांना विराम देते.

**|| श्री मौनीबाबा की जय||**

पौष शु. १५, पौष पोर्णिमा
मौनीबाबा अवतरण दिवस
ता. १०/०१/२०20

सर्व संतांना नम्र
**प्रा. डॉ. उमा विद्याधर धमाने**
रा. बरबडी, जि.वर्धा

# • अनुक्रमणिका •


| अध्याय | पृष्ठ | अध्याय | पृष्ठ | अध्याय | पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| अध्याय पहिला | १० | अध्याय अकरावा | ६३ | अध्याय एकविसावा | ११५ |
| अध्याय दुसरा | १४ | अध्याय बारावा | ७० | अध्याय बाविसावा | १२१ |
| अध्याय तिसरा | १९ | अध्याय तेरावा | ७५ | अध्याय तेविसावा | १२७ |
| अध्याय चवथा | २५ | अध्याय चौदावा | ८० | अध्याय चोविसावा | १३१ |
| अध्याय पाचवा | ३२ | अध्याय पंधरावा | ८५ | अध्याय पंचविसावा | १३७ |
| अध्याय सहावा | ३८ | अध्याय सोळावा | ९० | अध्याय सव्वीसावा | १४१ |
| अध्याय सातवा | ४४ | अध्याय सतरावा | ९६ | अध्याय सत्ताविसावा | १४७ |
| अध्याय आठवा | ४९ | अध्याय अठरावा | १०१ | अध्याय अठ्ठाविसावा | १५१ |
| अध्याय नववा | ५४ | अध्याय एकोणविसावा | १०६ | अध्याय एकोणतिसावा | १५५ |
| अध्याय दहावा | ५९ | अध्याय विसावा | १११ | अध्याय तिसावा | १६० |
| | | | | अध्याय एकतिसावा | १६४ |



श्री परमहंस रामकृष्ण मौनीबाबा – श्री क्षेत्र चिखली, जि. बुलढाणा

||श्री सरस्वती प्रसन्न||

श्री दत्तभक्त परमहंस रामकृष्ण मौनीबाबा यांचे चरित्र

# || अध्याय पहिला ||

श्री गणेशाय नमः| श्री सरस्वत्यै नमः| मल्हारी देवताभ्यो नमः| श्री गुरुभ्यो नमः||

जय जयाजी मोरेश्वरा। नमन असो तुज गौरीकुमारा। बुद्धि द्यावी उदारा। काव्य रचण्याते कृपाळा।।१।। कोणत्याही मंगल कार्यासी। आठविती भक्त तव नामासी। तरीच जाय कार्य तडिसी। तव कृपे देवा गौरी कुमारा।।२।। शंकरानेही स्तविले तुला। त्रिपुरवधाचे समयाला। देवा! गणेश मग बनला केलेस साह्य शिवाते।।३।। मुका जरी असला देवा।। तव कृपे वेद पढेल केशवा। ऐसे महात्म्य तुझे एधवा। पार्वतीसुता गजानना।।४।। देवीचे चरण नमू आता। सरस्वती जी ब्रह्मकन्या तत्त्वता। ठेवुनी चरणी मम माथा। विद्यादान तिसी मागे मी।।५।। देवी तू मुक्याशी आधार। पंगू लंघील कठीण गिरीवर। ऐसी तू कृपावंत शारदे थोर। कृपा अंतरी बहु तव देवी।।६।। कंचुकी शुभ्र मस्तकी तिलक। माते! शोभे तव शरीरी देख। करी विणा आणि वेदाचे पुस्तक। वाहती शोभे मयुरांच्या तू।।७।। तू जरी कृपा न करिसी। तरी कैसा लिहू मी भक्त काव्यासी। मूर्ख मी परियेसी। विद्या नच लवही मज देवी।।८।। देवी! तुझ्याच बळावरी। मौनीचरित्र लिहितो अत्यादरी। नको झांकू भक्त कथेसी तरी। नेत्र, तू जगन्माता अंबे।।९।। अद्वैत रूपी तिन्ही रूपे

तूच धरिले। पार्वती, सावित्री, लक्ष्मी भले। म्हणूनी तवचरणी शिर ठेविले। देवी व्हावे साह्य आता।।१०।। आता नमू श्री गुरूशी। दयाधन दासगणूशी। विद्या मागे मी तुम्हासी। मस्तक चरणी ठेवूनिया।।११।। देवा तूं महिपतीचा अवतार। कलीयुगीचा खरोखर। काव्य रचिले अपार। हे माहित समस्ताते।।१२।। तुम्ही बुद्धी द्यावी मजसी। रचण्या मौनीकाव्यासी। उणे अधिक ठावे तुम्हासी। कां की मी अजाण देवा।।१३।। तू आणि मौनी संत। भेद नच यात तीळमात्र। शरीर वाटे भिन्न खचित। परी आत्मा एकचि। तुम्हा दोघांचा।।१४।। आता कुलदैवत मल्हारी। शिर ठेवुनि त्यांचे चरणी। विद्या मागे मी अत्यादरी। सुरेख मौनी काव्य होण्याते।।१५।। तसेच नव ग्रहासी। ब्रह्मा, विष्णू, व्योमकेशी। नमिले आदरे त्यांशी। तव भक्त कार्यास्तव देवा।।१६।। देवाधिदेव पांडुरंग नमिला। व्हावे साह्य दीनाला। देवाधिदेवा जगपाला। श्री यदुपते दीन वत्सला।।१७।। देवा धर्मास्तव अवतरसी। तू दशावतार होसी। मत्स, कच्छ, वराहरूपे नटसी। नरसिंह, वामन ही तुझीच रूपे।।१८।। परशुराम, राम, कृष्ण, बौद्ध, कली। तूंच की रे वनमाली। धर्माची बूज राखिली। घेऊनी सोंगे नानापरी।।१९।। परी देवा! कलीयुगी बौध्द अवतार। म्हणून धाडिसी तव दासाते भूवर। धर्मास्तव साचार। ऐसे तव प्रेम धर्माविषयी।।२०।। पूर्वकाली तू नर बनून, वर्तसी। धर्मा घरी उच्छिष्ठ हि काढिसी। घोडेसी पार्थाचे घुशी। ऐसा तू भक्त प्रेमी।।२१।। कां की कलीयुगी अधर्मी सारे जन। म्हणून तूं न बोलसी त्या कारण। भक्त करेच करीशी धर्माचे रक्षण। झाडून गर्व दुष्टांचा।।२२।। ज्ञानेश्वरे निर्जीव चालविली भिंत। आणिले शरण चांगदेवाप्रत। हरिला गर्व पैठणी

खचित। द्विजाचा वेद बोलून रेड्यामुखे।।२३।। किती वर्णावे देवा तव भक्ताला। अंत न लागे शेषाला। तव भक्त लीलेचा पाहिला। न कळे हे मुढाला, देवा।।२४।। देवा! एक ठावे आम्हासी। तू संत भक्ताते निर्मिसी। प्रत्येक युगायुगासी धर्म राखण्यास, जगदांतरी।।२५।। डव्हयाचे बिदोडे संत, तसेच अनंतबाबा आकोल्याचे। मुंगसाजी ते धामणगावचे। पुंडलिक भक्त गोरेगांवचे। असती विबुध जनहो।।२६।। दासगणू, कोंगसाजी, धुनीवाले दादा। मौनीबाबा चिखलीचे हास्यमुख सदा। परभणीचे अमीनसाहेब दत्त दुजा। पांडुरंगबाबा मंगरूळचे ते।।२७।। श्रोते! व्हा सादर आता। लक्ष लावा संत कथेसी सर्वथा। अमृताहूनी इचि मधुरता। आपल्या अनुभवा येईल।।२८।। वृक्षात पिंपळ थोर। देवात हरिहर। तीर्थात गंगा पवित्र फार। तेवि कथेत भक्तकथा।।२९।। देवळात देव वसे। परी तोही येतसे। भक्त कथेत बहु वसे। श्रवण करण्या तातडी।।३०।। आता वर्णू मौनी चरित्र। जे असे परम पवित्र। गोड अमृताहून बहुत। देवही हपापती या कथेस्तव।।३१।। अमृत अति गोड जिव्हेसी। संत कथा त्याहून अधिक सरसी। स्वये कृष्णही कधी उद्धवासी। पहा भागवती नाथाच्या।।३२।।

।। श्री दासगणूचा वेडा श्रीरामलिखित श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ अध्याय पहिला समाप्त।।
।। श्री मौनीबाबास अर्पण।।




**श्री. आकारामसिंग नागोरे, सौ. रंभाबाई नागोरे**
**(श्री परमहंस रामकृष्ण मौनीबाबा यांचे कैलासवासी माता, पिता)**

# ।। अध्याय दुसरा ।।

श्री गणेशाय नमः। जय जयाजी गौरीकुमारा। नमन असो तुम्हा लंबोदरा। बुध्दी द्यावी मज दातारा। शिवतनया गणपती।।१।। ऐका देऊनिया चित्त रामकृष्णाचे चरित्र। परिसता जळे पाप त्वरित। सत्य सत्य मौनीकथेने।।२।। वऱ्हाड प्रांतात असे। तालुका आकोट विलसे। तेथे नरसिंग भक्त वसे। होऊन गेले मागे ते।।३।। आकोट तालुक्याभितरी। 'सिरसोली' ग्राम निर्धारी। तेथे जन्मले संत साक्षात्कारी। भगवान मौनीबाबा ते।।४।। या 'सिरसोली' ग्रामांत। पहा राजपूत वंशांत। आणि सूर्यवंशी खचित। नांदे श्रावण नागोरे।।५।। श्रावण भाविक असती भारी। तशीच कांता कोंगसाबाई निर्धारी। दोघांची जोड भाविक साजरी। भजती नित्य देवाते।।६।। पंढरीस जाती आषाढीस। नित्य नेमाने खास। अभयता पत्निपुरुष। श्रावण भक्त ते।।७। अहो, सेवा करिता करिता। वृद्धपण आले श्रावणासी तत्त्वता। म्हणती देवाधिदेवा ऋषिकेशा समर्था। ऐका विनंती दीनाची।।८।। पुत्राविण असेल जो नर। पाहू नये त्याचे मूख साचार। ऐसी वेदाची साक्ष खरोखर। असे ती देवा।।९।। पटली विनंती देवास। स्वप्नी आले जगदीश। वदती भक्त श्रावणास। दुःख नको मानू चित्ती।।१०।। माझा कृष्ण अवताराचा पिता। वसुदेव जो तत्त्वता। तोच आकाराम येईल पोटी आता। मम वत्सा श्रावणा।।११।। आकारामाचे पोटी। मीच येईन जगजेठी। शंका मानू नको खोटी। भक्तवरा! समज तू।।१२।। श्रोते! स्वप्न खरे झाले। श्रावणापोटी आकाराम आले। तया पोटी भगवान येतील पहिले। रामकृष्ण मौनीसंत ते।।१३।। बालपणापासून देव ध्यान। असे आकारामा पूर्ण। म्हणून करिती नामस्मरण। सदा मुखे गोविंदाचे।।१४।। वयाचे पंधरावे वर्षी। पाहण्या आकारमाच्या परीक्षेसी। धाडिले भारी बिमारीसी। शरीरी आकारामाच्या।।१५।।

मातापिता म्हणती देवाला। दे आयुष्य या बाळाला। वाचल्या धाडील पंढरीला। आषाढी एकादशीस्तव।।१६।। आकाराम जरी बिमार झाला। परी न सोडले ईश नामाला। मग देवासी कळवळा आला। तत्काळ दूर केले व्याधिते।।१७।। श्रोते, याचेच नांव भक्ति। पोरचेष्टा नच ती। खोटे न समजा कल्यांती। विबुध जन हो।।१८।। अमीनपूरच्या गंगाबाईची। 'रंभा' नामे योजिली साची। कन्या उदार मनाची। या आकारामास्तव।।१९।। नांव नक्षत्र पाहिले। घटीत गोत्र उतरले। मग विवाहाते केले। आणि अन्नदान सर्वाभूती।।२०।। आकारामाचा विवाह झाला। परिदैवयोगे पिता वारला। मग बोझा सर्व पडला आकारामावरी संसाराचा।।२१।। संसारी राहून आकाराम। सचोटीने वागती परम। तसा आठवी, श्रीराम। अध्यात्म दैवत जे।।२२।। आकारामाची सासू गंगाबाई। ही रुतली हरिचे ठाई। पंढरीस ती नीत जाई। दर्शनास्तव प्रभुच्या।।२३।। गंगाबाई नेसून वस्त्र पांढरे। लावी गोपीचंदनाचे टिळे साजिरे। शिरी वृंदावन ते बरे। करी वीणा शोभे सतीच्या।।२४।। मुखी हाच ध्वनी। 'रूप पाहता लोचनी'। ऐसी रंगली हरिच्या भजनी। साध्वी गंगा मीरासम।।२५।। देवा, अशक्य काय वहिले? तुला माझे कोडे पडिले?। दर्शन देण्याचे ते भले। सांग रमापते।।२६।। यापरी करिता भजनाला। सतीस गहिंवर दाटला। वत्सासम टाहो फोडिला। 'दीन वत्सला कधी भेटसी'?।।२७।। यापरी पूजन देवासी। भजन मांडिले वाळवंटासी। प्रेमाश्रू वाहती नेत्रासी। त्या सतीच्या श्रोते हो।।२८।। मग विचारकरी शारंगधर। झाली भक्तिची अखेर। घ्यावे दर्शन सत्वर। या सतीचे हो।।२९।। वारी साठसत्तर पायी केली। हिची वासना पाहिजे पुरविली। सती बहु असे कष्टली। भूक लागली दर्शनाची।।३०।। मग, चतुर्भुज रूपे प्रगटला। सांवळा गंगाईचे सान्निध्याला। माग म्हणे वराला। प्रिय तुला जो।।३१।। मग शिर ठेवून चरणी। यथासांग पुजिला चक्रपाणि कर जोडूनी करी विनवणी। ऐका वचन मम देवा।।३२।। मम

कन्या रंभाई जाण। इस व्हावे पुत्ररत्न। जे भक्तिबळे प्रिय असून। तुजकारण व्हावे देवा।।३३।। ऐसा देई पुत्र गुंडा। ज्याचा त्रिलोकी झेंडा। न लगे द्विपाद धोंडा। ज्याते नच मान कुठे।।३४।। जो असे मान्य देवासी। ऐसाच नातू दे ऋषिकेसी। एकनाथा सम परियेसी। धन्य करी उभय कुळांते।।३५।। ऐकून तिच्या वचनाला। देव वदे गंगाईला। मीच घेतो अवताराला। तारण्या उभय कुळाते।।३६।। तव भक्तिने मोहिलो। वर देण्या तुज आलो। पूर्व पुण्यास्तव भेटलो। गंगाबाई तुजला मी।।३७।। मला भावभक्तिच प्रिय असे। श्रीमंताची कालत्रयी गरज नसे। भक्तिस्तव धुणे धुतसे। जनाबाईचे गृही मी।।३८।। रंभाई, आकाराम मम भक्त। संसारी असूनही विरक्त। ज्यांचे देवरूपी असे रक्त। येईन पोटी रामकृष्णरूपे मी।।३९।। 'आ' नामे अक्षरांत। अऊम म्हणून ॐ दैवत। आहे नित्य वसत। समज गंगादेवी तू।।४०।। 'का' नामे अक्षरांत। कमलापती भगवंत। 'रा' नामे अक्षरात। रामचंद्र दैवत वसे।।४१।। 'म' अक्षरी नांदे त्रिपुरारी। म्हणून येतो मी उदरी। रंभाईच्या निर्धारी। भक्ति मार्ग शिकविण्या।।४२।। 'रं' अक्षरी रघुराज वसे। तयाचा पुत्र दशरथ विलसे। दशरथाचा पुत्र राम असे। म्हणून 'रघुनंदन' दैवत त्या अक्षरी।।४३।। 'भा' अक्षरात सूर्य देवता राहत। 'ई' अक्षरात ईश्वर वसत। म्हणून घेतो अवतार खचित। तव कन्येच्या पोटी।।४४।। यापरी करुनी भाषण। गुप्त जाहले जगजीवन। 'देवदर्शन' हे भक्तिचे महिमान। भक्ति ना असे पोरचेष्टा।।४५।। बाबाची मातामह गंगाबाई। जिची कन्या असे रंभाबाई। म्हणती तिजला 'माई माई' असे वृद्ध बहुती।।४६।। गंगादेवी वदे वचन। रंभा नामे कन्येस्तव जाण। की बाले तव पोटी येणार। आठव्यांदा श्रीकृष्ण जन्मास।।४७।। आकाराम रंभाई संसारी दक्ष भारी। विश्वास ठेविती पूर्ण देवावरी। अनृत न वदति वैखरी। प्राण गेला तरीही।।४८।। श्रीहरीने कृपा केली। रंभाबाईस संतती दिली। परी पाच महिन्याची निवर्तली। दुसऱ्याचीही गती तीच झाली।।४९।। तिसरे

कन्यारत्न सुंदर। सजनबाई छानदार। चौथी कन्या जन्मली सावित्री नामे। सतीच्या उदरी त्या।।५०।। पाचवी कन्या जन्मली। पार्वती नामे भली। पाचवे वर्षीच वारली। बाबांची भगिनी ती।।५१।। चित्त करा एकाग्र फार। सहाव्याचे ऐका जन्मांतर। जन्मले हरिनारायण सत्वर। रंभाईच्या उदरी ते।।५२।। श्रोते! गरीबी असल्यावर अल्पविद्या शिकले हरिनारायण। मॅट्रिक पास झाले जाण। अति प्रयत्ने करूनी।।५३।। नोकरी लागल्यावरी। दोन विवाह झाले अत्यादरी। हरिनारायणाचे सत्वरी। हरिकृपेकरून।।५४।। पहिली पत्नी चंद्रभागा नाम जिचे। दुसरीचे कौसल्याबाई साचे। दोघींच्या पासून जन्म अपत्यांचे। झाले हरिनारायणस्तव।।५५।। चंद्रभागा नामे स्त्रीस। पुत्र झाला निशेष। नाम ज्याचे गणपतसिंह खास। पुत्र हरिनारायणाचा तो। ५६।। दुसरी पत्नी कौसल्याबाई। हिची संतती ऐका लवलाही कुसुम, हनुमानसिंह, सुनंदा, मंदाकिनी। नामे जयांची राही।।५७।। कुसुमचा विवाह झाला। बरबडीस दिले तियेला। राजपूत घराण्यामाजी भ्रतार शोभला। तो असे हरिसिह नामे।।५८।। कुसुमची ऐका संतती। राणा रणजितसिंह शोभती। भगतसिंह, किशोरसिंह असती। तीन मुले या कन्येची।।५९।। रंभाईस सातवा पुत्र झाला। यादव नामे जो भला। तोही बारा महिन्यांनी वारला। पुत्र आकारामाचा तो।।६०।। वृक्षाकारण जितकी फळे येती। तुम्हास सांगतो निश्चिती। तितकी नच टिकती। कित्येक पडती भूवरी।।६१।। याच न्यायेकरून। यादव गेला इहलोकांतून। रंभाईचा सातवा पुत्र जाण। आता ऐका वर्णन आठव्याचे।।६२।।

।। श्री दासगणूचा वेडा श्रीरामलिखित श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ अध्याय दुसरा समाप्त।।

।। श्री मौनीबाबास अर्पण।।



श्री रामकृष्ण नागोरे (श्री परमहंस मौनीबाबा) यांचा जन्म
शनिवार, दि. २१ जानेवारी १९०५
(पौष शुद्ध पौर्णिमा शके १८२६)

# ।। अध्याय तिसरा ।।

श्री गणेशाय नमः। जय जयाजी गणपती। देवी सरस्वती। तुम्हाते असे विनंती। धरा करी लेकराते।।१।। पूज्य वर्णविषया मौनीराया। तव गुण वर्णाया। मती दे राम्यासी या। सर्व काळ देवा।।२।। वैकुंठी एकदा। श्रीहरी बसला सभेभीतरी। सर्व संताच्या अत्यादरी। विचारास्तव देव तो।।३।। संत होते कोण कोण। नामे देतो येथे पूर्ण। ऐका देऊन तुम्ही कान। जेणे जळे सर्व पाप।।४।। श्री ज्ञानेश्वर, सोपान, निवृत्ती। राका, नामा, गोरा निश्चिती। दामाजी, नरहरी, लाखा सन्मती। जनाबाई, मीराबाई, सखुबाई।।५।। वाल्मिक, नारद, प्रल्हाद, ध्रूव। शिबी, धर्मराज, पांडव। तुलसीदास अपूर्व। सन्निध श्रीहरीच्या ते।।६।। हरी म्हणे संतासी। ऐका मम वचनासी। धर्म नच उरला महिसी। पसरला अधर्म चोहीकडे।।७।। म्हणून घ्यावा अवतार। तुम्हीच करून विचार। कुणास द्यावा अधिकार। करावे कथन मजकारणे।।८।। ऐकून वचन हरिचे। हास्य विपुल आले साचे। संता ऐकून बोल ईशाचे। केवळ वाटती अमृतापरी।।९।। देवा, धन्य तू असती। मान आमुचा वाढविसी। पूर्वीपासून रीत तुझी ऋषिकेसी। आम्ही जाणतो हरि।।१०।। विचार केला पूर्णपणे। तेथे अवघेच शहाणे। निवडून दिले तुळसीदासा कारणे। सर्वांच्या मते करूनी।।११।। तुळसीदास जोडून कर। उभा ठाकला समोर। कुठे घेऊ जन्मांतर। वद हे भक्त वत्सला माते।।१२।। श्री विष्णू म्हणे मम विचार। तुळसीदास तू ऐकू सत्वर। सिरसोलीचा महिमा थोर। कथितो सविस्तर तू ते।।१३।। अक्षराचे महत्त्व थोर। देवता राहती साचार। कथितो त्याचा विचार।

प्रथमता तुला मी।।१४।। पुण्य भूमी वाचून। नच होय संत जनन। तुज कथितो ही खुण। भक्ता तुळसीदासा।।१५।। 'सि' नामे अक्षरात वसे। सीता दैवत विलसे। आदी माया ती खासे। प्रत्यक्ष नांदे महदादी माया।।१६।। 'र' नामे अक्षरात दैवत। रघुनाथ सीताकांत। जन्म सूर्यवंशात। ज्या रामप्रभूचा तो।।१७।। 'सो'नामे अक्षरात। 'सोहं ब्रह्म' मंत्र त्यात। तो जपता अंतरात। होय ब्रह्म काया ती।।१८।। 'ली' नामे अक्षराचा हेत। संसारी नच राहणे लिप्त। कां की न भेटे भगवंत। माया धरीता ती।।१९।। जसा राम अलिप्त। नच कशांत लिप्त। तुजही विदेही स्थिती प्राप्त। होय अल्प दिनामाजी।।२०।। म्हणून आकाराम रंभाईचे उदरी। जन्म घेणे भूवरी। सिरसोली ग्रामाभितरी। जी आकोट तालुक्यामाजी।।२१।। तुला साह्य मी ही असे। तुज काळाचा धाक नसे। आणिक तव शरीरी वैराग्य विलसे। मम कृपे बा।।२२।। पुढे नच अनमान करी। परमहंस दिक्षा घे निर्धारी। अल्पसा संसार केल्यावरी। तुळसीदासा तू।।२३।। यापरी वंदून वचनाला। पाठविले तुळसीदासाला। रंभाईचे उदराला। वैकुंठाहुनी हरिने।।२४।। रंभाईस डोहाळे होती। वाटे सेवा करावी ती। विप्रसंत देवादिकाप्रति। एक निष्ठेने।।२५।। आपुला पति आकाराम। त्यास वदे डोहाळे अत्युत्तम। धरी ना लाज निश्चिम। पतिपासी आपुल्या।।२६।। ऐकून स्त्रीचे वचन। आकाराम उमजले पूर्ण। लागती डोहाळे पुरविणे जाण। आपणाते सर्वस्वी।।२७।। तयारी त्वरे करून। यात्रेस निघाले जाण। ग्राम सिरसोलीहून। घेऊन मंडळी ती बरोबरी।।२८।। रंभाई येता पंढरीस। तीन मासांचा गर्भ उदरी खास। होता जन हो निशेष। पुढे रामकृष्ण झाला तो।।२९।। पंढरपूरी करीत भजनासी। वंदिले पांडुरंग चरणासी। गहीवर दाटला सतीसी। बोले येणेरिती

हरिस्तव।।३०।। पुत्र देणे ऐसा गुंडा। ज्याचा त्रिभुवती असे झेंडा। भक्ति करण्याची लाज न उपजो धेंडा। ऐसाच दे पुत्र मज देवा।।३१।। रंभाई असता निद्रिस्थ। आले स्वप्नी पंढरीनाथ। बालकरूपे यथार्थ। लागले स्तन पिण्याशी ते।।३२।। यापरी दाखवून चमत्कार। अदृश्य झाले शारंगधर। रंभाई आली शुद्धीवर। कथिला प्रकार पतीने।।३३।। यापरी तीर्थाते करून। राहती हरी भजनी मग्न। नच दुसरे याते भान। संसाराचे ते कांही।।३४।। पुढे होता गर्भास नवमास। ऐका जन्म दिवसास। केव्हा आले संत जन्मास। पवित्र रामकृष्ण ते।।३५।। श्रोते! होऊन सावधान। करी घ्या अक्षदा गुलाल पूर्ण। बाबांच्या जन्मवेळी त्यावर टाकून। घेऊन पुष्पे सर्व करातली ती।।३६।। पौष मास महिना स्पष्ट। शके अठराशे सव्वीस चोखट। तारीख एकवीस महिना एक सुभट। इसवी सन एकोणीसशें पाच तो।।३७।। तिथी, मास कोणता जन्म दिवस। श्रोत्या बाबांच्या जन्मास। तिथी पौर्णिमा शनिवार दिवस। बाबा जन्मले सकाळचे समयी।।३८।।

''पुंडलिक वर दे हरि विठ्ठल''
''सिताकांत स्मरण जय जय राम''
''पार्वतीपते हरहर महादेव''
''मौनीबाबा की जय''

धन्य पोटी आला वनमाळी। वंशी भूवरी पवित्रता आली। आकारामाच्या गृही भली। सिरसोली ग्रामाठायी।।३९।। मग घेऊनी द्विजवेषाला। दत्त आला आकाराम गृहाला। सांगावया

भक्तनावाला। सिरसोली ग्रामाठायी।।४०।। जोडूनी कर करिती आदर। शिर ठेविले द्विजचरणावर। सांगा भवित्य बाळाचे सत्वर। आम्हाते स्वामीराया।।४१।। दत्त वदे विचार करून। वाल्मिक लिहिती रामायण। पुरे न झाले तेव्हा जाण। संपविले तुळसीदासाने।।४२।। तोच तुळसीदासाचा अवतार। तुझ्या पोटी आला खरोखर नाव ठेव सत्वर। रामकृष्ण ते।।४३।। त्याच रात्री दत्त स्वप्नी येऊन। म्हणती हा करील माझे चिंतन। तप करील गिरीपर्वती जाऊन। बनेल वैराग्यशील हा।।४४।। हा न करील संसार। कांता निमेल शीघ्रतर। जो बोल बोलेल तो होय खरोखर। आणि करील वस्त्र त्यागाते।।४५।। मौन धारण करील। परी भक्तकामना पुरवील। ऐसा तुझा हा बाळ। रंभाबाई जाणिजे।।४६।। तीर्थयात्रा पायी करेल। संतसंगे हा सदा रमेल। यापासून तुम्हा नच सुख मिळेल। कथिले भविष्य ते।।४७।। गेला निघून दत्त। केवढा भक्तांचा प्रेमी खचित। खरोखर श्रोते देवाप्रत। भक्त प्रिय असती।।४८।। बारा दिवस जाहले। बाळ पाळणी निजविले। सुवासिनी ते पाचारिले। नाव ठेवण्या बाळाचे।।४९।। एकेक पुढे येती। सप्रेम पाळणा हालविती। ब्रह्मरूपी गाणे गाती। नाव ठेविले ‘‘रामकृष्ण’’।।५०।। दया, क्षमा, शांती। आणिक चारी मुक्ती। या सुवासिनी मुख्य असती। पाळण्याजवळी बाबाच्या।।५१।। आशा, तृष्णा, माया, ममता। ह्यांचा शिरकाव न चाले तत्त्वता। आत द्वारपालांची सत्ता। राखण, ज्ञान, वैराग्य, विवेक तो।।५२।। ऐका पाळणा बाबांचा। मोद दुणावेल तुमचा। वैराग्यशील पुत्र शांतीचा। रामकृष्ण हा।।५३।।

## पाळणा

बाळा जो जो रे कुळभूषणा। आकाराम नंदना।
निद्रा करी बाळा मनमोहना। जन्मला रामकृष्णा।।धृ.।।
पौष शुद्ध पक्षी पौर्णिमेशी। पुष्य नक्षत्र परियेसी।
नव वाजण्याचे समयासी। शनिवारच्या दिवसी।।१।।
पाळणा लावला सिरसोली। आकारामाचे वंशी।
पुत्र जन्मला ऋषिकेशी। रंभाईचे कुशी।।२।।
हालवी रंभाई सुंदरी। धरुनी ज्ञानदोरी।
पुष्पे वर्षिली सुरवरी। गर्जती जय जयकारी।।३।।
येऊन गुरुदत्त सत्वर। सांगे जन्मांतर।
रामकृष्ण हा योगेश्वर। आठवा अवतार।।४।।
रामकृष्ण भावाचा भुकेला। भक्ता आधीन झाला।
शांता धरुनी भावाला। पाळणा गाईला।।५।।

।। श्री दासगणूचा वेडा श्रीरामलिखित श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ अध्याय तिसरा समाप्त।।
।। श्री मौनीबाबास अर्पण।।




श्री रामकृष्ण नागोरे (श्री परमहंस मौनीबाबा) यांना वैराग्य प्राप्ती
इ.स. १९३८ (शके १८५९)

# || अध्याय चवथा ||

श्री गणेशाय नमः। जय जयाजी दशरथनंदना। दयाळूबा दयाधना। करुणानव वामना। अयोध्यापते।।१।। पुढे आकारामाप्रति। नववे पुत्र सन्मति। पांडुरंग ज्याला वदती। जे बंधू समर्थाचे।।२।। यांनाही दोन स्त्रिया विवाहाच्या 'गोदावरी', 'सरस्वती' नावाच्या। ईशकृपे त्या साच्या। असती पांडुरंगाते।।३।। गोदावरी बाईस। 'मधुकर' नामे पुत्र तिस। असे नोकर बुलढाण्यास। शेतकी खात्यात तो।।४।। आणि कन्या दोन। 'शकुंतला' 'सावित्री' जाण। 'महिपाल' प्रतापसिंह पूर्ण। अपत्ये सरस्वतीबाईची।।५।। शंकर दहावे बंधू जाणावे। बाबांचे ते बरवे। नागपूरी वकिलीत निपूण ठावे। सध्या असती विबुध हो।।६।। यांची स्त्री 'कलावती'। जिची संतती 'लिलावती'। पुत्र 'सुभाष' वदती। असे शंकरचा तो।।७।। नामे नर्मदा पत्नि वदती। ही शंकरची सुचिसन्मती। ऐका चित्त ठेवून शीघ्रगती। दुसरे कुटुंब ते।।८।। जरी न कथन केले तुम्हाप्रत। घराण्याचे समूळ ते वृत्त। ठावे नच पडे यथार्थ। कालत्रयी तुम्हा भाविका।।९।। ऐका बाबांचे बालपण। भक्ति कशी जाहली उत्पन्न?। कसे केले हरि भजन?। सूमार्ग कसा लाधला?।।१०।। नित्य मारुतीचे दर्शन घेती। कधी नेम नच टाळिती। रीत लागली बाळपणी ती। लागण्या भक्ति हरिची।।११।। वीट एक पाहून। तीवर काढिला हनुमान। बाळपणी तो जाण। रामकृष्णानी स्वहस्ते।।१२।। आकाराम वदे रंभाईस। रामकृष्ण नच करी विद्याभ्यास। अठरा वर्षे वयास। झाले या बालकाच्या।।१३।। वाटे करून विवाहासी। गोवू यासी मोहापासी। मग सुख मिळेल आपणांसी। वाटे मज अंतरी प्रिये।।१४।। यापरी करून विचार। गांव ते आकोली जहागीर। तिथे महादेव जालंदर। आले आकाराम तेथे।।१५।।

छत्तीस गुणांत लग्न निघाले। येऊन गृही तयारीस लागले। सर्व सामान त्वरित बनविले। आकारामाने स्वखर्चाने।।१६।। थाटामाटाने लग्न लागले। अन्नदान बहु केले। दान दक्षिणा देऊन भले। तृप्त केले याचका।।१७।। संसारी वर्तता रामकृष्ण। अपत्ये जाहली दोन। ईशकृपे करून। आकाराम पुत्रास्तव।।१८।। काशीबाई सावळी सुंदर। भ्रकुटया धनुत्याकार। हसत मुख सर्वस्वी साचार। असे जिये माऊलीचे।।१९।। व्यसन बाबासी लागले। पान-तंबाखूचे भले। व्यसनांतून नच सुटले। कोणत्याही क्षणी।।२०।। शेतातून कामधंदा करून। बाबा आले हिरमोड होऊन। वदति स्त्रियेस वचन। दे चंची आधी माझी।।२१।। काशीबाई वदति पतीस। भाकरी झाल्यावरी निशेष। तुम्हा देते तंबाखूस। निश्चित मने।।२२।। तयी बाबास क्रोध आला। घेऊन करी चंचीला। दिली आहुती चुलीला। सोडीला तंबाखू तो।।२३।। तेव्हांपासून नच खाती तंबाखूस। यापरी निश्चय मनाचा खास। केला नेम न सोडी त्यास। अद्यापही तो।।२४।। वदति हरिला रामकृष्ण। तोडी संसाराचे बंधन। दे तव दर्शन। मज दीनाते प्रभू।।२५।। ज्यांनी संसार नच केला। परमार्थ न साधेच त्याला। तुकाराम गेले कथून जगाला। दोन्ही करावे लागे मानवा।।२६।। आता ऐका देऊन चित्त। कैसे वैराग्य समर्था प्राप्त। जाहले हो जी निमित्त। तेचि अनुसंधान ऐका कथेचे।।२७।। संसारी वर्तती समर्थ। सचोटीने वागती यथार्थ। चोख रीतीने तो परमार्थ। करिती सदा सर्वदा।।२८।। राहणी जुनाट साधी दिसे। शिरी वाकडा भाग नसे। थाटाने राहणे वावडे असे। वृत्ति भोळसर शिवापरी।।२९।। शिरी शुभ्र टोपी विलसे। अंगरखेही स्वच्छ तसे। मुखी रामकृष्ण वसतसे। पहिल्यापासून बाबांच्या।।३०।। उशीर जरी स्नाना जाहला। परी आधी नच सेविले अन्नाला। ऐशा कडक नियमाला। समर्थ पाळिती बरे।।३१।। येता पौर्णिमा दत्त जन्माची। मार्गशीर्षात ती साची। आनंदली वृत्ती बाबांची। म्हणती करू जन्मकार्य

दत्ताचे।।३२।। यापरी घेऊन टाळमृदंगाला। करिती ते सर्व दत्तभजनाला। गुंग झाले त्या समयाला। भजनी अवघे जण श्रोता।।३३।। परी बाबांचे गळ्यात वीणा। नेत्रपातीही हलेना। सारखे पाहती अभिनंदना। जाहले प्रेमभरीत हृदय ते।।३४।। नेत्री लोटला पूर। प्रेमाश्रुंचा खरोखर। रोमांचित जाहले शरीर। याचेच नाव भजन।।३५।। म्हणती दत्ता भेटा मला। तोडी मम भवपाशाला। अनन्यभावे शरण मी तुला। आलो गुरूमूर्ते।।३६।। तू भक्ता पावशी दत्ता। माझेच का कोडे पडले तत्त्वता। सोड मनाची कठोरता। दीनानाथा तू।।३७।। मी नच पुत्रसंतती मागे तुला। तव दर्शनाची भूक मला। देवाधिदेवा जगत्पाला। अद्वैतरूपी दत्ता।।३८।। यापरी करून स्तवनाला। कंठ अति दाटून आला। मूर्छागत होऊनी भूमीला। पडले तेव्हा बेशुध्दपणे।।३९।। धावा करीत। दत्त प्रगटले त्वरित। सहा कर तीन शिर शोभत। ज्याते भाविक हो।।४०।। मग सावध केले रामकृष्णासी। धरून दत्ताने हृदयासी। पुसले रामकृष्ण भक्तासी। ऐशापरी जन हो।।४१।। ईश्वराचे संगतीने तरसी। की विषयाते प्रिय मानिसी?। ह्याचे उत्तर दे भक्ता मजशी। शांतपणे तू या ठायी।।४२।। तव समर्थ वदती वदती देवासी। ईश्वर मोठा सर्वाहूनी परियेसी। विषय ओंगळा वाटे मजसी। भयंकर विषावरी।।४३।। दत्त वदे रामकृष्णासी। तू चिंता न करी मानसी। पूर्वीचा तू तुळसीदास असती। हे स्मरण देण्या प्रगट झालो।।४४।। तू थोड्याच दिवसांत। होशील परमहंस खचित। सोडून या जगी संसाराप्रत। विचारशील आत्मज्ञानामाजी।।४५।। यापरी वदून दत्त। शिरी ठेविला कृपाहस्त। होसी जगद्‌विख्यात। झाले मग अदृश्य ते।।४६।। ऐकून वचन दत्ताचे। गहिवरले समर्थ सांचे। बत्तीस वर्षापर्यंतचे। आयु फुकट गेले माझे।।४७।। संसारी कष्ट केले। व्यर्थ स्त्रियेस मन लाविले। देव नाम नच मुखी आले। या माझ्या भवपाशी।।४८।। असे म्हणूनी गाळिती अश्रुप्रत। मी करीन आता भक्तिप्रत। जोडीन हरि चरण

सतत। याच देही त्वरे।।४९।। गावात काढिली मिरवणूक। करूनी विचार निःशंक। सजविली पालखी देख। दत्त प्रभूची ती।।५०।। अन्नदान बहुतापरी। झाले समर्थाचे गृहांतरी। तृप्त झाले नर-नारी। बनती भाग्य आकारामाचे।।५१।। आयाबाया नवल करिती। सिरसोली ग्राम निश्चिती। दाम्पत्य भाग्याचे नांदती। आकाराम रंभाई।।५२।। यापरी करून सोहळ्यासी। बाबा विचारीती मानसी। जावे तीर्थयात्रेशी। करावे तप शारीरिक।।५३।। पूर्ण विचार केला हृदयाचा। त्याग केला घरादाराचा। निघाला यात्रेस पायी साचा। ग्रामाहून आपल्या तो।।५४।। फक्त वस्त्र नेसन्याचे। उदक पिण्या पात्र साचे। इतके सामान संगतीचे। घेऊन निघाले यात्रेस्तव।।५५।। आशा नच कुणाची उरली। माया प्रभूची अति लागली। सविस्तर ती वाट धरली। समर्थे बद्रीनारायणाची।।५६।। समर्था बरोबर होते सोबती। सहाजण प्रिय अति। नामे देतो तयाची ती। ये ठाया भाविका हो।।५७।। सात्त्विक सखाराम माळी। दुजा शिवराम कुंभार निश्चली। कडतू शिवप्रसाद वेळोवेळी। बळीराम, अंबादास विप्र तो।।५८।। प्रथम सातपुड्यास येऊन। घेऊ म्हणती रूद्र दर्शन। जो असे 'वारी' स्थळी पूर्ण। वंदावा सहर्षे आधी तो।।५९।। या परी केला निश्चय। वंदिले हनुमंताचे पाय। तेथून खांडव्यास आले गुरूराय। शीघ्रगती करूनिया।।६०।। दादाजीचे घेतले दर्शन। आठ दिवस दिल्लीत मुक्काम केला जाण। घेऊन स्वयंपाकाचे सर्व सामान। करिती पाक स्वहस्ते।।६१।। पुढे एकोणीसशे अडतीसांत। बाबा आले हरिद्वारास। जेथे होता कुंभमेळा खचित। संत, महंत, साधुचा ते ठायी।।६२।। मग त्यांनी ऋषीकेशी। मुक्काम तीन दिन परियेसी। येऊन केला निशेषी। माहेरघर म्हणून।।६३।। मग पाहून लक्ष्मण झुला गौरीकुंड गुप्त काशीला। वंदून केदारनाथाला। लागले रस्ती नारायणाच्या।।६४।। चार धाम पृथ्वीचे येथ। रामेश्वर, द्वारका, जगन्नाथ। बद्रीनारायण चौथा यथार्थ। असती कठीण

मानवाते।।६५।। जन्मात येऊन एकवेळ। नर नारायण पहावे केवळ। होय जन्ममरण दूर समुळ। केल्या दर्शन हरिचे।।६६।। तव श्रम झाले म्हणून। निद्रा लागली सर्वापूर्ण। काय घडले वर्तमान। ऐका जन हो एकचित्ते।।६७।। रमाकांत स्वप्नी येऊन। बोले बाबालागून। धरावे तू व्रत मौन। तसेच वस्त्राते दूर करी।।६८।। लंगोटी ढुंगणात। फक्त असू दे सतत। तिचाही होईल त्याग त्वरित। तव तपेकरूनी वत्सा।।६९।। आताच लंगोटीस का घालणे। कां की जग ठेवीत तुज उणे। तुज तपे विषय लागे जिंकणे। तेव्हाच अधिकारी होशील मोक्षाचा।।७०।। यापरी वदले हरि। होत गुप्त मुरारी। बाबा जागे झाले झडकरी। कथिले स्वप्न सर्वाते।।७१।। उगवता दुसरा दिन। घेतले देव दर्शन। तेथेच धरिले व्रत मौन। आणि केले धारण लंगोटीते।।७२।। बद्रीनारायणात मौन धरीले। देवालयात पहा भले। म्हणून मौनीबाबाला नाव पडले। तेव्हापासून रामकृष्णाचे।।७३।। वदति देवा न जाय गृहासी। तेथेच कष्टवीन मम देहासी। जेव्हा होईन तव दर्शनासी। होईन दूर भवांतून।।७४।। सर्व मंडळींनी विनंती करून। बाबा आले शुद्धीवर पूर्ण। मी न तुमचा आता जाण। सुटला मित्रभाव येथून।।७५।। मग सर्व वदले रामकृष्णासी। चला एक वेळ तुम्ही गृहासी। ना तरी कांता शिव्या दे आम्हासी। तुमची रामकृष्णा।।७६।। जरी तुम्हा सोडून गेलो। तरी जगी निंद्य झालो। जनांत काळमुखी बनलो। तुम्हा सोडिता येथे।।७७।। कुणी वदति मारीले व्याघ्राने। आले कसे सोडून दीड शहाने। सर्व पाहतील आम्हा उणे। शीघ्र चला तुम्ही बरोबरी।।७८।। यापरी सर्वांचा आग्रह झाला। सर्व तीर्थे करून आले सिरसोलीला। घेऊन सर्व मित्राला। गांवाबाहेर उतरले समर्थ।।७९।। तव पत्नी काशीबाई। वदे नम्र वचन पाही। कधी याल परतुनी गृही?। प्रियकरा प्राणनाथा।।८०।। स्त्रियांना केवळ दैवत। असे आपुला कांत। दुसऱ्याची न किंमत। पतिव्रताते विषुध हो।।८१।।

काशीबाई माऊली चरणास्तव लागली। पाहून तो वनमाली। म्हणे यावे वेगी निजगृहा।।८२।। मग वदले रामकृष्ण। कांते येईन मी गृहापूर्ण। निर्जला एकादशीस जाण। ठेव भरवसा मम वचनी।।८३।। गांवा बाहेर तो रहिवास। परी आग्रहाने निज गृहास। आले मानून उल्हास। वचने स्त्रियेच्या ते।।८४।। मग मावंद्याची तयारी केली। अन्नदानाची रेलचेल झाली। गोरगरीबांची वृत्ति आनंदली। मिष्टान्न भोजना निमित्ते।।८५।। ग्राम जरी खेडे असले। संत योगे महत्त्व ये भले। तेच नर म्हणावे चांगले। करिती उद्धार भूमातेचा।।८६।। शारीरिक तप करून। वाचेने नामस्मरण। बाबा बनले संत पूर्ण। भक्तियोगे सांप्रत।।८७।। लंगोटी फक्त अंगावरी। कनक कांतेचा त्याग करी। जटाभार शोभे शिरी। तसी माळ कंठी तुळसीची।।८८।। येऊन राजपूत वंशात। मांडीला उद्धार यथार्थ। कलीमाजी साक्षात। भाविकांचा समर्थे।।८९।। जाहले कसे वैराग्य समुळ। पाचवे अध्यायी वर्णू केवळ। आता ठेऊन शिरी माळ। होऊ लीन हरिपायी।।९०।।

।। श्री दासगणूचा वेडा श्रीरामलिखित श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ अध्याय चवथा समाप्त।।

।। श्री मौनीबाबास अर्पण।।



श्री परमहंस रामकृष्ण मौनीबाबा यांना सौ. काशीबाई कडून मिळालेला उपदेश
इ.स. १९३९ (शके १८६०)




श्री परमहंस मौनीबाबा यांचे सातपुडा पर्वतातील तप

# || अध्याय पाचवा ||

श्री गणेशाय नमः।। जय जयाजी शंकरा। ओंकाररूपी परमेश्वरा। निर्गुण सगुणरूप ईश्वरा। पशुपते।।१।। देवा! तू वैराग्याचा पुतळा। आवडसी बहु धननिळा। तुज लाभला चाळा। रामनामाचा सर्वस्वी।।२।। तुला देवा सर्व मान देती। भगवंत भक्त तू असी। तू सर्वाहून श्रेष्ठ पशुपती। हे ठावे आम्हाते।।३।। पूर्व ओघ पाहिजे कांही तरी। कोण्या निमित्ये वैराग्य अंतरी। कळेल वाचल्या कथा सारी। बाबांची विबुध हो।।४।। कर्मकर्तव्य दैवाची जोड असे। कष्टविण साध्य नसे। ब्रह्म कल्पांती न दिसे। कष्टावाचूनी जना।।५।। बाबांचे वैराग्य कथन। आणिले कर्म ओढून। तेच ऐका सांप्रत वचन। एकाग्र मनाने।।६।। तुळसीदासाचा अवतार। बाबा असती साचार। कळेल करिता विचार। त्यांच्या कथेचा तो।।७।। तीच रीत येथे झाली। वैराग्य स्थिति बाणली। पत्नीपासून भली। मौनी समर्थाते।।८।। बाबा यात्रा करून येता गृही। पंधरा दिन झाले लवलाही। घडले काय तेव्हा पाही। स्वस्थपणे श्रोते हो।।९।। बसून स्त्रीयेजवळ सत्वर। मी कथितो एक विचार। मज झालासे काम विकार। हे प्रिये तुजविषयी।।१०।। तुम्ही संत बनला। परी विषय नच सुटला। कां धरिले साधुवेषाला!। जरी होती वासना विषयाची।।११।। पुन्हा थारा द्याल विषयांसी। निंद्य ठरला महिसी। सांगते स्पष्ट आपणाशी। ठेऊ नका जवळी विषयाते।।१२।। कांतेचे हे वचन ऐकून। बाणली वैराग्य स्थिती पूर्ण। विषय झाला ओकासमान। आजपासून प्रिये मज।।१३।। लगेच सोडून स्वगृहासी। आले नथ्थू पाटलाचे मळ्यासी। झाडून स्वशरीराचे केराशी। कांता वचनेकरून ते।।१४।। विषयरूपी केर झटकिला। वैराग्य ताठव आंथरीला। विवेक दोरांनी खिळीला। निघेना कुणातेही सर्वस्वी।।१५।। मग निराशवृत्ती झाली। पर्णकुटिका बनविली। शरीराची पर्वा नच उरली। मग

वर्तती उदास भावे।।१६।। सामान नच उरले काही। फक्त चिमटा, आसन, दत्तमूर्तिही। दुजे नच ठेविले तीळही। झाले उपाधी विरहीत।।१७।। कुणी अन्न देत नेऊन। परी अल्प करिती भोजन। बाणले वैराग्य पूर्ण। तया कांता उपदेशे।१८।। जसा तुळसीदास भक्तिमान। प्रथम त्यासी रूद्र दर्शन। त्याच न्यायेकरून। बाबास भक्ति हनुमंताची।।१९।। आणिक उपदेश स्त्रियेचा। फलद्रूप बाबांस साचा। म्हणून अवतार तुळसीदासाचा। मानणे योग्य ते।।२०।। राहती मळ्यात सर्वकाळ। शरीरी शोभे एक शाल। मुखी नामे दत्त, कृष्ण, गोपाळ। अखंड गजर नामाचा।।२१।। तेच मौन धरिले बाबांनी। उगीच गप्प न बसले तोंड लाऊनी। वाचा रूपली नामस्मरणी। हेच मौन सांगे कृष्ण उद्धवाते।।२२।। श्री समर्थ सिरसोलीत। शेतात वास्तव्य करीत। आठवीत रमाकांत। सर्वकाळ हृदयात आपुल्या।।२३।। तेणेकरून होती बोल खरे। बोलती बाबा ते सारे। व्यर्थ नच जाती अक्षरे। कळेल तुम्हा चरित्री ते।।२४।। तानसिंग धर्माने राजपूत। बाबाचे सेवेशी तिष्ठत। तयाची कांता पार्वती यथार्थ। नाम असे जियेचे।।२५।। पार्वती वदे विनायका। वाटे मम पुत्र जातो परलोका। म्हणून आले येथे देखा। घेऊन दुःख वार्ता मम ती।।२६।। पार्वतीसी वदती समर्थ। तू जाय गृहाप्रत। तुळसाबाईस वदले खचित। उद्या मरणार तिचा पुत्र तो।।२७।। तुळसाबाई शेतात गेली। मृत्यूने स्वारी केली। कुमरावरी चांगली पार्वतीबाईच्या।।२८।। एकदा समर्थाचा पुत्र आजारी। तेव्हा चरण पत्नी धरी। पहाना मुलाकडे काहीतरी। वाचण्याचा नच भरवसा।।२९।। समर्थ म्हणती स्त्रियेस। नच करी प्रयत्नास। मरणार हा खास। आपला पुत्र तो।।३०।। निरूपाय होऊन अखेर। लावून बरेचसे रुपये सत्वर। केला असे तो उपचार। परी निवर्तला पुत्र रामकृष्णाचा।।३१।। तसी कन्या ही गुजरली। संताची संतती ना उरली। शेवटी कांताही पंथी केली। यमपुरीच्या विबुध हो।।३२।। सौ काशीबाई कशी वारली। कथितो वार्ता वहिली। मृत्यूने स्वारी जिचेवर केली। ऐका स्वस्थ चित्ताने।।३३।। काशीबाईने विचार मांडिला। करू

आता पतिसेवेला। संसार मिथ्या भासला। तिचे अंतरी तो।।३४।। पुढे रोग कॉलरा झाला। चोहोकडे तो पसरला। सिरसोलीत हाहाक्कार उडाला। लागले लोक भ्यावया।।३५।। रोग हे यमाचे दूत। नेण्या यमपुरी प्रत। मागे सदा वसत। आयु खंडण्याते।।३६।। काशीबाई एकट्याच गृहासी। लावून कडी द्वारासी। बाहेर गेल्या तुळसाबाई परीयेसी। असून प्रेम ते साचे।।३७।। कॉलऱ्याने केली स्वारी। काशीबाई गेल्या स्वर्गाभितरी। नच जवळ कुणी निर्धारी। झाले बोल खरे समर्थाचे।।३८।। काशी निवर्तली। कपाळाची खटखट गेली। वृत्ती मुदीत झाली। समर्थ रामकृष्णाची।।३९।। मोह पसारा गेला सरून। आता आठवू दत्तचरण। कोणतेच न बंधन। ही कृपा देवाची मजवरी।।४०।। मळा सोडून नच गेले। तेथेच ईशचिंतन चालविले। वैराग्य कडक ते भले। बाबांचे कलामाजी।।४१।। तुळसाबाई सहज रीती। आल्या त्या मळाप्रती। भयंकर नाग रामकृष्णाच्या तनुवअति। काढून फणी शिरावरी।।४२।। लगेच गावांत जाऊन। आणिले पहा बोलावून। एक दोन मनुष्या लागून। माराया सर्पाते।।४३।। तव घेऊन काठ्या हातात। जन आले धापा टाकत। मळ्यामाजी त्वरित। ते घाबरले देखून नाग तो।।४४।। बाबा वदले जनासी। मारू नका यासी। दंश नच करील मजशी। का घेता जीव याचा तुम्ही।।४५।। वचने करून बसले गप्प। उतरून सर्वा देखता साप। अदृश्य जाहला आपोआप। पाहिले नेत्री सर्वांनी।।४६।। पंथा माझारी एक गाय ती। दुःखे जर्जर जाहलीसे अति। बाबांस दया आली काकुळती। पाहिले कृपादृष्टीने धेनुस्तव।।४७।। तव गाय नीट झाली। बाबांचे चरणी लागली। आणि मुखाने चाटू लागली। चरणाप्रत बाबांच्या।।४८।। रामकृष्णाच्या दत्त येऊन स्वप्नांत। वदले तू जाय तपाप्रत। सातपुड्यास खचित। असे अकोटा सन्निध तो।।४९।। तुज का करावे लागे तप?। ब्रह्म प्राप्ती न होय अनुप। देव ऋषी, महंत करिती तप। ब्रह्म प्राप्तीस्तव वत्सा।।५०।। 'त' अक्षरी माया खेळत। 'प' अक्षरी परमेश्वर नांदत। तपा देणे लागे किंमत। बघण्या

हरि तो।।५१।। माये पलीकडे परमेश्वर। अधिकार दिला त्याने साचार। तपास्तव खरोखर। होण्या ब्रह्मरूप तू ते।।५२।। सोडून जन्मभूमीप्रत। आले तप कराया खचित। सातपुड्या पर्वताप्रत। शिवरामासोबत श्रोते हो।।५३।। तप करी मौनी भगवान। सातपुड्यामाजी जाण। तशीच सेवा करिती सहाजण। राहून बाबाजवळी।।५४।। पांडुरंग, रघुनाथ, गजानन। शिवप्रसाद, लाला, अंबादास ब्राह्मण। शिवराम मिळून सातजण। सेवा करिती नारायणाची।।५५।। श्री मौनी भगवान। करिती तया कारण। कैशापरी ते जाण। ऐका भाव ठेवूनिया।।५६।। प्रातःस्नान करिती। पूजी मग रामभक्त मूर्ती। नमस्कार सूर्याते घालिती। नेमाने ते दररोज।।५७।। जेवन करण्याचा प्रकार। बाबांनी अर्धीच खावी भाकर। टाकावी पक्षांना साचार। भोजना आधी ती।।५८।। एक वर्ष ऐसे तप केले। वदती मग सहाजणाते भले। अन्न सोडीन हरिस्तव पहिले। स्थापिली मूर्ती नारायणाची।।५९।। मग बाबांनी त्याग केला। अन्नाचा त्या समयाला। खाऊन कंदमुळे फळाला। करिती तपाते।।६०।। कधी कधी एक पायावर। राहून जप करावा अनिवार। गोरक्षापरि तप मांडिले खडतर। सातपुड्यामाजी समर्थे।।६१।। सातपुड ज्यासी। म्हणून नाम शोभे त्यासी। सातपुडा परियेसी। भाविक श्रोते हो।।६२।। मग करून विचार। येण्या पर्वतावर। रस्ता केला तयार। बाबांनी स्वकरे।।६३।। कधी राहून उपाशी। देवा आठविती मानसी। तेव्हाच संत पदविसी। पावले जगी या।।६४।।

।। श्री दासगणूचा वेडा श्रीरामलिखित श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ अध्याय पाचवा समाप्त।।

।।श्री मौनीबाबास अर्पण।।




श्री परमहंस रामकृष्ण मौनीबाबा यांची चार धाम व अन्य तीर्थक्षेत्राची यात्रा

# ।। अध्याय सहावा ।।

श्री गणेशाय नमः।। जय जयाजी घननिळा। नमन असो तुज गोपाळा। उघडून नेत्र कृपाळा। पहा मजकडे श्रीहरी।।१।। तव बळावरी श्रीपती। रचितो मौनी काव्याप्रती। मूढमती मी अति। जाणसी तू सर्व विश्वेशा।।२।। संताची लागता धूळ। पाप जळे तात्काळ। उध्दवास वदला घननीळ। भागवतामाजी तो।।३।। बाबाने तीर्थयात्रा करावी। स्व तनु झीजवावी। आणि मागे किर्ती उरवावी। स्वकष्टाने ती।।४।। काशी, गया, कांची, मथुरा। उज्जनी, अयोध्या, शरयुतीरा। वृंदावन, गोकुळी, क्रिडा शारंगधरा। तसेच प्रयाग ते पाहिले।।५।। दिल्ली, नेपाळ, कलकत्ता पाहून। घेतले गंगासागरचे दर्शन। तसेच जगन्नाथा येऊन। केला मुक्काम आठ दिन।।६।। करून दर्शन रामेश्वराचे। आणिक स्नान समुद्राचे। झाले सार्थक जन्माचे। आज मम देवा। तीन दिन मुक्काम केला। मग आले द्वारकेला। पाहून श्रीकृष्णाला। तारी मजला तू।।७।। यापरी चार धाम पाहून। तसेच बारा शिवस्थान। सप्तपुरी श्रेष्ठ म्हणून। केली तीर्थ समर्थांनी।।८।। रात्री समर्थ आसनी स्थित। काय घडली ती मात। ऐका देऊन चित्त। विबुध जन हो।।९।। तो एक स्त्री येऊन। बसली सेवा करीत जाण। चुरी बाबांचे द्वयचरण। वदे हळूच वचन बाबांते।।१०।। ''कामवासना झाली। मजकारणे वहिली। ती पाहिजे पुरविली। आपण संतराया।।११।। संत अति उदार। करा मम अंगीकार।'' मारली कंठी मिठी साचार। रात्र समयीस तिने।।१२।। मौनव्रत म्हणून। न करावे भाषण। समर्थ गेले घाबरून। म्हणून लागले आठवाया देवा।।१३।। बुध्दीदाता ईश म्हणून। मनांत म्हणती मातेसमान। जा निघून त्वरा करून। मायबाई मंदिरातून आता।।१४।। ती नच सोडी

कंठास। तव बाबा लागले चरणास। निमाली विषयवासना खास। करून नमन गेली निघून ती।।१५।। मोठे अरिष्ट टळले। देवे मज सोडविले। लचांड होते केवढे आले। परी ते निमाले दत्तकृपे।।१६।। पहिली जागा गिरीवरी। दुसरी वासिमांत अत्यादरी। तिसरी देऊळगांवाभितरी। श्रोते जनहो।।१७।। देऊळगांवी येता रामकृष्ण भगवान। गोष्ट आली घडून। गुलाबचंद मारवाडी ब्राह्मण। उतरले तयाचे गृही।।१८।। कन्या तयाची आजारी। विभूती दिली साजिरी। व्याधी केली दुरी। तया मुलीची ईशकृपे।।१९।। मग सोडून देऊळगांव। के ला अंदुरी राहण्या ठाव। दैवत तेथे महादेव। पूर्णातिरी असे ते।।२०।। अंदूरात पसरली बात। बैरागी आला ग्रामांत। शंकराचे देवालयात। आपुल्या येथे सुजन हो।।२१।। सर्व लहान थोर येऊन। करिती समर्था नमन। किती तेज सूर्यासमान। संताठायी या।।२२।। वृद्ध बाया बोलती। अंदुरा पुण्यवस्ती। तेव्हाच साधू रमती। चला दर्शना तयाच्या।।२३।। एकादशीस जागर। भजन ते रात्रभर। अन्नदान होय फार। अंदूरी ग्रामाते।।२४।। चातुर्मास केला अंदुरवस्ती। किती त्यांची गांवी महती। वाढली समर्थ योगे ती। श्रोते जन हो।।२५।। कीर्ती चोहोकडे पसरली। रामकृष्णाची चांगली। दर्शना दाटी होय भली। भक्तांची त्या।।२६।। तुळसाबाईने ऐकले कर्णी। समर्थ राहती अंदुरा लागुनी। म्हणून तेथे जाऊनी। घ्यावे दर्शन ते।।२७।। तुळसाबाईच्या कन्येचे। इसब बरे झाले पायाचे। डॉक्टर थकले उपचाराचे। रोग बरा झाला मौनीकृपे।।२८।। तू नच नेई दवाखान्यात। पौर्णिमेचे करी व्रत। बहु असे श्रेष्ठ तिथित। पौर्णिमा ती पहिल्यापून।।२९।। ऐकून बाबाचे वचन। विश्वास वचनी ठेऊन। चालविले व्रत गहन। पौर्णिमेचे ते।।३०।। पुढे हरिकृपेकरून झाला पाय छान। नच डॉक्टरचे प्रयोजन। समर्थ कृपेपुढे।।३१।। दुसरा चमत्कार खचित। नारायण सिंह राजपूत। राहे सिरसोलीत। समर्थ गावी

तो।।३२।। तयाची कांता लहानाबाई। उदर व्यथेने कष्टी पाही। शरण येता लवलाही। झाली दूर व्यथा पोटशूलाची।।३३।। सिरसोली सोडून। समर्थ चिखलीत आले जाण। ओळखण्या ब्रह्मखूण। पाहून भूमी पवित्र।।३४।। 'चि' नामे अक्षरांत। चिन्मय स्वरूप सतत। 'ख' नामे अक्षरी राहात। खग वाहन हरिरूपे।।३५।। 'ली' चा इतकाच अर्थ। लीन होऊन करा परमार्थ। मग साधेल ब्रह्माचा स्वार्थ। जे मूळ खचित सर्वांचे।।३६।। होता सण नागपंचमीचा। तसा थाट शिवपुजेचा। अकस्मात आला संत साचा। सुमुहूर्तावर सत्य।।३७।। सावकार काशीनाथ। धन खर्चिती संतकार्यात। नाम सप्ताह नंदादीप लावीत। अखंड शिवमंदिरी।।३८।। देवास म्हणे जोडून कर। त्वां दिले श्रीमंती वैभव थोर। न उपजो खरोखर। गर्व मज कोणे काळी।।३९।। श्रावस मासी शिवास। लाखोळी चाले निःशेष। तो पडले दृष्टीस। मौनीराज संत ते।।४०।। तव पूजा सारून। केले साष्टांग नमन। करिती नम्र भाषण। मौनी समर्थाप्रती।।४१।। देऊन आसन बसाया। दोन्ही कर जोडून पाया। विनवी परी संतराया। करावी कृपा ती गुरूवर।।४२।। तप केल्यावरी। एकदा मिळेल श्रीहरी। समुद्र तरवेल अत्यादरी। परी दुर्लभ संतभेट।।४३।। मौनीराज बसले। शिवमंदिरी वहिले। तव दर्शना जन पातले। चिखलीचे त्वरे करून।।४४।। दर्शन घेऊन जाती। मग करून आअति। नेले भोजनाप्रती। स्वगृही आप्पाने।।४५।। पायगुण साधु लागला। पुत्र आप्पासी देवे दिधला। संत सेवेने भला। याचे नाव संतसेवा।।४६।। पाच कन्या फक्त आप्पासी। नव्हता पुत्र एकही त्यासी। मौनीराज पायगुणे परीयेसी। पुत्र नामे सिद्धविनायक तो।।४७।। दोन वर्षे देवळात केली वस्ती। शंकराच्या पहा निश्चिती। आप्पाचे प्रेम बसले अति। मौनीराज चरणी ते।।४८।। सिद्धविनायक पुत्र भला। दीर्घायू करो श्री शंकर तयाला। घडो त्या करे ईशसेवेला। हा आशीर्वाद

लिहीतसे ग्रंथी।।४९।। रमले मौनीभगवान। आप्पाचे प्रेमास्तव जाण। शिवमंदिरात येऊन। वैरागीरूपे समर्थ ते।।५०।। महादाप्पाला संत मौनी पावला। कांता गयाबाईने जन्म दिला। कन्यारत्नाला। मौनीकृपे।।५१।। महादाप्पा एकदा रोगग्रस्त। कांता विनवी समर्थाप्रत। पति जाता मरून खचित। मग मी काय करावे समर्था।।५२।। म्हणून धरीले घट्ट चरणा। काही केल्या सोडी ना। आली समर्था करुणा। खुणविले येणे रीती तियेला।।५३।। मी नच देवा घरून आलो बाई। दैवा पुढे कोण जाई। मृत्यू न चुके कोणाही। कन्यके जाण तू।।५४।। मग दिले विभूतीला। दे पतीस खावयाला। व्याधी जाईल लयाला। ती हरिकृपे करून।।५५।। विभूती लावून दिली शरीरास। गुण आला महादाप्प्यांस। वर्णितो मौनीबाबास। धन्य धन्य संत ते।।५६।। टीक होती डोळ्यात। ती गेली अजिबात। रोगमुक्त केले गोपीनाथा प्रत। केवढा अधिकार बाबांचा तो।।५७।। पोट फुगण्याची बिमारी। गुंफाईची झाली दुरी। विश्वास तो बहुभारी। संत पायावरी तो।।५८।। विमल नामे कुमारी। एकदा झाली आजारी। निद्रा नच ती नेत्री। तया द्वयजणांच्या।।५९।। डॉक्टरांनी हात टेकले। आठ दिन जागून काढिले। स्तवन ते मांडिले। एकाग्रचित्ते।।६०।। समर्थ कृपा झाली। व्याधी दूर गेली। विमल अन्नपाण्यास लागली। अहो संतकृपेने।।६१।। विश्वास असावा खंबीर। तसा संत चरणावर। मग गुण ये सत्वर। असल्या सेवा दृढती।।६२।। तुकारामाच्या कन्येसी विंचू चावला। जाहली हताश। उतरला विंचू। आली मौनी दर्शनासी। निवारली भव व्यथा।।६३।। शके अठराशे चौसष्ठ सालाशी। निघाले दर्शना स्पष्ट। आप्पा बरोबरी एकनिष्ठ। मौनीराज चिखलीतून ते।।६४।। कार्तिक शुद्ध एकादशी। मुहूर्त पाहून छान परियेसी। निघाले क्षेत्र धामणगावांसी। ईशभक्त दर्शनाते।।६५।। व्यंकटेश पाहून। वाशीम स्थान दिले

सोडून। आले मंगरूळाकारण। जे आकोल्या जिल्ह्यामाजी।।६६।। श्री समर्थ बंधू येथे नोकर। हरिनारायण साचार। झाला आप्पांचा आग्रह फार। म्हणून आले तयागृही।।६७।। येतांच मौनीराज समर्थ। मिठी मारली कंठास। नेत्री प्रेमाश्रू वाहत। द्वयजणांच्या ते समयी।।६८।। हरिनारायण म्हणती। जसा भरत तू मजप्रति। बंधुराया निश्चिती। बहु दिवसांनी। भेटला तू।।६९।। मग सोडून पीर मंगरूळ। धामणगावांसी आले तात्काळ। समर्थ आणि सावकार केवळ दर्शनास्तव मुंगसाजीच्या।।७०।। धन्य धन्य मुंगसाजी संत। जन्मले अंध वंशात। नांव जगविख्यात। संतराज म्हणून त्यांचे।।७१।। ज्याला किंमत कळली। तयाची चित्तवृत्ति वळली। संत सेवेस्तव भली। समजल्या अंतरंग मग।।७२।। वैराग्य बाणले बाबाला। आले त्वरे चिखलीला। घेऊन संत दर्शनाला। सोडून धामणगावांला ते।।७३।। काढील्या जटा त्वरित। संत उपदेशे मानून खचित। राहिलेले सामान टाकीत। जाळून धुनीमाजी ते।।७४।। सोडून सर्व चिंता। भजा रामकृष्ण समर्था। न करा भवाची ममता। श्रोते हो अंतरी आपुल्या।।७५।।

।। श्री दासगणूचा वेडा श्रीरामलिखित श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ अध्याय सहावा समाप्त।।

।। श्री मौनीबाबास अर्पण।।



**श्री परमहंस रामकृष्ण मौनीबाबा यांनी चिखलीस निंबवृक्षाखाली अंगावरचे कपडे जाळले.**
**इ.स. १९४३ (शके १८६५)**

# ।। अध्याय सातवा ।।

श्री गणेशाय नमः।। श्री शंकराय नमः।। जय जयाजी पशुपती। नमन असो तुजप्रती। बुद्धी दे दीनाप्रती। काव्यास्तव शंकरा।।१।। पूर्वीपासून त्रिपुरारी। काशीत वस्ती खरी। पवित्र गंगातिरी। महत्त्व भारी शास्त्रामाजी।।२।। ठाव काशीत तुजला। परी नच करने एकट्याला। नंदीभक्त सान्निध्याला। राहे सर्वकाळ तो।।३।। शेजेची पार्वती दूर। ठेवून देवा क्षणभर। शिरी वाहसी गंगाभार। भक्ती तिची म्हणून।।४।। चिखलीत जरी रमला। तरी मौनीराज भक्त मिळाला। तुमच्या असे सेवेला। तव इच्छे शंकर प्रभू।।५।। शके अठराशे पासष्ठात। दिन शिवाचा साक्षात। महिना ज्याचा चैत्र। ऐसा सोमवार तो।।६।। तिथी प्रतिपदा जाण। ध्वजारोपण या दिवशी पूर्ण। होते भाविक हो सज्जन। आले दिगंबर होण्याते।।७।। घरोघरी गुढी तोरणे लाविली। लोकांनी चिखली माजी भली। सर्व आनंदले गल्लोगल्ली। अपार सुकाळ वाघांचा तो।।८।। कुणी पितांबर जरीचा। कुणी तसा येवल्याचा। गुढीस लावला साचा। गजबजले लोक सारे।।९।। सुवासिनींनी रांगोळ्या दारापुढे। तसे टाकिले गोमूत्राचे सडे। आनंद विलसे चहूकडे। लहान थोराते।।१०।। ऐसा मंगल समयाला। हा योगी चिखलीत प्रवेशाला। पाहून शुभ दिवसाला। घेण्या आत्मसुखाते।।११।। जवळचे सारे सामान। दिले गरिबांकारण। न मागताची जाण। येता मार्गाने श्रोते हो।।१२।। दयाळू भारी समर्थ। एकदा लुटविले गृह सत्य। आपले ते खचित। संसारी असता ते।।१३।। काशीनाथ आप्पाचे मळ्याला। गावच्या दक्षिण दिशेला। निघाले शांतता बघण्याला। मौनीबाबा समर्थ ते।।१४।। तेथे गोटे असती। काटेही बहु वसती। नसे मुंग्यांना भीती। गवत कंबरे इतके ते ठाया।।१५।। ऐसा दुर्धर भूमीवर। समर्थे केला नमस्कार। मग धूनी

बनविली सुंदर। टाकूनी वस्त्रे लावला अग्नी स्वकरे।।१६।। सर्व वस्त्रे भस्म केली। मग काया दिगंबर बनली। उदास भावे बहु शोभली। त्या वृक्षाठायी मौनीची।।१७।। निजती कांट्यागोट्यात। कांटे मोडिती अमित। जखमा होत शरीराप्रत। साहती शीत, उष्ण ते।।१८।। करिती चिंतनाला। सदा प्रभूपायाला। देहाचा लोभ न उरला। समर्थाते श्रोते हो।।१९।। हिवाळ्यात अंग उल्ले। रक्त वाहे ते चांगले। भेगांमधून भले। मौनी बाबांच्या।।२०।। उन्हाळा जरी असला। तरी न वसती सावलीला। जरी पावसाळा आला। तरी पावसात तीच गती।।२१।। पावसामुळे अंगा चिखल सारा। पाहून हा त्रास खरा। ईश्वरे विचार करून पूरा। काय केले ते ऐका श्रोतेजण।।२२।। बाबा वदती स्वमनी। मिळाली शांती चित्ता लागुनी। राहवे येथेच अनुदिनी। घ्यावया आत्मसुखाते।।२३।। धन्य धन्य वृक्षा तू होसी। चिंता दिली दवडून परियेसी। तू कल्पवृक्षची अससी। कलीयुगी या।।२४।। तव येथे जन अमित येती। बाबाते पाहून हळहळ करिती। व्यर्थची कष्ट देती शरीराप्रती। काय इंगित कळे ना।।२५।। नरजन्म ना विषयसुखास्तव। मनी आठवा केशव। गोड शेवट होय। अभिनव हरिच्या भजने नरहो।।२६।। या परी देह कष्टविता। दया उपजली दत्ता। झाली कसोटी आता। पुरी मम लेकराची।।२७।। तो चिखलीत श्रीमान। सावकार असे जाण। काशीनाथ आप्पा पूर्ण। लिंगायत वाणी वदती ज्याते।।२८।। आडनांव बोंद्रे ज्याचे। भक्त ते शिवाचे। घेती नाम सदा वाचे। भवसिंधू पार होण्याते।।२९।। त्यांचा पैसा सत्कर्मी खर्च। होतो बहूत सांच। त्यांचे नाव निघे जगीच। सतत श्रोते हो।।३०।। येऊन त्यांच्याच मळ्यात। समर्थे केला वास सतत। पाहून पुण्यभुमीप्रत। रमले तेथे श्रोते जन हो।।३१।। पाहून बाबांच्या स्थितीला। आप्पा बहु गहिवरला। नेत्री प्रेमाचा पूर आला। म्हणें करू व्यवस्था यांची।।३२।। हे न घेती अन्न जरी। मग मी असून भुवरी। श्रीमान घरचा खरी। तरी काय उपयोग।।३३।। कर्णापरी उदार। कलीत

आप्पा खरोखर। अन्नदाता एक भूवर। याचक जनाचा तो।।३४।। जे जे बाबा वदले। ते ते साच करून दाविले। म्हणून परमहंस संत नांवाजले। सत्यत्वामुळे कलीत।।३५।। कष्ट केले फार मौनी समर्थे। आपणांस तसे न होते। कावळा करी का हंसबरोबरीते। विचारून पाहा मनी आपुल्या।।३६।। सिरसोली पूर्वीची जन्मभूमी। चिखलीत रमले रामकृष्णस्वामी। पाहून ती अति पवित्र भूमी। अथवा आप्पांच्या भक्तिस्तव।।३७।। ज्या ज्या गोष्टी चांगल्या असती। त्या त्या या जन्मी मिळती। घ्यावी ना शंका तीळमात्र ती। कोणी पूर्वाजीताविषयी।।३८।। कुणाचे पाप आड येत। खाण्या अन्न न मिळत। जेथे संपत्ती वसत। तेथे वाण संततीची।।३९।। याच न्यायेकरून। बारिकरावा नसे संतान। चिंता करी अनुदिन। हृदयी पुत्रानिमित्ते।।४०।। मग वदे कांतेप्रती सत्वर। शुद्धभावे जा तू शरण झडकर। जे आहेत शांत फार। मौनीराज आपुल्या गावी।।४१।। दर पौर्णिमा वारीत। ये घेऊन स्व पतीस। यमुनाबाई ही खास। प्रेमभरे मठाते।।४२।। वाऱ्या केल्या सतत। दोन वर्षेपर्यंत। द्रवले हृदयी श्रीसंत। दिले भस्माप्रत सतीते।।४३।। आणिक वदले वाणी। देईल पुत्र शूलपाणी। परी विसरू नका देवालागुनी। हेच सांगणे तुम्हा।।४४।। जो देवास विसरतो। त्यास सुखाचा लाभ नसतो। संसारी दुःखी सदा तो। फजितीच सारी होय ती।।४५।। संतकृपे लाभ झाला। संततीचा तो भला। त्या यमुनाबाईला। पवित्र चिखलीमाजी।।४६।। देवाच्या सेवेहून। संतसेवा बहु कठीण। ऐसे वृत्त बिकट जाण। हरिभक्तीचे ते।।४७।। अहो, देवही हपापती। या संत सेवेप्रती। परी त्यांनाही दुर्लभ ती। मग मानवा कशी साधेल?।।४८।। देवाने लज्जा सोडून। केले बाळंतपण। चोखट्यागृही जाण। असून अंत्यज जातीचा।।४९।। पांडुरंगाचे गृही चमत्कार। घडला असे सुंदर। विश्वास संतपायावर। म्हणून गुण आला त्वरित।।५०।। पांढरा शुभ्र वृषभ छान। उजव्या नेत्री न दिसे जाण। डॉक्टर वैद्य आणून।

केले उपचार बहुतया।।५१।। डॉक्टर वैद्य थकले। उपचार बहुत मी केले। मम प्रयत्न फोल ठरले। समर्था सर्वस्वी।।५२।। तू दयेचा सागर। एवढा कर उपकार। पसरितो तुझ्या पुढे पदर। दे जीवदान वृषभाते।।५३।। समर्थ वदले वचन। मी नच आलो देवाघरून। अथवा न करी वैद्यक्रिया पूर्ण। मम भक्त पांडुरंगा।।५४।। परी ने धुनीतली विभूती। टाकी वृषभाच्या नेत्री। तीन दिन अहोरात्री। दिसेल दत्तकृपे तया।।५५।। विभूती नेऊन गृहासी। टाकिली वृषभ नेत्रासी। लागले दिसाया तयासी। विभूतीयोगे वृषभा।।५६।। आनंद चित्ती झाला। पौर्णिमा येता महिन्याला। पांडुरंग ये चिखलीत। संत दर्शनास्तव।।५७।। 'मित्रा' नामे डॉक्टर। होते चिखलीत खरोखर। तिचा मौनीवर विश्वास फार। झाले दुःख दूर। सत्वर समर्थ कृपे।।५८।। तिथी पौर्णिमा प्रत्येक मासी। डॉक्टरीन येत दर्शनासी। वंदून संतचरणासी। प्रसाद वाटे लहान, थोरा।।५९।। लावून विभूती कपाळासी। दूर गेला भ्रम परियेसी। कळले संत महात्म्य सर्वासी। खरेच बाबा अधिकारी ते।।६०।। विश्वास होता म्हणून। भ्रम गेला दूर पळून। समर्थकृपे तो जाण। त्या माऊलीचा विषुध हो।।६१।। मौनीराज अधिकारी श्रेष्ठ। आहे शके अठराशे पासष्ठ। फुले अक्षदा पाठवी स्पष्ट। मुलास्तव आरती वेळच्या।।६२।। लीलाने भाव ठेवून। ताईतांत अक्षदा फुले घालून। दिले कंठात बांधून। जाहले रडणे बंद कुमाराचे।।६३।। जसी ज्याची भक्ती असेल। तसेच श्रोते हो घडेल। नच त्यांत अंतर पडेल। सेवा करून घ्या अनुभव।।६४।। दत्त आशा झाली। स्वतनू कष्टविली। म्हणून संत पदवी मिळाली। तपबळे कठीण ती।।६५।।

।। श्री दासगणूचा वेडा श्रीरामलिखित श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ अध्याय सातवा समाप्त।।

।। श्री मौनीबाबास अर्पण।।



श्री परमहंस रामकृष्ण मौनीबाबांकरिता श्री काशीनाथ आप्पा यांनी झोपडी बांधून दिली.
इ.स. १९४४ (शके १८६६)

# || अध्याय आठवा ||

श्री गणेशाय नमः।। जय जयाजी शंकरा।। नमन असो तुजहरा। गौरीपती नग्न दिगंबरा। साष्टांग भावे।।१।। तू न राहसी ग्रामांत। तुज आवडे स्मशान सत्य। काकी टिके वैराग्य खचित। स्मशानीच देवा।।२।। तुझा ज्या शिरी हात। तो होय विरक्त ऐसा प्रभू तु समर्थ। कृपाळा भक्त वत्सला।।३।। ते जरी नग्न फिरले। परी विषय न छळे। कापे काळ तो वितळे। संतदृष्टी पडता।।४।। श्रोते, तुम्ही व्हा सादर। लक्ष ठेवा संतकथेवर। तेणे तुटून बेडी भवरूपी खरोखर। व्हाल मुक्त जन्ममरणांतूनी।।५।। कृपाळू संत फार। प्रसन्न होण्या न उशीर। सत्य सेवा ती खरोखर। असली आपुली जरी।।६।। उदार संत कसे। चरित्र पाहता दिसे। उशीर तो नसे। संतास देण्याचा।।७।। उघड्यावर समर्थ राहती। पुढे आप्पा बांधून देती। झोपडी राहण्या बाबांप्रती। स्वखर्चाने ती आपुल्या।।८।। साधू असो वा संसारी। गृह असावे अत्यादरी। राहू नये उघड्यावरी। हीच रीत खरी समस्तांची।।९।। आत्मा नांदे विबुध हो शरीरी। पर्णकुटीच मानावी खरी। आपली तनु अत्यदरी। पाहा शोधून अंतरी। सूक्ष्म दृष्टीने।।१०।। मंदिर देवास्तव जाण। बांधावे लागे खर्चून। स्वतः पदरचे धन। नियम म्हणून पूर्वीचा तो।।११।। तपाते प्राधान्य पूर्वीपासून। म्हणून तेच मांडिले जाण। बाबांनी श्रोते अति छान। निंब वृक्षाखाली पूर्ण ते।।१२।। पायास खडे-गोटे रूतती। डास, चिलटांची अति वस्ती। परी बाबा नच पर्वा करिती। साहती कष्ट देवास्तव।१३।। मौनवृत्ती असे कठीण। कुणासी न करिती भाषण। गेला जरी निज प्राण। नच सोडी नियमाते।।१४।। सर्व संत

जगांत झाले। परी ज्या जे योग्य वाटले। तेच मार्ग त्यांनी आचरले। नियम जगाते दाविले उध्दरण्या।।१५।। परमहंस दीक्षा बाबांची। वस्त्र नच चिंधी मग कशाची। ढुंगणास्तव ती साची?। नग्न स्थिती तयांची सर्वकाळ।।१६।। आप्पाचा भाव निर्मळ। रूकार दिला तात्काळ। निवाली आज तळमळ। मी केवळ भाग्याचा किती।।१७।। लागलीच करून तयारी। सहा टिनाची झोपडी बरी। दिली समर्था खरोखरी। करून साजिरी आप्पाने।।१८।। शके अठराशे सहासष्ठांत पूर्ण। प्रवेश केला झोपडीकारण। एकच फुलपात्र जाण। पिण्या जीवन दिले ते।।१९।। पर्णकुटीत राहती सप्रेम। घेती श्रीहरीचे नाम। मुझे क्या दुनिया से काम?। भजो भय्या सदा राम ही राम।।२०।। देव नांदतो चिखलीत। काशीनाथ आप्पाचे मळ्यांत। झाले असे जगी माहीत। लहान थोरा गांवो-गांवी।।२१।। विश्वास ठेवून नारीनर। दर्शना येती लवकर। बाबांच्या चिखलीच्या मठावर। शुद्ध कल्पना ठेवून मनी।।२२।। दर्शन घेतल्या मनांतून। व्याधी करी दूर मौनी भगवान। समजली प्रत्येकास्तव पूर्ण। शीघ्रगती महती बाबांची।।२३।। वाचून पहा चरित्र बाबांचे। आयुष्य दिले साचे। टाळून दुःख पाहा तयाचे। नाम देतो ग्रंथातरी।।२४।। कोथळी ग्राम सुंदर। तालुका ज्याते मलकापूर। बुलढाणा जिल्हा खरोखर। तया कोथळीते श्रोते जन हो।। २५।। तया डॉक्टर ग्रामांत। एक लक्ष्मण धिर्णीकर। राहत असे खरोखर। निर्मलाबाई स्त्री ज्याते।।२६।। डॉक्टर लक्ष्मण आजारी। पडला दैवयोगे खरोखरी। नच शुद्धी त्याला तीळभरी। वाटे जातो शीघ्र मृत्यूपंथा।।२७।। मग निर्मलाबाई धावा करी। समर्थांचा तो सत्वरी। ठेवी कुंकू कपाळीचे निर्धारी। निष्ठूर नच होई मजविषयी।।२८।। समर्थ वदे निर्मला पाहून। करील कृपा दत्त भगवान। तव पतीते येईल गुण। न

करी अनुमान चित्ती तुझ्या।।२९।। मौनीकृपा झाली त्वरित। व्याधी पळाली खचित। सोडून शरीराप्रत। डॉक्टराची संत कृपेने।।३०।। समर्थ कृपा असल्यावर। नच काळाचा तोही डर। विश्वास तो बलवत्तर। संतवचनी सर्वकाळ पाहा।।३१।। निर्मलाबाईस पावले समर्थ। दिला पुत्र मधुसूदन यथार्थ। पाहूनी तिचा परमार्थ। ऐका ते चरित्र एकाग्रमने।।३२।। नवस केले बहुता परी। सदा पूजी शिवगौरी। संतती नच स्थिर संसारी। हेच दुःख असे सर्वस्वी।।३३।। पुढे बाईस पुत्र झाला। लगेच नवस फेडिला। नथबेडी घातली पुत्राला। तया दाम्पत्याने त्वरे।।३४।। होता त्याला बारा दिन। नाम ठेविले मधुसूदन। म्हणती मौनीराजे दिला पूर्ण। पुत्र चांगला आपणाते।।३५।। याच न्याये सुधाकर ब्राह्मण। झाला रोगत्रस्त पूर्ण। नळसंग्रहणी रोग दारूण। ज्या ते सर्वदा असे।।३६।। सुधाकर म्हणे संतराया। निरोगी नच मम काया। काही सांगा उपाया। होण्या व्याधी दूर मम ती।।३७।। बाबा वदले धुनीत टाक। तूप नारळ निःशंक। पाच वाऱ्या करी देख। तव व्याधीस्तव सुधाकर।।३८।। पाच वाऱ्या केल्या पूर्ण। दिले धुनीत तूप, नारळ टाकून। गुण आला संतकृपेकरून। त्या विप्र सुधाकराते।।३९।। संतचरणी नच ठेवता भाव। गुण कोठून ये अभिनव। फुटकी असल्या नाव। तरेल का मनुज त्यामाजी।।४०।। चिखलीत नथ्थू मिस्त्री सुतार। त्याची स्त्री चंपा नामे सुंदर। होती एकदा गरोदर। ऐका श्रोते जन हो।।४१।। रोगी पहिलेच शरीर। पुन्हा अशक्त खरोखर। होऊ लागल्या वेदना अनिवार। साध्वीस न धरवे धीर तो।।४२।। नथ्थू मिस्त्री घाबरला। हाय हाय म्हणे जगत्पाला। कोणत्या करू उपायाला। न सुचे मला एकही।।४३।। तो सहज बाबा फिरत। गेले तयाच्या गृहाप्रत। पाहून संता झाला मुदित। टाकिले बसाया आसन

ते।।४४।। दृष्टीस पडता समर्थ मौनी। तीर्थ दिले चरण धुऊनी। प्रसूत झाली त्या क्षणी। समर्थकृपेने ती।।४५।। कन्या झाली सुंदर। शारदा नाम छानदार। ठेविले करून विचार। मौनीराज भक्तांनी ते।।४६।। चरणाचे देता तीर्थ तया। माऊली ते पिण्याप्रत। कां झाली त्वरे प्रसूत। करा विचार मनी विबुध हो।।४७।। म्हणून विश्वास धरा संतचरणी। गेल्या एकदा लोपूनी। पुन्हा नच दिसती नयनी। काही केल्या संत ते।।४८।। संत लोपून गेल्यावर। मग बांधिती भव्य मंदिर। धन देऊन स्वखुषीने खरोखर। वाढण्या महंती साधुची ती।।४९।। जिवंतपणी ओळखून न जाण। मग चाले सांड समाधीवरूनी। तसीच करी नाकघासणी। म्हणे मी पापी बहु असे।।५०।। संत सजीव जगी असती। न दे चटणी भाकर ती। मागे खूप अन्नदानाप्रती। करती वर्गणी घरोघरी।।५१।। संताची किंमत हृदयात। वागता भक्त हो खचित। ईश्वररूपी साक्षात। संत असती भगवान ते।।५२।। बाबा होते दोन वर्षे उपाशी। आपणा नच होय एकादशी। विबुध हो सत्य परियेसी। लागे खाण्या भगर, केळी ती।।५३।। बाबांची समदृष्टी भावना। पुरुष, स्त्री हरिरूप दिसे नयना। विबुध हो उमजे मना। घ्या संतखुणा चित्ती आपुल्या।।५४।। उपाशी राहून बाबांनी। दिला पाक स्वकरे करूनी। सोबत्यास पूर्णपणी। सातपुड्या पर्वती।।५५।।

।। श्री दासगणूचा वेडा श्रीरामलिखित श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ अध्याय आठवा समाप्त।।

।। श्री मौनीबाबास अर्पण।।



श्री परमहंस रामकृष्ण मौनीबाबा व श्री परमहंस परशरामबाबा पिंपळोद यांची
श्री श्यामराव देशमुख यांचे घरी भेट. इ.स. १९४५ (शके १८६७)

# || अध्याय नववा ||

श्री गणेशाय नमः।। श्री शंकराय नमः।। श्री सरस्वते नमः।। श्री म्हाळसाकांताय नमः।। श्री नवग्रहाय नमः।। श्री गुरूभ्यो नमः।। जय जयाजी अत्रीत नया। नमन असो तुम्हा सदया। करा कृपादृष्टी दिनावरी या। मायबापा तुम्ही सर्वकाळ।।१।। तीन शिरे, सहा हात। नाम ज्याचे श्रीदत्त। अखंड मनी ध्यात। भक्त सहृदयात नामावळी।।२।। बाबा चिखलीत रमती। तो एकदा आले चित्ती। संत भेट घ्यावी ती। परशराम संताची।।३।। समर्थ आले पिंपळोदात। शके अठराशे सदुसष्ठात। तालुके दर्यापुरात। जिल्हा अमरावती त्या ते।।४।। संत घरा येती जरी। दिवाळी दसरा अत्यादरी। वदली तुकाराम वैखरी। गाथ्यामाजी पूर्ण ती।।५।। गावात खबर कळली। मौनीराज आली माऊली। परशराम भेटीस्तव भली। आपल्या ग्रामामाजी ती।।६।। दर्शना आले सत्वर। गावांतील ते नारीनर। घेऊन लेकरे कडेवर। आले शामरावागृही ते।।७।। सोडून कामधंदा घरचा। संतदर्शनी आज साचा। घेण्या लाभ भेटीचा। सर्व येती त्वरेने।।८।। पिंपळोद गाव पंढरपूर। म्हणती निवृत्ती, ज्ञानेश्वर। शिव, विष्णू अवतार। दिसे आपणा नेत्री।।९।। 'मन्या मन्या' म्हणती। उपासी का तिष्ठती। मम भक्त निश्चिती। कळे आपणा दोघा ते।।१०।। परशराम मुखी घास घालीती। रामकृष्ण मौनीबाबाप्रती। तसेच मौनी समर्थ निश्चिती। घालती घास परशरामा।।११।। परशराम मौनी संत। एकरूप साक्षात। नमन करूनी तयाप्रत। वळतो कथेस्तव त्वरे।।१२।। जसी ज्याची

भावना असेल। त्या प्रतीच फळ मिळेल। हे पूर्वी संताचे बोल। पहा तयाची अभंगवाणी।।१३।। भगवान नामे एक भक्त। राहे खामगावांत। जगताप आडनाव शोभत। जो पुत्र यशवंताचा।।१४।। मंगळवारी निजला। देवघरात वहिला। पहा चमत्कार काय झाला। ऐका भक्तजन हो।।१५।। वाजले दुपारी तीन। गेले स्वप्नी मौनी भगवान। वदले तया वचन। येणे रिती विबुध हो।।१६।। शकुंतला नामे पत्नी तव। पडली कुपांत नच कळे ठाव। पाण्याचा तो अभिनव। हो जागा लवकरी तू।।१७।। स्वप्नी भविष्य कथिले। परी तया वृथा वाटले। फिरण्या जावे वहिले। आले मनी भगवानाच्या।।१८।। शकुंतला गेली पाण्यासी। तो पोहरा अडकला कपारीसी। गेला झोक परियेसी। पडली अचानक कुपामाजी ती।।१९।। पाण्याला नच पाहा अंत। मौनीबाबा धाव धाव त्वरित। होतो मम प्राणांत। पाव त्वरे मज श्रीहरी।।२०।। धावा तिचा ऐकून। विश्वरूपी मौनी भगवान। शकुंतला काढिली विहिरीतून। परी नच प्राण गेला तो।।२१।। भगवान जगताप। मग उमजे मनी आपोआप। मौनी खराच मायबाप। भक्ताचा तो असे।।२२।। बाबांस कळे भविष्य समस्त। परी कुणा न सांगत। मायिक त्या जनाप्रत। लागे लचांड ते पाठीमागे।।२३।। संतकथेवर लक्ष ठेवा। न कळेल देह जाईल केधवा। घ्या मौनीकथेस्तव धावा। सोडून संसार तो।।२४।। ज्या असेल खरी भावना। त्यासीच मौनी पावे जाणा। किंमत काय दांभिकांना। मौनी समर्थाची ती।।२५।। शालीग्राम भक्त भाविक। वसे भोन ग्रामात एक। जळगाव तालुका निशंक। जिल्हा बुलढाणा ते।।२६।। दोन्ही पती-पत्नी दुःखी भारी। मौनी समर्था पाव सत्वरी। दे पुत्र आम्हा एक

तरी। माय, बाप तू दिनाते।।२७।। या परी करी स्तुती। तो नवसा पावले निश्चिती। मौनीराज शीघ्रगती। काय वर्तले ते ऐका।।२८।। नानीबाईस लोटले नवमास। दाविले स्वप्न तिस। की बसले समर्थ निःशेष। पाळण्यात येऊन ते।।२९।। जागी होऊन सांगे स्वप्न। झोक्यात मौनीरत्न। बाबा देखिले प्रसन्न। झाला शुभ शकून तो।।३०।। झाला पुढे पुत्र नववे मासी। आनंद बहु पाटलासी। नाव ठेवू आणून बाबासी। प्रिये आपुल्या पुत्राचे।।३१।। पुढे आणून समर्था गृही। पुत्र मांडीवर दिला तोही। म्हणती गुरूराज आई। तुमचाच प्रसाद हा असे।।३२।। समर्थे नाव ठेविले। वासुदेव रत्न भले। शालीग्रामाते दिले। पाहून भाव त्यांचा तो।।३३।। सकाम निष्काम भक्त दोन। निष्काम एखादाच जाण। पृथ्वीत असेल पूर्ण। या श्रोतेजन हो।।३४।। निष्काम भक्त देखिला। काशीनाथ आप्पा तो भला। चिखलीमाजी चांगला। शैवपंथी तो।।३५।। देता बळेच वरदान। समर्थ तयाकारण। परी नच घेती आप्पा पूर्ण। कळेल कशी भक्ती ती।।३६।। मौनीराज वदती आप्पासी। प्रसन्न झालो मी तुज सी। माग जे तव मानसी। असेल ते भक्ता।।३७।। मौनीराज प्रसन्न का झाले। की याचे चित्त पाहावे वहिले। येणे मिषे ते चांगले। कळेल मग इंगित ते।।३८।। ठेवून संतचरणी शिर। डोळ्यातून अश्रू भूंवर। गळती स्पष्ट सत्वर। तसा गहीवर चित्ती आप्पांच्या।।३९।। समर्था दिले सर्वही। इच्छा मुळीच नाही। तुझी मूर्ती मम नेत्री पाही। असो सर्वकाळ ती।।४०।। तुम्ही नच जावे सोडून। द्या मजसी वचन। न करिता अनुमान। समर्था दीनाप्रती।।४१।। मजसी माग म्हणता येधवा। तुम्हा संताची घडो सेवा। हेचि आवडी मम जीवा।

आण तव पायांची ती।।४२।। मग ऐकून वचन। गहिवरले मौनी भगवान। धन्य धन्य तू सात्त्विक पूर्ण। भक्तवरा असशी काशीनाथा।।४३।। दिले मग वरदान तयासी। नच जाय मी सोडून तुजसी। हो त्वरे मम वचनासी। करी न अनुमान चित्ती तू।।४४।। पाहा केवढे आप्पा चतूर। ठेवले मस्तक चरणी लवकर। उभे जोडून दोन्ही कर। समर्थापुढे ते।।४५।। यासीच म्हणावे निष्काम भक्त। समर्थ गोविले खचित। भक्तीरूपी पाशांत। दृढ ते समयी।।४६।। प्रेमाचे मजबूत लावले दोर। समर्था हालण्या नच तीळभर। करून तो पूर्ण विचार। तया हरिहर भक्ताने।।४७।। म्हणून समर्थ तेथेच रमती। भक्ती पाहून निष्काम ती उगीच न राहती। बाबा चिखलीत ते।।४८।। घ्या अनुभव केवळ। चित्ती आपुल्या तो।।४९।।

।। श्री दासगणूचा वेडा श्रीरामलिखित श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ अध्याय नववा समाप्त।।

।। श्री मौनीबाबास अर्पण।।



**श्री परमहंस रामकृष्ण मौनीबाबांचा चिखली येथील पहिला मठ**
**इ.स.१९४६ (शके १८६७)**

# || अध्याय दहावा ||

श्री गणेशाय नमः।। जय जयाजी ज्ञानेश्वरा। तू विष्णूरूप खरा। ज्ञानाचा मुगुट बरा। योग्यामाजी शोभसी तूं।।१।। जन्मून कलीत। करून दावी भक्तीप्रत। चालण्या मार्ग खचित। पुढेही भक्तिचा तो।।२।। तो मार्ग संतांनी चालविला। ऐका कथितो तुम्हाला। द्या कर्ण संतकथेला। सोडून आळस तो।।३।। भावभक्तिची जरूरत। असे मौनी समर्थाप्रत। मम बोल माना खचित। हृदया तुमच्या ते।।४।। भाव न ठेवाल संतचरणी। न चुके जन्ममरण कहाणी। होईल थोर ती हानी। नरजन्माची आपुल्या।।५।। मौनी भगवान ब्रह्मरूप। निमाल्या अवस्था खूप। 'मौनी मौनी' हेच जप। करता कळे भक्ताते।।६।। ॐ मौनी म्हणून। रामकृष्ण घेता पूर्ण। नाम अति गहन। श्रेष्ठ सर्वाहून ते।।७।। भावे करावा मौनीचा जप। त्या योगे सर्व नासे पाप। सहज जाती त्रिविध ताप। जन्ममरण फेरा दूर होय।।८।। मौनी मौनी करिता उच्चार। होय सर्वाठायी जयजयकार। अपयश नच तीळभर। ये कुठेही तया भक्ता।।९।। वृक्षछायेस बसे नर। थकता ती झडकर। तेविच संसारिका खरोखर। संत छाया ती विबुध ही।।१०।। कुणी विचार करिती। होईल सेवा आज न काल ती। नच आयुष्य आपले हाती। सूत्रधारी नारायण तो।।११।। मौनीराज हेच समजून। केला सर्वस्वी त्याग पूर्ण। होऊन परमहंस दीक्षा जाण। काढीला मार्ग तो देवाचा।।१२।। तप अमित झाले। दत्ताते कोडे पडले। मग ईश्वरे काम केले? ऐका भक्तजन हो।।१३।। शिरून आप्पाचे हृदयी। द्या मठ बांधून झोपडीठायी। मग भजन होय तेही। पौर्णिमेस प्रत्येक मासी।।१४।। शके अठराशे सदुसष्ठांत। होते बाबा त्रास भोगीत। देवास्तव अमित। पर्णकुटीमाजी तो।।१५।। हे

पाहून दुःख अनिवार। आप्पास दाटे गहिवर। जोडी आपुले दोन्ही कर। समर्थापुढे तो।।१६।। करी विनवनी समर्थाची। इच्छा झाली मम मनाची। देतो करून सोय मठाची। राहण्यास्तव तुम्हाते।।१७।। निर्मळ भाव ओळखून। दिला रूकार पूर्ण। तया आप्पास्तव जाण। मठालागी समर्थे तो।।१८।। ऐकून समर्थ वचन। आप्पा झाले हर्षमान। दिवस आजचा धन्य। दिली आज्ञा समर्थे मज।।१९। आप्पाने करून विचार। शुभ तिथी, नक्षत्र, वार। पाहून मुहूर्त सत्वर। लावले काम मठाचे।।२०।। गांवच्या दक्षिणेस मठ सुंदर। लावले मजूर कामावर। अति असती जे चतूर। कामामाजी।।२१।। चालले काम जोरांत। आप्पाचेंच मळ्यात राहण्या बाबाप्रत। त्यांच्या मठाचे ते।।२२।। मठ बांधिला अति छान। वर पत्राचे ते टीन। कमानी त्या तीन। मुख ज्याचे पूर्वेस ते।।२३।। लावून खर्च अनिवार। केला मठ तो तयार। आप्पाने मग सत्वर। राहण्या सुंदर बाबास्तव।।२४।। खडी रंग दिला तयासी। विचार करून मानसी। आणू मठात परियेसी। बाबांना आता।।२५।। नथमल मारवाडी भाविक फार। दिले घंटे दोन सुंदर। एक आत एक बाहेर। असे मठी बाबांच्या।।२६।। एकदा भेटता संतासी। काय मागावे त्यासी। विचारा संतसेवकासी। काशीनाथ भक्ताते।।२७।। मी मठाचा कर्ता म्हणेन। तर जिव्हा झडेल पूर्ण। तव पायाची वाहतो आण। समर्था जाणा या काळी।।२८।। ऐकूण आप्पाचे वचन। हांसले खूप रामकृष्ण। नच भक्त तुज समान। काशीनाथा महीमाजी।।२९।। तू पूर्व जन्मीचा जनक असती। किती वर्णू तव भक्तीसी। उपमा नसे तुजसि। कलीत दुसरी ती।।३०।। तव भक्ती पाहिली म्हणून। केले वास्तव्य चिखलीत जाण। हीच सांगतो तुज खूण। ठेव लक्षांत भक्ता ही।।३१।। मग मोठ्या विनयाने। आप्पा घाली लोटांगणे। आता उशीर नच करणे। चला मठी आज तुम्ही।।३२।। शके अठराशे अडुसष्ठात। बाबा

आले आनंदात। दिन पाडव्या निमित्य। मठी राहण्या ते।।३३।। धन्य धन्य सावकार। काशीनाथ तो साचार। गांवी ठेविला परमेश्वर। बांधून मठ स्वखर्चाने तो।।३४।। सुवासिनी निघाल्या त्वरित। मौनी समर्था पाहण्याप्रत। भव्य कुंकू कपाळी शोभत। जुन्या रीतिसम ते।।३५।। बर्फी खडीसाखर कुणी घेत। कुणाच्या शोभे नथ नाकात। कुणी बनारसी नेसत। साडी जरीची ती जनहो।।३६।। मोठे श्रीमंत सावकार। होते संता बरोबर। निघाले ते खरोखर। मठाकडे जन हो।।३७।। वाजंत्री पुढे वाजती। त्वरे मठात येती। हर्ष आप्पांच्या चित्ती लागे नाचाया प्रेमभरे।।३८।। संत येता मठावर। मग केला विचार। चौरंग मांडून छानदार। वरी बसविले समर्थाते।।३९।। तांब्याचे गंगाळ जड भारी। भरले गरम पाणी अत्यादरी। घातली स्नाने आपुल्या करी। समर्थास्तव ती।।४०।। तशा भोवती मठाच्या। गुढ्या लाविल्या साच्या। सर्वांची खुंटीत वाच्या। पहा समर्थ स्तुतीने।।४१।। मग बसाया आसन। टाकिले बहु किंमतीचे छान। आरती भक्त करिती जाण। सप्रेम ती मठामाजी।।४२।। एक पुष्पांजली म्हणत। नमस्कार एक करीत। ''मौनी मौनी'' गजर होत। तया मळ्यात आप्पाच्या।।४३।। आप्पा सात्त्विक फार। म्हणून रमले समर्थ गुरूवर। आप्पाच्या मळ्यात खरोखर। भाविक भक्तामुळे ते।।४४।। मौनी समर्थाचे चरित्र। दासगणूकृपे मी लिहीत। येऱ्हवी। गधडा निश्चित। जाणे सर्व विश्व माने।।४५।।

।। श्री दासगणूचा वेडा श्रीरामलिखित श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ अध्याय दहावा समाप्त।।

।। श्री मौनीबाबास अर्पण।।



**श्री परमहंस रामकृष्ण मौनीबाबांनी पैनगंगेची विनंती करता आलेला पूर ओसरला.**



श्री परमहंस रामकृष्ण मौनीबाबांचा धावा करताच भालचंद्र आप्पा आजारातून बरे झाले.

# || अध्याय अकरावा ||

श्री गणेशाय नमः। जय जयाजी पांडुरंगा रुक्मिणीपती। नमन तुज असो श्रीपती। बुद्धी द्यावी दासाप्रती। मौनी काव्य रचण्याते।।१।। तूं निर्गुण सगुण एकच। तसे समर्थ दिसती साच। ज्ञान, वैराग्य, बोध चित्तातच। विलसते सदासर्वदा।।२।। निर्गुणातून सगुणांत। भक्तास्तव आला खचित। देशी दर्शन तयाप्रत। तशीच रीत समर्थाची।।३।। तुझी समदृष्टी भक्तांवर। तोच येथे असे प्रकार। दिसे नयना खरोखर। निष्ठावंत भक्ताने।।४।। ज्याने पाहिला ना अंत। त्याच्यावर होती कृपावंत। मायबाप ते संत शिकवण समर्थाची।।५।। समर्थ मठी येऊन। वाटे करावे भजन। तसेच ते जागरण। येता पौर्णिमा प्रत्येक मासी।।६।। आश्विन पौर्णिमेस। येती भक्त मठास। मुहूर्त पाहूनी निःशेष। केले सुरू वाऱ्याते।।७।। भजन करून प्रत्येक मासी। तूप, नारळ टाकीत धुनीसी। ते समर्थप्रत परियेसी। विबुध जन हो।।८।। श्रीमान काशीनाथ। केला विचार चित्तात। भक्त भजना येत। कुणा न पुरे जागा ती।।९।। श्रीमान बोंद्रे काशीनाथ। दत्तू, शिवाप्पा जाण खचित। पंधरा टीन देत। दुज्या मठास्तव तो।।१०।। मठाशी चालविले काम। मुखी सर्वाचे राम। नच घेऊ आम्ही आराम। अहर्निशी तो कदा।।११।। यापरी मठ तयार झाला। पूर्व पश्चिमेस दरवाजे त्याला। पहिल्या मठाचे शेजारला। उत्तर दिशेस दरवाजे त्याला। पहिल्या मठाचे शेजारला। उत्तर दिशेस गांवाकडे।।१२।। दुसरा मठ तयार तो झाला। शके अठराशे शहात्तराला। म्हणून लिही वर्णनाला। मी समर्थकृपेने।।१३।। संतदर्शना जो गेला। विन्मुख नच परतला। पाहातसे नेत्री बाबाला। प्रत्यक्ष चिखलीत मठावरी।।१४।। एकदा पाणी नच पडले। त्यामुळे धान्य महाग झाले। चहूं मुलूखी

ते भले। झाला सर्व हाहाकार।।१५।। पिकाशी वाढण्या नच जोर राहिला। दोन रुपये लागली पायलीला। उपास घडे गोरगरीबाला। एकोणीसशे पन्नास साली।।१६।। तव समर्थाते वदती जन। कधी येईल पाऊस सांगा खूण। समर्थे दाखविली बोटे तीन। सर्वजण हर्षले मनी।।१७।। याचा अर्थ हाच केला। पाऊस येईल तिसऱ्या दिवसाला। बाबांचा बोल खरा झाला। मग वदती धन्य संत हा।।१८।। करितो सामुग्री पुण्याची। देवाला आली दया साची। अतिवृष्टी झाली पावसाची। आले पूर नदीनाल्यांना।।१९।। साखर, शिरण्या नच मिती। आनंद झाला बहु चित्ती। मग लोक लागले चरणाप्रती। चिखलीचेही भाविक सारे।।२०।। जन करिती जयजयकार आणि मौनीनामाचा गजर। म्हणती असे दया सर्व विश्वावर। पाडले चांगले पाणी ते।।२१।। पैनगंगा वाहे दुथडी। परी होती अति गोडी। मौनीदर्शना जाण्याची तातडी। कां की वारी नित्यनियमांची।।२२।। आठ वाजता रात्रीस। निघाले भाविक दर्शनास। मौनीबाबांच्या चिखलीस। एक भाव करूनी।।२३।। वदती वृद्ध जन त्यासी। पूर आला पैनगंगेसी। नका जाऊ तुम्ही चिखलीसी। करा येथूनच नमस्कार भावे।।२४।। परी न ऐकले वचनाशी। बोलतो आम्ही न सोडू नेमासी। मारो अथवा तारो मौनी आम्हासी। चुकू न देऊ वारीला।।२५।। सर्वात नियम होय मोठा। तेणे साध्य सर्वही वाटा। नियम न ज्या पुरुषां तो करंटा। ऐसी साक्ष पुराणी।।२६।। यापरी पुरामाजी प्रवेश केला। घेऊनी मौनी नामाला। धोत्र्याच्या भाविकांनी भला। फोडिला टाहो मौनी मौनी।।२७।। जो माझी सोय जाणतो। मी त्यास कर देतो। भवरूपी नदीमाजी तो। ऐसी वाणी देवा तुमची।।२८।। देवा! आम्ही वारीकारण। येतसे चिखलीस जाण। मोडी ना नियमां पूर्ण। आमच्या तू दयाळा।।२९।। इकडे काय जाहले मठावर। आंतरसाक्ष मौनी गुरूवर। कळला तयासी विचार। की येती दर्शना मम भक्त।।३०।। गुप्तपणे जाऊन गंगेवर।

जोडून तीस द्वयकर। जगजीवनाची मांडली स्तुती थोर। प्रेमभरे एकभावे ती।।३१।। गंगे मी मौनव्रत धरिले। कोणाप्रत भाषण नच केले। आज पावेतो भले। तरच दे रस्ता मम भक्ता।।३२।। यापरी करून भाषण। बाबा परतले तेथून। अति शीघ्रगती करून। चिखलीत गुप्तरूपे।।३३।। भक्तांनी प्रवेश केला पुरांत। परी पाणी थोडेच नदीत। भिजली ना धोतरेही खचित। त्यांची मौनीकृपेने ती।।३४।। जेव्हा आले ऐलथडी भक्त। तेव्हा मागे परतोनी पाहात। तयी पूर चालला अमीत। नवल वाटले भारी।।३५।। आपल्या शिरी मौनीराज। उभी देखिली मोटार सहज। भाविकांनी ती पाहिली मौज। वदे त्यांना ड्रायव्हर तो।।३६।। मी थांबलो मोटार घेऊन। पुरानिमित्ते आहे बसून। तुम्हास मात्र पुरांतून। मार्ग कैसा मिळाला।।३७।। वदति ते भाविक त्याला। पाणी थोडे होते नदीला। मौनीबाबांनी तारीले आम्हाला।।३८।। ज्या वेळी भक्त आले चिखलीला। तेव्हा मौनीबाबा रस्त्याला। उभे देखिले आनंद वर्तला। अतिशयच त्यांना।।३९।। बाबा वदती तुम्ही बसले होते अडून। म्हणून मी गेलो होतो येथून। प्रार्थना गंगेची तुम्हास्तव करून। परतलो आत्ताच।।४०।। मग केला नमस्कार। अवघ्यांनी मौनीचरणावर। झाली वारी यथासांग साचार। धोत्र्याच्या भाविकांची ती।।४१।। नेम सर्वाचा सार असे। नेमापाशी देव वसे। ऐसी प्रचिती भक्ता आलीसे। धोत्र्याच्या त्यावेळी।।४२।। किन्होळा ग्राम एक। कलाल तेथे भाविक। दरिद्र्ये पीडिला देख। नच अन्न वेळेवरी ते।।४३।। विचारून मानसी। निघाले दर्शनासी। समर्थ रामकृष्ण पाहण्यासी। चिखलीस्तव ते।।४४।। येऊन नमिला संत। मग वदति आमुचा अंत। वाटे झाला कल्पांत। गरीबीमुळे तो।।४५।। सोयरीक न ये पुत्राला। प्रल्हाद नामे तयाला। नामदेव विनवी संताना। जो पिता प्रल्हादाचा।।४६।। तव संत वदती गरीबीत। लग्न होय का खचित?। कुणी नच

कन्या देत। हे ठायी तुला नामदेवा।।४७।। तेव्हा पितापुत्र विनवित। तव वचनी विश्वास सतत। बोला बोला त्वरित। आशीर्वाद वदनी तो।।४८।। समर्थ दयावंत भारी। लग्न होय निर्धारी। उशीर नच लागे तीळभरी। श्री दत्तकृपेकरून तो।।४९।। पिता, पुत्र गेले आशीर्वाद घेऊन। त्वरे झाले प्रल्हादाचे लग्न। धन्य समर्थ संत नग्न। झाले खरे वचन ते।।५०।। जे संत म्हणती। ते न चुके कल्पांती। विश्वास असे चित्ती। संतवाक्यावरी।।५१।। अविश्वासी जरी पुरुष। वाक्य न मानी विशेष। संतमुखाचे ते खास। तया ये कोठून फळ।।५२।। अविश्वास धरून। जाल संताजवळी पूर्ण। वांझ वेळूसमान। म्हणणे तयाते।।५३।। श्रोते असता मठी योगीवर। काय घडला चमत्कार। ऐका सादर होऊन सत्वर। मग कळेल बाबांची सत्ता ती।।५४।। ज्यांनी दिला मठ बांधून। आहेत आप्पा ते श्रीमान। ठावे समस्ताकारण। काशीनाथ नामे जो।।५५।। तयाची कन्या चंद्रभागा जाण। तिचा पुत्र भालचंद्र पूर्ण। जाहला आजारी रोगेकरून। वाटे पडले मृत्यूमुखी तो।।५६।। चंद्रभागा धाय मोकलून। दुःख करी रात्रंदिन। आठवी मौनीचरण। अति प्रेम भरे ती।।५७।। ये मौनी समर्थ धावून। मम पुत्रा दे जीवदान। तू माय अनाथाची पूर्ण। धाव लवकर संकटी तू।।५८।। असता शिरी तव कर। काळाची नसे भीती साचार। का कष्टविसी मम भालचंद्र। मग व्यर्थची प्रभू।।५९।। तू बसला जरी नेत्र झांकून। मग कोण येईल धावून। आम्हा दीनाकारण। सांगा बरे समर्था।।६०।। जसी माय लेकरासी। तसा तू भक्तजनासी। संतराया अहर्निशी तवचि कृपे सुखी आम्ही।।६१।। संत ना निर्दयी असती। वसे तयांच्या चित्ती। अलोट दया ती। अशी प्रचिती आली भक्तांते।।६२।। ऐसा शोक मांडिला गृहांत। चंद्रभागा व लक्ष्मीबाईने अत्यंत। तव आप्पा आले अकस्मात। वदे त्यांना करा स्मरण। समर्थाचे।।६३।। त्यांना स्मरण झाले निश्चिती। शिरी असता

गुरूमूर्ती। शोक करणे काया चित्ती। आपण अजाणपणे।।६४।। नेहमी असता अधिकारी। पुरुष साध्य आपणा जरी। मग शोक वायाची अंतरी। का करावा कन्यके।।६५।। कल्पतरू असता द्वारी। का हिंडावे दारोदारी। धनकूप सांपडता कगरी। का निर्धनता भोगावी।।६६।। सूर्य असता निघाला येधवा। का व्यर्थची अंधार उपभोगावा। ऐशापरी करी धावा। मौनी समर्थाचा तो।।६७।। मग करून विचार दमनी पाठविली सत्वर। गेला मठी तो नोकर। ठेविले चरणी शिर। आदराने समर्थाच्या।।६८।। चलावे वेगे आपण। बोलाविले आप्पाने गृहाकारण। भालचंद्र बिमार पूर्ण। नाही भरवंसा तयाचा।।६९।। आहेत बाबा पूर्ण ज्ञानी। त्यांनी आधीच जाणले मनी। की येतसे दमणी। आपणां भालचंद्रानिमित्ते।।७०।। लगेच बसले दमणीत। मौनीबाबा समर्थ संत। आले काशीनाथ गृही त्वरित। दूर करण्या व्याधी कुमाराची।।७१।। लगेच बाबाकारण। बसविले भालचंद्रा सन्निध जाण। दिले तीर्थ पायाचे धुवून। प्रिय नातवास ते।।७२।। पायाखालची धूळ घेऊन करी। लाविली भालचंद्राचे शिरी। तेणे आला शुद्धीवरी। समर्थकृपे बालक तो।।७३।। पाहा असे केवढा अधिकारी। जो व्याधीग्रस्त कुमार। दूध लागला पिण्यास्तव सत्वर। आपुल्या मातेचे ते।।७४।। मग सांगून समाधान गोष्टी। दूर केले शोका उठाउठी। व्हावे ना त्या कष्टी। स्वमनी कालत्रयी आपुल्या।।७५।। सांगून यापरी गोष्टीला। समर्थ आले मठाला। चिंतन करण्याला। श्री दत्ताचे ते।।७६।। बाबांची दृष्टी समसमान आपली त्याहून वेगळी जाण। अंतरीचा भाव तो भिन्न। मग कैसी सर ये बाबांची।।७७।।

।। श्री दासगणूचा वेडा श्रीरामलिखित श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ अध्याय अकरावा समाप्त।।

।। श्री मौनीबाबास अर्पण।।



**श्री परमहंस रामकृष्ण मौनीबाबांवर श्रीमान काशीनाथ आप्पांची भक्ती दिवसेंदिवस वाढू लागली.**

# || अध्याय बारावा ||

श्री गणेशाय नमः।। ॐकार रूपा पशुपती। नमन असो तुजप्रती। दे बुद्धी दीनाप्रती। मौनीकाव्यास्तव ती।।१।। अहो! काशीनाथ आप्पांची। स्त्री बीमार झाली साची। वाट धरिली दवाखान्याची। आप्पांनी ती विबुध हो।।२।। बुलढाणा ठिकाण सत्य। असे चिखली तालुक्याप्रत। तेथे नेले त्वरित। औषधीस्तव स्त्रीकारणे।।३।। बरोबर होता कुमर। सिद्धविनायक तीन वर्षांचा सुंदर। कां की लहान म्हणून नेले बरोबर। त्यास मातापित्याने।।४।। तेथे राहिले घेण्या औषधपाणी। गर्दीत गेला पुत्र रस्ता चुकोनी। शोक करिती मातापिता दीनवाणी। पाहू लागले चोहोंकडे वत्सात।।५।। परी न सापडला बालक। मौनीराजाचा केला धावा निःशंक। आमुची विनंती तू ऐक। देई पुत्र आमुचा तो।।६।। करून धावा समर्थांचा। जप चालला नामाचा। ''मौनी मौनी'' म्हणून साचा। दोघांचा तया वेळी।।७।। मठावर होते संत। भगवान माळी सेवा करीत। बाबा उत्तर देती तयाप्रत। मी जातो भक्त कार्यास्तव।।८।। मी जाऊन शीघ्रगती। मुल देतो काशीनाथाप्रति। पुन्हा येतो मठावअति। कार्य करून येवढे।।९।। मग गुप्तरूपी बाबा गेले सत्वर। स्वाधीन केला कुमार। आप्पांच्या मग साचार। त्या बुलढाण्यात श्रोते हो।।१०।। पुढे ऐका कथेचा प्रकार। तुम्ही होऊन सादर। चित्त देऊन मौनीकथेवर। एकाग्र मने भाविक जनहो।।११।। लक्ष्मीबाई पतिव्रता पूर्ण। काशीनाथ आप्पाची स्त्री जाण। असे मनाची भाविक संपूर्ण। अनुसयासम ती।।१२।। अहो! जयाची स्त्री चांगली। तेथेच राहिला वनमाळी। लक्ष्मीही तेथेच स्थिरावली। जाय कोठे सोडून पतीते।।१३।। त्या परीच स्त्री आप्पाची। सात्त्विक व सरळ

स्वभावाची। वृत्ति नच ढळे श्रद्धेची। तिची देवसंतावरची विबुध हो।।१४।। पूर्वजित पुण्य आप्पाचे। म्हणून लाभले चरण मौनीबाबांचे। आणि स्थिरावले ते मळ्यामध्ये साचे। निघे नाव कोठेही ते।।१५।। लक्ष्मीबाई विचार करिती मनात। पांच लाडू समर्थाप्रत। खाऊ घालावे खचित। ताटे करूनी शीघ्र ते।।१६।। यापरी विचार करून। रात्री केले पूर्ण। परी तसे कुणी नेण्याकारण। मठावरी समर्थाच्या।।१७।। तव बाईचा विचार कळला। की लाडू करून आपल्याला। वाट पाहे बाई गृहाला। कळले अंतर्ज्ञाने करून।।१८।। कडूभाऊ होता सेवेला। बाबास्तव आप्पाने ठेविला। समर्थ वदती त्याला। कैशापरी ते ऐकावे।।१९।। अरे! माझ्याकरिता जपून ठेवलेले लाडू। आतांच घेऊन ये तू शीघ्रकडू। माझी आज्ञा नको मोडू। अन्यथा दुःखी होईल बाई ती।।२०।। मग तात्काळची कडू गेला। श्रीमंत आप्पाच्या गृहाला। लाडू मागे लक्ष्मीबाईला। समर्थांच्या आज्ञेने।।२१।। मग लाडू दिले तात्काळ। म्हणे गुरू मौनी दयाळा। अंतरी खूण कळली केवळ। त्यांना मम मनातील।।२२।। तसीच खूण पटली कडूला। लाडू घेऊन आला मठाला। नमस्कार चरणी केला। साष्टांग भावे तो।।२३।। नंतर लाडू खाऊन। तृप्त झाला भगवान। दिला ढेकर तृप्तीचा जाण। आपुल्या मठी तो।।२४।। एकदा आप्पासी। थोर झाले खांडुक पाठीशी। उबडे म्हणती तयासी। ठावे सर्वा ते असे।।२५।। आप्पा झाले त्रस्त। उठवे, बसवे ना खचित। मृत्यूच मज ये त्वरित। ईश्वरा श्रीहरी।।२६।। झोप नच ती नेत्रांप्रत। तळमळ करी तो सतत। मच्छासम खचित। विबुध जन हो।।२७।। डॉक्टर बोले करा ऑपरेशन। ना तरी मृत्यू ये तुम्हाकारण। मेली विपूल माणसे पूर्ण। या दुःखे करून आप्पा ती।।२८।। जोडून दोन्ही कर। म्हणती संतच डॉक्टर। मी ना ऐके तीळभर। तुमचे ये समयी।।२९।। डॉक्टरचा निरूपाय झाला। गेले त्वरित बुलढाण्याला। मज

निष्ठावंत भक्त दिसला। न किंमत आमुची तयाते।।३०।। जो तो म्हणे देवा धाव। आप्पास सुखी ठेव। असे पुण्यवान जीव। तसा संत भक्त तो।।३१।। स्वप्न पडले विचित्र। काळ मज बोलावीत। म्हणून घाबरे होत। आप्पाते त्वरे।।३२।। मग करून संत स्मरण। सावध आप्पा झाले जाण। पिऊन उदक पूर्ण। लागले घ्यावा नाम ते।।३३।। मग आप्पांनी धावा मांडिला। मौनी संता पाव मजला। नच आता वाशीला। मज कुणाचा तो समर्था।।३४।। तू माय माझी तात। मी दीन तव पदरांत। धांव घे त्वरित। मजस्तव ती कृपाळा।।३५।। ऐकू न ये कां तुला। कुठे भक्तकार्यात गुंतला। धांव घे या वेळेला। त्वरित मौनीराजा।।३६।। गहिवरे हृदय दाटले। नेत्री प्रेमाश्रु लोटले। महीवर लोट चालले। आप्पाच्या ते जन हो।।३७।। आले मौनी संत धावा ऐकून। उठवे ना तसेच करी नमन। गहिवरले आप्पा खचित जाण। चाले पूर नेत्री तो।।३८।। समर्थ वदले सुखदुःख। भोगणे लागे निःशंक। देव असो वा संत देख। ठाऊक तुज भक्तवरा।।३९।। जो काळ उभा समोर। मम भक्ता नच लावी कर। जा तू येथून सत्वर। वदले समर्थ तयाप्रती।।४०।। ऐकून वचनासी। काळ लागे पायासी। गेला निघून परियेसी। समर्थ आज्ञेने तो।।४१।। काळ गेल्यावर। खांडका लागली धार। रक्त, पू याचा कहर। त्यातून बाहेर वाहे तो।।४२।। अळ्या पन्नास साठ। चुकविली काळाची गाठ। झाली संताची भेट। म्हणून श्रोते जन हो।।४३।। आप्पास आराम झाला। समर्थ आले मठाला। महत्त्व नच घेती आपणाला। असून अधिकारी ते।।४४।। भक्ती आप्पाची बसली। आहेत बाबा देव हल्ली। वाणी हीच तयाची वदली। ऐकिले मी प्रत्यक्ष मठामाजी।।४५।। आप्पासम भक्त व्हावे। संत महत्त्व कळे बरवे। वायसा काय हवे। मुक्तरत्न ते।।४६।। मृत्यू तीन प्रकारे असती। असो द्या ठावे नांव सर्वाप्रती। लिहितो समर्थग्रंथी। तुम्हास्तव विबुध हो।।४७।। आध्यात्मिक, आधिभौतिक। तिसरा

आधिदैविक। ज्यात याचा लौकिक। येतो सर्वाते जन हो।।४८।। आधिभौतिक मृत्यू कशाने येत। कुपथ्य होत आपल्या शरीरात। मग मानवा मरण येत। होता त्वरे ते।।४९।। हा येतो औषधाने टाळिता। वैद्यही चतूर व्हावा तत्त्वता। शास्त्ररीत ठाऊक सर्वथा। तरीच टाळी मृत्यूते।।५०।। आधिदैविक मृत्यूस। नवसाने गुण ये खास। श्रद्धा ती विशेष। असावी देवावरी।।५१।। हे दोन मृत्यू नवस औषधे टळती। आध्यात्मिक न टळे कल्यांती। देव भेटल्या निश्चिती। तयाते न ये टाळिता।।५२।। संत मात्र टाळीत। मृत्यू या जगांत। तोच प्रकार चिखलीत। आला घडून तो।।५३।। मुख्य श्रद्धा श्रेष्ठ कथिली। तीच आप्पाची खरी बाणली। तयीच मृत्यूवेळ टळली। समर्थ कृपेने ती।।५४।। कोणत्याही कार्यात श्रद्धेचे महत्त्व फार। तरच गुण ये त्वरित। असल्या श्रद्धा ती।।५५।। आप्पा करी लटपट। भक्ती ती झटपट। नच करी कटकट। भक्तीस्तव तो।।५६।। संत सेवा करी। आप्पापुत्र भारी। सिद्धविनायक खरी। नियमाने तो।।५७।। यापुढील वर्णन। तेराव्या अध्यायी जाण। पांडुरंग बाबांची भेट घेतील पूर्ण। ऐका भाविक हो।।५८।।

।। श्री दासगणूचा वेडा श्रीरामलिखित श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ अध्याय बारावा समाप्त।।

।। श्री मौनीबाबास अर्पण।।



श्री परमहंस रामकृष्ण मौनीबाबा चिखली व परमहंस अनंतबाबा अकोला यांची भेट
इ.स. १९५१ (शके १८७२)

# || अध्याय तेरावा ||

श्री गणेशाय नमः।। जय जयाजी पांडुरंगा। भक्त भवगंगा। अव्यक्तरूपी श्रीरंगा। न कळे लीला तव कुणाते।।१।। तव भक्त जात गोत विरहित। सच्चित परब्रह्म जाणत। गुणदूषण विरहीत। जगांत ते सर्वदा।।२।। त्याच भक्ताची वर्णितो कथा। करून नमन तुज तत्त्वता। देवाधि देवा पंढरीनाथा। साह्याते करी तू।।३।। तूंच बुध्दी दिली म्हणून। वर्णीत बहु संतगुण। येऱ्हवी मूर्ख जाण। ओळखे माते सर्व विश्व ते।।४।। धनगरकुळी पांडुरंग संत। नवघरे मंगरूळात। राहतो पाहा खचित। जन उध्दरायाते।।५।। गेले मौनीराज संत। त्वरित तया ग्रामाप्रत। येता आमंत्रण निश्चित। तेथल्या भाविकांचे ते।।६।। तयी भेटले दोघे दत्तभक्त। आलिंगण देऊन खचित। एकमेका प्रेमे बोलत। कळली प्रचित परस्परे ती।।७।। दोघांची रीत एकसम। न तीळमात्र विषम। दोघांनी ओळखिला राम। प्रत्येक ठायीचा तो।।८।। म्हणून पांडुरंग मौनीराज। समान दोघे सहज। द्वैत न दिसे मज। श्रोतेजन भाविक हो।।९।। मौनीराज संत सोडून ग्राम। आले चिखलीस सप्रेम। भजती सदा रामनाम। राहून मठी ते।।१०।। रामभाऊ विनवणी करून बाबांस। नेले चांडोळी निःशेष। आजोळ ते विशेष। तयाचे ते श्रोते हो।।११।। भिकाजी कापसे तयाचे घरी। आरती, पूजा चालली खरी। महादेव तेली आला निर्धारी। तया गृही तो।।१२।। म्हणे माझी कन्या कष्टी फार। प्रसूत न होय लवकर। दया तीर्थ सत्वर। बाबांचे मजकारणे।।१३।। तीर्थ समर्थ चरणीचे। तिते दिले हो साचे। निवारून कष्ट तियेचे। प्रसूत झाली साध्वी ती।।१४।। भाव होता म्हणून। आला तियाते

गुण। नेत्र उघडा हो पूर्ण। श्रोते जन हो तुम्ही।।१५।। वाशीम क्षेत्री बाबांचा भक्त। नाव ज्याचे अच्यूत। 'सतर्के' आडनांव खचित। ठाऊक सर्वा ते।।१६।। बाबावरी निस्सिम भाव। नच विकल्प मानिती देव। पुण्याची असे ठेव। तयाच्या ती जन हो।।१७।। एकदा पेटी घेऊन। सीलबंद ती जाण। निघाला घरांतून विक्रीस्तव चहा तो।।१८।। परी दैवयोगे एक पेटी। चोरी गेली उठाउठी। एकशे दहा किंमत चोखटी। तया पेटीसी असे।।१९।। मग गेला घाबरून। म्हणे नोकरी जाईल जाण। येईल भरणे किंमत पूर्ण। मजलागी ती।।२०।। मग जोडून कर। घेऊन फोटो समोर। विनवी ठेवून शिर। समर्थाते गृही।।२१।। म्हणे धांव धाव मौनी। संकटी तारी निर्वाणी। तू बळकट मज धनी। मायबापा समर्था।।२२।। धांवा ऐकिला कर्णी। दृष्टांत दिला स्वप्नी। जाय विघ्न वितळूनी। तव अच्युता ते।।२३।। तेच शेवटी खरे झाले। निर्विघ्न संकट टळले। संत महात्म्य कळले। समर्थ भक्ता।।२४।। दृढ होता भाव। म्हणून पावले मौनी देव। घेतली भक्तीस्तव धांव। तया भक्ताच्या ती।।२५।। नोकरी टिकली कायम। धन्य समर्थ मौनीराम। घेऊ याचेच नाम। अहर्निशी ते।।२६।। कृष्णा सतर्के बंधू अच्यूतरावचा। असे तोही साचा। परी टिके ना योग पुत्राचा। सवेच होऊन मअति।।२७।। मंगलताई म्हणून। कांता बहु गुणवान। कृष्णाची ती गहन। असे विबुध हो।।२८।। म्हणून भजे रामकृष्णा। म्हणे धांव धाव नारायणा। पुत्र दे भाकी करुणा। तुज विनवी मायबापा।।२९।। मज जरी पुत्र झाला। तरी उजळे भाग्याला। त्वांच दीप लाविला। मम कुळी तो।।३०।। पाहून ती भक्ती वहिली। कन्या तिते दिधली वर्षाची होता भली। सुखरूप असे ती।।३१।। जे देती ना देव कुणा। तेच दे संतराणा। असल्या भावना। शुद्ध आपुलकी ती।।३२।। शुद्ध

भाव मनांत असला। तोही समजे बाबाला। वाचता कळे तुम्हाला। कथा बाबांची।।३३।। कर्मभोग चुकत नच। सरल्यावीन साच। सुखदुःख भोगणेच। मानवा कर्मामुळे।।३४।। राजदंड, अग्निदंड, यमदंड। चुके ना कदा याचे बंड। मानवामागे अखंड। कर्म निमित्याने ते।।३५।। पापाचे दुःख तयार। कर्म बनवी झडकर। ते चुके ना क्षणभर। मानवा भोगल्याविना।।३६।। पाप जळण्या त्वरित। सर्वच दुःखही हरत। उपाय तो कथिला सत्य। एक संतदर्शन तो।।३७।। दत्तात्रय दर्शनाने। कोड गेला पूर्णपणे। देवाहून संत शहाणे साक्ष एकनाथाची ती।।३८।। विठोबा ताठे पाटील खरा। परी भाविक पूरा। भजे सदा मौनीवरा। वस्ती ज्याते जांबगावी।।३९।। याचे घरी लग्न दोन मुलींचे। योजिले एकाच मांडवी साचे। सुमुहूर्त पाहून पंचागाचे। भटाहस्ते ते।।४०।। पंगत बसली जाण। वाटे कमी पडे अन्न। म्हणून धावा मांडीला गहन। मौनी समर्थाचा तो।।४१।। त्यायोगे बरकत आली। अन्नाची वहिली। बुज ती राखली। विठोबाची समर्थे।।४२।। तव कृपा होता गुरूराया। लागे विश्व त्यास वंदाया। साधू म्हणून कळे जगतासी या। तव कृपे हरि।।४३।। त्या भक्ताचेच वर्णन। करीतो तव कृपेने जाण। दत्ता! मी असे बहु अजाण। होय तू बृहस्पती माते।।४४।। गिरीजानंद गुप्त नागपुरांत। बाबांचा भक्त नांदत। सुपरिटेन्डेन्ट ज्या म्हणत। हायकोर्ट नागपूरचे ते।।४५।। एकदा पौर्णिमेस आले चिखलीस। नागपूराहून खास। दर्शनास्तव ते।।४६।। मनी हेतू धरीला एक। प्रसाद देतील देख। केळाचा तो निःशंक। ओळखून मम अंतर ते।।४७।। ते हेतू ओळखिले। स्वअंतरी चांगले। मनांतील ते भले। गिरीजानंदाच्या।।४८।। मग भाव धरून। केले समर्थास नमना। दिला प्रसाद पूर्ण। केळाचा तो।।४९।। प्रसाद दिल्यावर। स्पष्ट कळविला विचार। खरेच

आत्मज्ञानी गुरूवर। दिला प्रसाद मज केळाचा।।५०।। माघ शुद्ध रथसप्तमी कारण। होती यात्रा मुंगसाजीची पूर्ण। आकोल्या शहरामाजी जाण। शके अठराशे बाहात्तरात।।५१।। अगदी त्याच समयी। मौनी समर्थ लवलाही। आले आकोल्या ठायी। त्वरा करूनीया।।५२।। संत संमेलन म्हणून। बाबा आले होते चिखलीतून। कां की संत नच राहती पृथक पूर्ण। एकमेकां सोडून। भाविक हो।।५३।। एकदम आठवण झाली मनी। की भेटावे अनंत बाबा लागुनी। तया गृह जाऊनी। लवही न करावा वेळ तो।।५४।। ते मुकेच असती। अ, इ, उ ही न उमजे त्याप्रती। राहती वेड्यासम निश्चिती। बालपणापासूनी।।५५।। एकमेकांच्या खुणा पटल्या। मधून मधून वाजविती टाळ्या। येती आनंदाच्या उकळ्या। दोघांनाही वारंवार।।५६।। मौनीबाबांच्या कृपा करून। करू लागले अल्प भाषण। अनंतबाबा ते जाण। समजले महिमान मायबापांस।।५७।। मौनीबाबा जन्मले पौर्णिमेस। अनंतबाबा अनंत चतुर्दशीस दोघेही अवतारी पुरुष। यांत न शंका तीळमात्र ती।।५८।। यापुढचे कथन। होईल चौदाव्या अध्यायी वर्णन। ऐका देऊन कान। सद्‌भक्त हो।।५९।।

।। श्री दासगणूचा वेडा श्रीरामलिखित श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ अध्याय तेरावा समाप्त।।
।। श्री मौनीबाबास अर्पण।।



श्री परमहंस रामकृष्ण मौनीबाबा यांनी हात लावताच शेगांव येथे दाराचे कुलूप उघडले.

# || अध्याय चौदावा ||

श्री गणेशाय नमः।। जय जय श्रीकृष्णा। देवकी नंदना। पांडव पालक नारायण। पांडुरंगा श्रीहरी।।१।। परमेश्वर सूत्रधारी। संत पाठवी महीवरी। कां की गुंतू नये संसारी। मायिक जनांनी ते।।२।। जर खऱ्या संताची असेल सेवा। तर तिचाच अनुभव जीवा। येईल श्रोते तेधवा। आणि सेवाही फलद्रूप ती।।३।। काशीनाथ आप्पाचे। आणि मौनीबाबांचे। प्रेम असावे साचे। पूर्वजन्मीचे ते।।४।। म्हणून भक्तीस्तव रमला। तयाचे मळ्यामाजी चांगला। ऐका तयाच्या कथेला। सादर होऊन तुम्ही।।५।। असे पूर्वीच्या वऱ्हाड प्रांतात। शेगांवी संतरत्न नांदत। गजानन साधू खचित। जे समाधिस्त जाहले शेगावी।।६।। हे मौनीबाबापरीच नग्न होते। ऐसे कथिले पाहा ते। गजाननविजय ग्रंथी ते। मम गुरू दासगणूने।।७।। जे जीवनमुक्त खचित। पाहावे ग्रंथ वाचून सत्य। म्हणजे कळेल मात। त्या संताची तुम्हाते।।८।। जे राम होऊनी गेले। अयोध्येत पूर्वी भले। त्याचे प्रत्यंतर शेगांवी आले। दिसे सांप्रत नेत्री ते।।९।। रामराज्य म्हणून। टिकले साधू गजानन। करण्या राज्यांचे रक्षण। त्या शेगांवी वऱ्हाड प्रांती।।१०।। तिकडे रामराज्य असे। चिखली गोकुळ विलसे। म्हणून मौनी रमलासे। प्रेमास्तव भाविकांच्या।।११।। मौनीबाबा गजाननाचा अवतार। पूर्व जन्मभूमिची आठवण सत्वर। म्हणून जाती शेगांवी झडकर। चिखलीच्या मठातूनी।।१२।। मौनी येता एकदा शेगांवात। थेट गेले मंदिरात। तव झाली गर्दी अमित। दर्शनास्तव समर्थाच्या।।१३।। कुणी घातले कंठी हार। मुखी घातले बर्फी, पेढे सुंदर। गरीब नुसते जोडते कर। बहुत जमले श्रीमंत।।१४।।

यापरी सर्वांनी सुचविले। बाबा होते भोजनास्तव बसले। शेगांवच्या मंदिरी चांगले। गजानन महाराजांच्या।।१५।। यापरी भोजन संपवून। समर्थ झोप घ्यावी म्हणून। गेले माडीवर चालून। वसे मंदिरावरी जी।।१६।। कृष्णाजी पेंटर होता राहत। ज्या खोलीत सतत। तेथे आराम करावा त्वरित। असे वाटले समर्था।।१७।। परी द्वारास कुलूप दिसे। समर्थ विचारती करावे कसे?। सहज हात लावता खासे। उघडले आपोआप ते।।१८।। जेव्हा आत जाऊनी झोपले। मौनी समर्थ। अंथरूणी चांगले। तेव्हा बाहेरूनी आले। कृष्णराव चित्रकार ते।।१९।। त्यांनी बाबांते देखिले नयनी। विस्मित झाले स्वमनी। म्हणे कळे ना यांची करणी। कुणातेही कालत्रयी।।२०।। पाचारून बरेच जन। कथिले बाबांचे वृत्त पूर्ण। वाटले मोठे नवल जाण। शेगांवी भाविकांना।।२१।। देविसिंह सराफ अकोल्यात। तया गृही गेले समर्थ। कुलूप त्याच्याही द्वाराप्रत। समर्थे कर लावून उघडिले।।२२।। जेव्हा समूळ जन आले बाहेरून। त्यांना वाटले आश्चर्य पूर्ण। धन्य धन्य मौनी भगवान। अघटीत कर्तव्य यांचे।।२३।। अकोल्यात एकदा बैल बुजाळून बावरले। चौफेर पळू लागले। कुणाचे न काही चाले। घाबरले सर्वजण।।२४।। कोण ही कटकट। वृषभ पळती झटपट। अनंत बाबाची होय लटपट। एकटे म्हणून ते।।२५।। प्रयत्न केले परोपरी। वृषभ न थांबती तीळभरी। झाली मंडळी घाबरी। लागली चिंता ती मनी।।२६।। तव मौनीराज आले। वृषभ उभे केले। तेव्हा सर्वा कळले। महात्म्य संताचे।।२७।। त्या धोत्र्यांत एक बाई। दुःखाने सदा पीडित राही। नाम जिचे झिपराबाई। असे ती भाविक हो।।२८।। कोणा लाभे परमसुख। कोणा मागे काहीतरी असे दुःख। कुणी नच सुख संसारी देख। कदा राहत पूर्वकर्म।।२९।। सुखी व्हावे वाटे प्रत्येकासी। दुःख नच यावे वाटे मानसी। परी ते सोडी ना

कुणांसी। कालत्रयी काही केल्या।।३०।। ज्या ठिकाणी अंधार वसे। तिथे भीती विलसे। हा सृष्टीचा न्यायची असे। त्यापरीच हा खेळ सुखदुःखाचा।।३१।। ज्यांना वाटे श्रीमंत बनावे। दारिद्र्य न त्यांना सोडी स्वभावे। केले कर्म लागते भोगावे। तेथे उपाय कुणाचा।।३२।। कोण्या कर्मे कोणते दुःख येत। ते पहा कर्मविपाक शास्त्रात। तसेच उपाय कोणते असतात। व्यासाने कथिले पहावे।।३३।। त्या न्यायेकरून। बाईच्या डोळ्यात पडदे येऊन। न दिसे नेत्राप्रत। बाई फार तळमळ करीत। म्हणे काय करू उपाय देवा।।३४।। सर्वात नेत्र प्रधान असती। तेच देवरूप दाविती। पुराणेही हेच सांगतो। नरा पाहा वाचूनी।।३५।। ऐका नेत्र नसता प्रधान। त्याहून बरे मरण। वाटे अंधाते जाण। अनुभव शेकडो ते येतसे।।३६।। तव आनंदराव वदती बाई। चिंता न करी मुळीच काही। चालता बोलता ईश पाही। चिखलीस राहे तो।।३७।। त्यांनी बहुता गुण दिले। हे प्रत्यक्ष मी पाहिले। मम नेत्रांनी चांगले। प्रमाण असती ते सांप्रत।।३८।। तव तू वाऱ्या करी त्वरेसी। भाव ठेवून पायापासी। आणिक करी अन्नदानासी। तव शक्तीप्रमाणे माते।।३९।। ते ऐकून वचन। आनंदली बाई पूर्ण। पाहून तिथी पौर्णिमा जाण। आली वारी करण्या मठावर।।४०।। वाऱ्या केल्या भावे बाईने। दिव्य दृष्टी झाली समर्थकृपेने। मग केले अन्नदान स्वच्छेने। बाबांच्या मठावरी।।४१।। नच होय वैद्याने जे कांही। ते समर्थकृपे घडले पाही। संतकृपा पोरचेष्टा नाही। म्हणून कृपेसाठी झटती जन।।४२।। खरंच मी होती भुलली सद्गुरू मौनी माऊली। गुंतून मोहपाशाते राहिली। आनंदराव मी।।४३।। द्वारी पाहिले कल्पवृक्षास मी मानिले हीन त्यास। जो कल्पिलेले दे नरांस। मम भूल असे संसार मोहे।।४४।। या परी आनंदली बाई। मठावरी वारीते येई। पौर्णिमा ये करूनी घाई। महिन्यांचे महिन्या ती।।४५।। पाहा रीत

आपल्या संसारिकांची। गुण आल्यावर वाटिती साची। शिरणी ती आनंदाची। देवास कबूल केलेली।।४६।। होता खरूज लेकरासी। मोठेपणा मिळो लागे देविसी। गुण आल्यावर न पुसे तिसी। ऐशी मतलबी सेवा त्यांची।।४७।। रस्त्याने चालला एकटा। अंधारी जर मोडला काटा। तर आठवी देवासी करंटा। कार्य झाल्यावर न घेई नाम।।४८।। गुणापुरती सेवा तर करावी। परी पुढेही न विसरावी। सदा आठवण ठेवावी। झिपरे देव भक्तांची।।४९।। नेत्र आले झिपरीला। गांवी समजले लहान थोराला। मौनी पावले ग बाईला। दिली दृष्टी सूर्यापरी।।५०।। नंगेबाबांच्या यात्रेत। लागली एक बाई चरणांप्रत। म्हणे दुःखाने मी अति पीडित। असे मौनीराज सर्वकाळ।।५१।। ही ना आवरे गंडमाळा। त्रास देई मम गळा। म्हणून आली शरण दयाळा। आपली कीर्ती ऐकून।।५२।। त्रास पाहिला नेत्रेकरून आणि हळहळले मौनी भगवान। दिला आशीर्वाद प्रेमेकरून। श्री दत्त हरील तव व्याधी पूर्णपणे।।५३।। ती बाई नीट झाली। तिची व्याधी समर्थे घेतली। अद्यपी खूण आहे, मी पाहिली। समर्थाचे उजवे कराला।।५४।। अमित जन धरती आंस चित्ती। आणि येती दर्शना मठाप्रती। बाबांना कोडे पुसती। आपुल्या संसाराचे।।५५।। पुढचे अध्यायी कथन। होईल बाबांचे गहन। ऐका देऊन कान। एक भावे तुम्ही।।५६।।

।। श्री दासगणूचा वेडा श्रीरामलिखित श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ अध्याय चौदावा समाप्त।।

।। श्री मौनीबाबास अर्पण।।



**श्री परमहंस रामकृष्ण मौनीबाबा चिखली व परमहंस बिदोडेबाबा डव्हा यांची भेट**
**इ.स. १९५२ (शके १८७३)**

# || अध्याय पंधरावा ||

श्री गणेशाय नमः।। जय जयाजी अत्रिसुता। अविनाश मूर्ती दत्ता। नमन असो तुज सर्वथा। वेड्या रायाचे।।१।। तव करी त्रिशूल साचा। त्यापरी तव भक्तकरी त्रिगुणांचा। सत्त्व, रज आणि तमाचा। संहरण्या कामक्रोधाते सर्वकाळ।।२।। तव करी जे जे आयुध दत्ता। ते ते देसी निज भक्ता। आणिक देसी त्यासी प्रेमावस्था। दीनदयाळू दत्ता तू।।३।। संसाराचा सारा खेळ पाहिला। तो तुझाच असे अनुसया बाळा। वंदून तव पदकमळा। वळतो कथेकडे समर्थाच्या।।४।। अनंतबाबांचा जन्म भावसार कुळी। बिदोडे बाबांची जात अत्यंज समुळी। पदी लागले गुरूच्याच मुळी। म्हणून जात, गोत विरहित ते।।५।। बिदोडेबाबा आले होते यात्रेप्रत। मुंगसाजी महाराजांच्या सत्य। मग आकोला शहरांत। शके अठराशे त्र्याहत्तर साली।।६।। तेथे मौनीबाबांही होते। त्यांनी ओळखिले त्यांच्या चित्ताते। पटविली खूण जगताते। अंतर्ज्ञाने ती।।७।। की हा मम मित्र पूर्व जन्मीचा। असे शिष्य नंगेबाबांचा। म्हणून आला पूर आनंदाचा। नेत्री समर्थांच्या।।८।। बिदोडे बाबांनीही ओळखिले। मग विचार सांगती भले। मौनी समर्था मजही कळले। की तुम्ही आम्ही एकची।।९।। मी बोलतो सदा मुखाने। म्हणून येती पुसादाकारणे। मज आपुल्या संसाराची गाऱ्हाणे। बहुत लोक सर्वकाळ।।१०।। यापरी ऐकता वचन। हसू लोटले एकमेकांकारण। तशाच दिल्या चापटा राखून। एकमेकां श्रोते जन हो।।११।। अंतर्खूण कळली चित्तात। म्हणून रमले ब्रह्मसुखात। या दुर्धर कलीयुगात। संत हे ब्रह्मज्ञानी।।१२।। पूर्वीपासून हे योगी असती। अधर कालात्रयी नसती। म्हणून टिके संतपणाची वृत्ती। पूर्व योगे ती।।१३।। सर्वस्वी त्याग केला। रमले समर्थ चिखलीला। आप्पांच्या त्या

मळ्याला। पाहा नेत्री भक्त हो।।१४।। निष्काम भक्त आप्पा शोभत। विरक्त मौनीसंत। म्हणून वास्तव्य खचित। तेथे बाबांचे।।१५।। अंतर्ज्ञानी भगवान। दाविली ती खूण। लक्ष्मणाते जाण। मठावरी आपुल्या।।१६।। लक्ष्मण धोत्र्याचा। परी बनला भक्त बाबाचा। मठावरी ये साचा। भजनास्तव चिखली तो।।१७।। नियम केला कठीण। पूर आल्या गंगेस जाण। ये पोहून तो पूर्ण। आल्या पौर्णिमा ती।।१८।। एकदा विचार केला। आणूं संत गृहाला। करीन मी सेवेला। स्वशक्तीने आपुल्या।।१९।। या प्रती विचार करून। वदे समर्थाकारण। द्वय कर जोडून। येणे रीती तो।।२०।। तुम्ही आल्यावाचून। मी नच जाईन। समर्था घरी येथून। तुम्हा नेल्याविण ते।।२१।। लक्ष्मणा तू वेडा फार। आज धनराज येणार। समज तू माजी खरोखर। नच अनृत वदे बालका।।२२।। म्हणून नच भोजन। केले अद्यापि मी जाण। हा विचार मम गहन। कथेला तू ते।।२३।। लक्ष्मण वदे नम्र वचन। गेले होऊन नऊ दिन। मध्यंतरीच ये कसा जान। धनराज मठी आपुल्या तो।।२४।। तो वदले लक्ष्मणासी। पाहा त्वरे नेत्रांसी। धनराज ये परीयेसी। दोन तासांनी तो।।२५।। तव आले धनराज। लक्ष्मण म्हणे धन्य आज। चमत्कार दाविला सहज। मम नेत्रांसी तो।।२६।। मम शंका ती निरसली। खरीच नेत्रा दिसती। मग पात्रे वाढिली। भोजनास्तव ती मठी।।२७।। याच लक्ष्मणाचा हात। दुःखाने वाळला त्वरित। नच काही कार्य होत। कराने त्या विबुध हो।।२८।। विनवी समर्था मम कर। वाळविला खरोखर। कुणीतरी साचार। समर्था मौनीराया।।२९।। तू समर्था दयाळू। करीसी भक्तांचा सांभाळू। का आता लाविसी वेळू। मम दिनास्तव तू।।३०।। तुझे प्रेम अनिवार। गंगेपरी तव अंतर। नच फरक तीळभर। मम भक्तीमाजी।।३१।। तव समर्थ वदले। वत्सा जे दैवी लिहिले। ते पाहिजे भोगिले। चुके ना कल्पांती।।३२।। एकदा समर्थ आले शेगांवी।

गजानन मूर्ती बरवी। सर्वा ते वऱ्हाडी ठायी। लहान थोरा सर्वस्वी।।३३।। तव दुखे जास्त हात। मच्छासम तळमळत। लक्ष्मण तो सतत। न साहवे दुःख ते।।३४।। समर्थासी कळले झडकरी। दुःखाने नाराज भारी। दिसला वेळू आदरी। कोपऱ्यामाजी तो।।३५।। घेऊन वेळू करांत। मारीले खचून हाताप्रत। दोन, तीन वेळ त्वरित। रामकृष्ण प्रभूने।।३६।। फिकीर सोड आता। दुःख दूर होय तत्त्वता। गिरा वदलो सत्य भक्ता। लक्ष्मणा तू ते मी।।३७।। यापरी व्याधी दूर झाली। समर्थ महिमा कळली। सर्वा ते चांगली। दयाळू संताची ती तया।।३८।। लक्ष्मण नीट झाला। समर्थचरणी लागला। खरांच तू कृपाळू कळला। दीनास्तव माया बापा।।३९।। ज्याची वासना नच शुद्ध त्या कैचा गोविंद। आणि तैसा परमानंद। संतसेवेचा तो।।४०।। जीत भावना धरून मनी। भजाल संत मौनी। गुण ये निर्वाणी। भक्तिभावे तो।।४१।। रतिपाळसिंह राजपूत। गाव त्याचे थावनेर सत्य। शिरपूर तालुका शोभत। पश्चिम खानदेश जिल्हा त्याते।।४२।। रतनसिंह मेहुणा। आला तया गृही पाहुणा। वेड लागले जाणा रतिपाळा ते।।४३।। म्हणून रतन। गेला घाबरून। उपचार करी जाण। आणून वैद्य डॉक्टरांते।।४४।। परी नच गुण आला। कळली मात तयाला। संत राहती चिखलीला। मौनीराज ते।।४५।। तेथे गुण येतो जना। जाता संत दर्शना। म्हणून आणी मेहुणा। आपुला तो।।४६।। मारी, तोडी, झोडी। म्हणून घातली बेडी। करून विचार तातडी। आणिला मठावरी तो।।४७।। तव मौनीसंत वदती। बेडी काढा शीघ्रती। मोकळाच निश्चिती। राहू द्या हा।।४८।। समर्थकृपा झाली। वेडी कल्पना गेली। अतिपाळाची भली। आला शुद्धीवर तो।।४९।। तूप, नारळ टाका होमांत। कथिले तयाप्रत। समर्थे त्यांना त्वरित। ते समयी विबुध हो।।५०।। ही न समजा राख। प्रत्यक्ष होय पाक। धरल्या भाव एक। धुनीपासी देख भक्ता।।५१।। भाव विभूतीवर। ठेवा

तुमचा जबर। गुण ये झडकर। तुम्हाते भक्त हो।।५२।। विभूतीचा गोरक्ष। जन्मला उकरड्यांत। प्रत्यक्ष वामदेवाची तशीच साक्ष। उद्धरला कल्माषपाद तो।।५३।। रोगाची काय किंमत। काळ टळला त्वरित। भद्रसेन कुमाराचा सत्य। विभुतीने तो।।५४।। हीच भावना जनी। विभूती प्रत्यक्ष शूलपाणी ही भावना असे मनी। भाविकांच्या ती।।५५।। ही विभूती घरा न्यावी। जपून ठेवावी। देवपूजेत बरवी। भय नच विटाळाचे।।५६।। मात्र भाव चोखट ये गुण सुभट। तो नसाचा पोचट। वांझ वेळूपरी तो।।५७।। रोग होतील दुरी। मी सांगतो खरोखरी। वदे नच वृथा वैखरी। मी तुम्हाते।।५८।। निंदा कराल जरी। संताची ती खरी। सुख ना तीळभरी। तथा निंदकाते।।५९।। हातरूण गांवीचे बंधू कलाल भाया। दैव आले मग उदया। झाले पुत्र तया समर्थकृपेने ते।।६०।। पुरुषोत्तम, मुरलीधर, अरुण, वसंत। चार मुले तयाप्रत। समर्थ कृपेने निश्चित। झाली शालीग्राम भक्ताते।।६१।। या परी वंश वाढला। त्या चौघांचा बोलबाला। तया हातरूण ग्रामाला। संतकृपे तो।।६२।। ठेवून पूर्ण भाव। बाबाला मानिती देव। तैसाच तयाचा अनुभव। असे श्रोते हो।।६३।। समर्थाचे मठी जाऊन। भाव ठेवा मनी पूर्ण। तेणे पुरती वासना संपूर्ण। कां की अंतर्साक्ष बाबा ते।।६४।। मात्र सेवा करी पुरी। तरच फळ ये झडकरी। तसाच विश्वास पायावरी। ठेवा बाबांच्या तो।।६५।। भक्ती सर्वात कठीण। संताची गहन। लहानाहून लहान। व्हाल तेव्हा कळे।।६६।। यापुढचे कथन। पुढचे अध्याय जाण। होय सुंदर गहन। अमृतासम ते।।६७।।

।। श्री दासगणूचा वेडा श्रीरामलिखित श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ अध्याय पंधरावा समाप्त।।

।। श्री मौनीबाबास अर्पण।।



**श्री परमहंस रामकृष्ण मौनीबाबांनी सौ. शांताबाई पाठक यांचे हरविलेले सोने बुलढाणा येथे श्री. रामभाऊ देशमुख यांचे घरी होमातून काढले. इ.स.१९५२ (शके १८७३)**

# || अध्याय सोळावा ||

श्री गणेशाय नमः।। जय ॐकार स्वरूपा हरिहरा। भिमातीर विहारा। चिन्मयरूपा विश्वंभरा। नमन तुला हे।।१।। तुझ्या मनी जेव्हा येते हरि। तेव्हाच तू तयार करी। सृष्टीचा सारा खेळ भारी। तव सत्ते पांडुरंगा।।२।। सोडून संसार कामासी। लावा लक्ष मौनीकथेसी। उशीर नच परियेसी। करावा बुध हो।।३।। मृत्यू असे दूर जन हो। तोवरच कथे कान द्या हो। मौनीराज नयनी पाहा हो। शीघ्रगती जाऊन तो।।४।। जे कार्य विलंबाने करी। तेच शीघ्र करा झडकरी। शिकवण बाबांची बरी। परमार्थास्तव ती।।५।। होई तू मना सादर। काव्य करी मनोहर। मौनीराज गुरूवर। पूज्य दासगणूसम ते।।६।। रामभाऊ देशमुख। वास्तव्य बुलढाण्यांत। परी असे संतभक्त। सर्वकाळ तो।।७।। किती जरी उशीर झाला। परी वाची मौनीकथेला। न सेवी अन्नाला। नेमावाचून तो।।८।। दुर्गाताई माय त्यासी। भाविक बहु मानसी। ये संतदर्शना मठासी। पौर्णिमा येता ती।।९।। परी मानसी इच्छा उदेली। की सुवर्ण हरपे वेळोवेळी। यास्तव आळवू माऊली। मौनीराज ते।।१०।। म्हणे समर्था जोडून कर। विनंती चरणी खरोखर। भय वाटे मज फार। तुमचे ते।।११।। तुम्हा बोलता एक। तुम्ही बोलता अनेक। उघडे ना मम मुख। तुम्हापुढे अल्पही।।१२।। तव वदे शांता सुंदर। वचन ते मनोहर। भय नच माई खरोखर। बाबापुढे ते।।१३।। गुरू, माता, पिता ठिकाण। दुःख सांगण्या ते तीन। शास्त्रांची शिकवण। आपणाते झडकरी।।१४।। माई म्हणे इश्य बया।

वाटेच मज थोर भया। समर्थापुढे वदाया। दुखणे माझे की।।१५।। आग्रह म्हणून सांगते दुःख। समर्था हरपे सुवर्ण देख। किती ठेवल्या जपून निःशंक। कैसे मायबापा ते।।१६।। हसू आले समर्थासी। माई किती आस मानसी। सुवर्णाची तुजसी। आहे पहिल्यापासून ते।।१७।। सुवर्ण म्हणावे नर देहासी। तुज ते दिले परियेसी। देवाने कन्या, पुत्रांसी। हेच सुवर्ण ते।।१८।। या सुवर्णाहून किंमत। तुज त्याची ती जास्त। परी झाली चिंताग्रस्त। आली पुसण्यात ती।।१९।। या सुवर्णा नच किंमत। नर देहाचेच महत्त्व। माझे बोल न अनृत। सत्य सत्य त्रिवाचा।।२०।। परी तुझी वासना जसी असेल। तसेच फळ मिळेल। सुवर्ण न हरपेल। आल्या वेळ टिकण्याची।।२१।। वेळ आल्यावाचून। कोणतेच कार्य न जाण। होई माई पूर्ण। कालत्रयी ते।।२२।। शांता बोले खरेच वचन। झाला उलगडा पूर्ण। शंकेचा तो जाण। समर्थ मुखे तो।।२३।। तव येता पौर्णिमा छान। सर्व आले भक्तजन। नाम देऊ कुठवर जाण। बहु भक्त ते बाबांचे।।२४।। तव शेगांवहून आली शांता। संतभक्त थोर तत्त्वता। निज ध्यास सर्वथा। नामाचा तो।।२५।। अरविंद पुत्र धूर्त। शांताबाईचा खचित। तोही आणिला सोबत। पाठक आडनांव ते।।२६।। येऊन केला नमस्कार। गुरूराज चरणांवर। दाटला फार गहिवर। तये वेळी सतीते।।२७।। जसी धेनू वासरासी। तसी गुरूमाय मजसी। हरणी पाडसासी। तसा मज गुरूवर तो।।२८।। जरी मी दीन दुबळी। समर्थानी पुरविली आळी। सांभाळी मज वेळोवेळी। संकटी सर्वदा।।२९।। जसी घार आकाशी। फिरे अहर्निशी। तिचे चित्त पिलांपासी। तू तसा गुरूवरा।।३०।। मातेस लेकरे फार। माता लेकरा एक साचार। त्यापरी

हा समर्थ विचार। असे सर्वस्वी तो।।३१।। यापरी बोलून। केले समर्थास वंदन। मायपुत्रे छान। ते समयी विबुध हो।।३२।। तव दुर्गाताई रामभाऊ। बेबी शांता आल्या पाहू। समर्थकृपा संपादून घेऊ। आपणांवरी ती।।३३।। दर्शन सर्वांनी घेतले। रामभाऊ माता बोले। शांता पाठक ऐक पहिले। मम वचन ते।।३४।। समर्थकृपे भेटी झाल्या। आपुल्या बाई त्या भल्या। ह्या मास्तरीन आल्या। नाम जिचे शांताबाई।।३५।। मज वाटे चला मम गृहासी। बुलढाणा शहरासी। भाजी भाकरी परियेसी। गोड करा तुम्ही।।३६।। शांता पाठक वदे जवारी। जी देवाची सवारी। कृष्णा नच बरोबरी। होय जवारीची ती।।३७।। जवारी शिवे निर्मिली। हलकी नच वहिली। नृपत्व बरे पावली। सर्व धान्यामाजी ती।।३८।। सर्वांनी पुजिली। गुरूराज माऊली। मग वदे शांता भली। एक इच्छा मम ती।।३९।। सुवर्ण घेऊन छानदार। कुड्या करीन मजेदार। पैसे दिले सत्वर। रामभाऊपासी ते।।४०।। चार मासे सुवर्ण। आणले अगदी छान। दिसण्यांत बहु तान। नेत्राते सदा।।४१।। मग सर्व आले बुलढाण्यास। समर्थ ते होते निःशेष। रामभाऊचे गृहास। तया सोबत ते।।४२।। समर्थ वदले बाईस। सोने जपून ठेव निशेष। किंमतीचे बहु निःशेष। असे चार मासे जे।।४३।। ऐकून वचन खरोखर। समर्थाचे साचार। वाटला थोडा अहंकार। बोले येणे अिति।।४४।। पेटी असे सुंदर। कुलूप ''न्यू इंडिया'' खरोखर। असे बाबा छानदार। लावण्या पेटीते।।४५।। असा अहंकार पाहून। मनी उमजले भगवान। दावावा चमत्कार पूर्ण। केला विचार तो।।४६।। हा अहंकार बाधक पुरा। मम भक्तांसी खरा। करील भक्तीचा मातेरा। असेल ठाणे जरी याचे ते।।४७।। उठले त्वरित संत

मौनी। मुखमार्जन करूनी। दूध, चहा घेतला सर्वांनी। अगदी सकाळीच तो।।४८।। तव समर्थ वदले माई। सुवर्ण शांताचे देई। कुड्या करू लवलाही। जो सोनार तव शेजारचा।।४९।। शांता वदे खरेच सोने। माई मजप्रती देणे। आहेत कुड्या बनविणे। कर्णी घालण्या त्या।।५०।। माई घाई घाई जाऊन। पेटी स्वकरे उघडून। दिली कागदाची पुडी जाण। शांतास्तव ती।।५१।। पाहून पुडी नेत्रासी। सोने नच आत परियेसी। उकलून देखता पुडीसी। म्हणे चमत्कार जाहला।।५२।। तव भक्त माई घाबरली। सोने गेले हारपून मुळी। गत नच बरी ये वेळी। काय करू मी आता?।।५३।। शांता हो जरा स्थिर। देते आणून सुवर्ण सुंदर। चार मासे सत्वर। मम मुलांते सांगुनी।।५४।। जर गेला प्राण हारपून। होय का माई देण। आमचेच देणे सुवर्ण। बोलती समर्थ ते।।५५।। बोलणे ऐकून समर्थाचे। धाबे दणाणले माईचे। धरिले पाय समर्थाचे। न तुम्हांपुढे किंमत ती।।५६।। मग लगेच करून होमासी। टाकून तूप, नारळासी। दिले सुवर्ण चार मासे तिसी। होमांतून काढून ते।।५७।। ते घेतले बाजारी। तेच न फरक निर्धारी। सुवर्णामाजी तीळभरी। श्रोते जन हो।।५८।। दाविला चमत्कार सर्वांसी। लागली सर्व भक्त चरणांसी। तुझा महिमा तू जाणसी। श्री गुरूनाथा।।५९।। अहंकार दूर झाला। सव्वा रुपयाचा वाटला। प्रसाद त्या समयाला। न हारवे सोने तेव्हापासून ते।।६०।। झाला दूर अहंकार। कर्ता करविता श्री गुरूवर। मायबाप समर्थ साचार। आले प्रत्यया ते।।६१।। याच रामभाऊची भक्ती जास्त। समर्थ चरणी खचित। समर्थ त्यास टाळीत। विघ्नांतून सर्व काळ ते।।६२।। चैत्र शुद्ध पाडव्यासी। रामभाऊ आला मठासी। घेण्या समर्थ दर्शनासी। त्वरे गृहाहून

तो।।६३।। समर्थ दर्शन घेतले। तया फोटो ते दिधले। एकवीस रुपये ते दिले। तशी शाल ऊलनची ती।।६४।। देवघरात फोटो लाविला। अंगठी नेहमी बोटाला। शाल घे पारायणाला। जीवनामृत ग्रंथ वेळी।।६५।। पुरुषोत्तम पाठक चतुर। असे शाळेत मास्तर। मेडसी ग्राम साचार। जे असे वाशीम तालुकी।।६६।। तयाची शांता नामे पत्नी पडली संकटात। धांव घेई बा तूं त्वरित। उशीर नच करी खचित। गुरूनाथा दिनबंधो।।६७।। भक्त बोलती आपसांत। भक्त पडला संकटात। नच नेत्रा झोप येत। समर्थाच्या ती।।६८।। लगेच जाऊन मेडसीला। वदती बाबा शांताला। का आज त्वा धावा केला?। म्हणून आलो त्वरे मी।।६९।। कर अंगावरी फिरवून। दुःख दूर करी भगवान। तया शांताचा भाव पाहून। हळहळले मग मनी।।७०।। तीन वेळ वदता ''मौनी''। भावाने आपुल्या मनी। मी धावुनी ये निर्वाणी। शीघ्रगतीने।।७१।। भाव भक्तीची जरूरत। असे मज ती खचित। सांगतो तुजप्रत। शांताबाई मी।।७२।। शांता खरेच म्हणून। समर्थास लोटांगण। घालितसे जाण। अनन्यभावे मी।।७३।। या पुढचे वर्णन। पुढले अध्यायी जाण। होईल ठेवा कान। संत कथेवरी ते।।७४।।

।। श्री दासगणूचा वेडा श्रीरामलिखित श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ अध्याय सोळावा समाप्त।।

।। श्री मौनीबाबास अर्पण।।



श्री परमहंस रामकृष्ण मौनीबाबांनी गोरेगाव येथील चि. अरविंद पाठक यांना चांदीच्या खडावा दिल्या.
इ.स. १९५३ (शके १८७४)

# || अध्याय सतरावा ||

श्री गणेशाय नमः|| जय जयाजी हनुमंता। नमन असो तुज रामभक्ता। बुध्दी देई मज सर्वथा। मायबापा तू||१|| करण्या रामभक्तीस। शिव अवतारी तू खास। जन्मला अंजनीकुशीस। वानरवेषे तू दयाळा||२|| ईशभक्ती कशी करावी। तूंच रीत जाणसी। नच इतरा ठावी। पवनसुता प्रभू||३|| नवविध भक्तीचे प्रकार। तू देवा जाणसी खरोखर। तुज असो नमस्कार। वारंवार दिनाचा तो||४|| श्रोते करून स्वस्थ मन। देणे संतकथी कान।. नच हयगय जाण। करणे कालत्रयी||५|| शांता एकदा पुत्र घेऊन। आपुल्या बरोबर छान। अरविंद नामेकरून। आली दर्शना मठी बाबांच्या||६|| येऊन मठात त्वरित। मांडिली पुजा खचित। संत मौनीराज सत्य। चिखलीमाजी ती||७|| आरती देऊन हाती। वदे माता त्या प्रती। ओवाळी त्वरित गती। समर्थ गुरूवराते||८|| केली त्वरित पूजा जाण। मग घेती पादूकातीर्थ। पुत्र, माता दोघेजण। तसा केला नमस्कार तो||९|| म्हणती दयाळा गुरू। आम्ही सर्वस्वी तव लेकरू। नका मग दूर धरू। आम्हा दीन भक्ताते||१०|| निर्गुण रूप तुझे असे। नग्न दिगंबर मूर्ती दिसे। शाम सुंदर कृष्ण विलसे। जाण कलीमाजी||११|| माया पाश कठीण। म्हणून नच महिमान। कळे आम्हा जाण। तुझे मौनीसमर्था||१२|| लेकरे नवरा हेच दैवत। तुझा विसर पडत। न दर्शना येणे होत। संसार बेडी जबर ती||१३|| तू शिव अवतार खरा। हास्यमुख सदा गुरूवरा। शरण मी पुरुषोत्तमदारा। तुझ्या पदी असे||१४|| समर्थ हसून वदती। कमाल केली अति। मम भक्तीची तुम्ही ती। द्वय जणांनी ये

काळी।।१५।। लगेच घेऊन हाती। खडावा चांदीच्या निश्चिती। दिल्या अरविंदाप्रती। मौनीराज समर्थे।।१६।। मग वदले अरविंदासी। समर्थ परियेसी। नका सोडू पुजेसी। सांगणे निक्षून तूं ते।।१७।। अरविंद मुलगा तुझा खरा। यासी योग गंडांतर पुरा। सतराव्या वर्षी बरा। शांताबाई गं!।।१८।। ऐकून समर्थ वचन। शांता गेली घाबरून। धरिले समर्थ चरण। त्वरा करून ते।।१९।। समर्थ बोलती सत्वर। शास्त्राचा आधार। निर्मिला देवे खरोखर। दुःखास्तव तो।।२०।। अकरा पारायणे त्वरे करी। जीवनामृत ग्रंथाची खरी। गुरुवारी अत्यादरी। करी तूं शांता मम आज्ञे।।२१।। लगेच मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ। चौरंगी बसवून यथार्थ। पुजापाठ करूनी भावार्थ। केली अकरा पारायणे ती।।२२।। तसेच अकरा गुरूवार। निरसनाचे खरोखर। केले पाहा सत्वर। गंडांतर टळण्या ते।।२३।। पुढे तेच साच झाले। गंडांतर टळले। अरविंदाचे चांगले। मौनीबाबा कृपेने।।२४।। उपाय भाव धरून। केली पारायणे पूर्ण। शांताबाईनी जाण। म्हणून सुखी अरविंद तो।।२५।। विश्वास म्हणून सत्वर। झाले ते दुःख दूर। अरविंदाचे खरोखर। सत्तेने समर्थाच्या।।२६।। म्हणून ठेवा भाव। तरीच पावेल देव। तुम्हा न उठाठेव। कशाची भाविक हो।।२७।। सत्य भाव ठेवून चित्तात। जा दर्शना त्वरे मठाप्रत। वंदा मौनीराज खचित। अनन्य भावे ते।।२८।। तीर्थाहून श्रेष्ठ संत। देव संताच्या मेळी नांदत। दत्त स्वये कथीत। भागवती ते।।२९।। म्हणून बाबांचे भक्तजण। येत पौर्णिमेस छान। होण्या ते पावन। मठावरी प्रत्येक मासी।।३०।। कार्तिक पौर्णिमेस एकदा। खग्रास चंद्रग्रहण होते सर्वदा। ग्रहणी होय आपदा। चंद्राची भीतीमुळे।।३१।। जे बाबांचे भक्त कट्टर। तेच येती मठावर। सुटण्या ग्रहण सत्वर। जन्म-मरणाचे

ते।।३२।। यापरी गर्दी मठावर। येती नारी, नर। दर्शन घेऊन सत्वर। जाती गृहा आपुल्या।।३३।। पौर्णिमेस गर्दी फार। काय केला चमत्कार। समर्थाने खरोखर। मठावर तो।।३४।। झोळी घेऊन कक्षीत। समर्थ आवाज करीत। दे दान सुटे ग्रहण म्हणत। जाती प्रत्येका सान्निध ते।।३५।। सर्व भक्त लाजले। काय द्यावे गुरूमाऊले। त्यांच आम्हास सर्व दिधले। न सुचे मौनी गुरूराया।।३६।। परि विन्मुख न लावणे। काही तरी त्यांना देणे। आठ आठ आणे घेऊन उसणे। मग देती समर्थाते।।३७।। यापरी नवाची बेरीज। मोजिता आली सहज। म्हणती धन्य भक्तराज। दिले दान रूपये नऊ ते।।३८।। परी शांताते समर्थ वदत। टाकी काही तरी झोळीत। मी न तसा उगा राहत। दान दिल्यावाचून ते।।३९।। शांता बोले नम्र वचन। त्याची आम्हा दिधले जाण।। मग मी कोठून देऊ दान। तुम्ही सर्वज्ञ दयाधना।।४०।। वदले बाबा तीस निक्षून। जर तू नच देसी दान। ही झोळी खाली नच उतरीन। सत्य सत्य जाण मम वचनाते।।४१।। शांता बोले प्रलय झाला जाण। सृष्टी उत्पन्न करी ब्रह्म पूर्ण। तरी शिर केले निर्माण। त्या आधी शेर केला तो।।४२।। म्हणून करते शिर अर्पण। तसेच दोन हात जाण। तुमच्या झोळीत दान। टाकिले मी दयाळा।।४३।। समर्था तुमचेच देणे। आम्ही तुमचे तान्हे। जाता आड मार्गाने। काढा त्यातून गुरूवरा।।४४।। ऐकून समर्थ हे वचन। म्हणती शांती धन्य धन्य। दिले उत्तर छान। समय पाहून ते।।४५।। शांता बोले गुरूवरा। मी विचार मनी केला पुरा। मस्तक अर्पिते दोन करा। पर्वकाळ बरा ग्रहणसमयी।।४६।। सोडा संसार धंदा। आठवा मौनी गोविंदा। तुटे भवबंध, होई आनंदा। आठविता नाम ते।।४७।। संत ठेवती जशापरी। या संसारसागरी। तसेच राहणे खरोखरी। सूत्रधारी संत ते।।४८।। देव जरी थोर

असला। तरी आज्ञेत गुंतला। तो संताच्या भला। न मोडी संत वचनाते।।४९।। निर्गुणरूप आकारा। धरिले अवतारा। संत आज्ञेत पूरा। वागे देव सर्वस्वी।।५०।। संताचे उपकार। देव मानी थोर। काम करी सत्वर। न सांगता ते।।५१।। होईल भक्तीचे वर्णन। पुढचे अध्यायी कथन। द्या कथेस्तव कान। हयगय न करा सर्वस्वी।।५२।।

।। श्री दासगणूचा वेडा श्रीरामलिखित श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ अध्याय सतरावा समाप्त।।
।। श्री मौनीबाबास अर्पण।।



प्रमुख मंदिरातील श्री दत्तात्रय प्रभूंची शाश्वत मूर्ती

# || अध्याय अठरावा ||

श्री गणेशाय नमः।। जय जयाजी सीतापती। देवाधिदेवा रघुपती। नमन असो तुजप्रती। श्रीरामप्रभू।।१।। दशरथ, कौसल्या दोघे जण। त्यांनी केले अपार पुण्य। अवतार धरी तू भगवान। सूर्यवंशी राघवा।।२।। जसी वेळ येई रामा। तसा वर्तसी मेघशामा। मनमोहन विश्रामा। रामराया तू।।३।। तूं पाळून मातृपितृ वचन। वना गेला त्वरा करून। राखिला वडिलांचा मान। दावण्या रीत विश्वाते।।४।। संताचे कार्य करण्यासी। विलंब नच करावा मानसी। सांगून गेले जन त्वरेसी। वडील आपुल्या गृहीचे।।५।। देहाची वाट पाहत। काळ वसला सतत। केव्हा घालील उडी खचित। न कळे मानवा ते।।६।। म्हणेन विचार करून। आप्पांनी स्वमनी छान। केले त्वरित येणे जाण। जुन्या गांवी ते।।७।। मंदिरास्तव जागा घेणे। होईल संताचे राहणे। तसी लहान, थोरा दर्शने। घडती चिखलीच्या ती।।८।। विचार मनी चालला। आले गोपाळाचे गृहाला। सावजी पदवी त्याला। माहीत सर्व चिखलीत ते।।९।। आप्पा म्हणती सावजीस। आलो तुमच्या गृहास। इर्जिक घालण्या तुम्हास। कार्य संताचे ते।।१०।। तव गोपाळ सावजी। म्हणे आप्पा मी राजी। वदा मनी असेल जी। गोष्ट तुमच्या ती।।११।। संत कार्यात मी न कधीच। आप्पा तुम्हा विरुद्ध सांच। वदा मज अनुमान नच। धरा तुम्ही आपुल्या मनी।।१२।। संत मौनीराज देव। असे आपुल्या गांवी ठाव। नच त्यांना कशाची हाव। निस्पृह संत एक ते।।१३।। आपुली रीत छान। म्हणून रमले मौनी भगवान। चिखली आहे पुण्यवान। म्हणून सावजी ते।।१४।। संत राहता गांवात। भाग्यवान ग्राम

नांदत। पुण्यवान जन पवित्र। संत दर्शन ते।।१५।। म्हणून बांधण्या मंदिर। जागा देणे सुंदर। विकत खरोखर। तुमची मालकीची ती।।१६।। सांगा किंमत सत्वर। न करिता उशीर। रुपये घेणे अगोदर। सांगणे काय इच्छत ती।।१७।। वदे सावजी एकच विचार। सव्वा बाराशे रुपये एकर। पाच गुंठे दान खरोखर। तुम्हा बरोबरी ते।।१८।। विचार केला सुंदर। रुपये अडीच हजार। देती सावजीस सत्वर। काशीनाथ आप्पा ते।।१९।। दोन एकर सहा गुंठे जागा। मौनीराज तेधवा उगा। म्हणे नच आता दगा। होण्या मंदिर देवाचे।।२०।। याच देही याच डोळा। पाहा संतसेवेचा सोहळा। ही बाणली कळा। आप्पास संतकृपे।।२१।। भार्गवसिंह राजपूत। वस्ती ईटगावांत। असे तो नांदत। तालुका रामटेक तो।।२२।। सात्त्विक असून। दयाळू तो पूर्ण। असे अति छान। स्वभावाने तो।।२३।। कर्माने पाठविले। म्हणून येणे झाले। सुखामागून भले। मानवा ठायी ते।।२४।। जरी दुःखाची वस्ती। भावे जे सळता भजती। दुःख जाय पळून त्वरितगती। भजता संसारी संताते।।२५।। गिरधर सिंहपुत्र। बिमार झाला मात्र। शिणले ते नेत्र। दुःखाने आई बापाचे।।२६।। धावा मांडिला जोडून कर। पाव मौनी गुरूवर। नच होई निष्ठूर। मायबापा तू।।२७।। धावून ये उठाउठी। करी जतन काठी। आंधळ्याची चोखटी। ज्ञानमूर्ते मौनीराया।।२८।। तुझ्याच पदारांत गिरधरसिंह खचित। दे जीवनदान त्वरित। तव दासाने।।२९।। मांडिले स्तवन। कंठ आला दाटून। धाव मौनी भगवान। फोडीला टाहो मोठ्याने।।३०।। तव होते बाबा मेडसीत। तया कळले चित्तांत। संकटी पाडिला भक्त। कुणी तरी मम तो।।३१।। शांता भक्त शोभत। केले तेथे अघटीत। डोके स्तंभावरी हाणत। लागले थेंब गळाया ते।।३२।। शांता बोले वचन। कशास्तव जाण। केले मन

कठीण। काय इंगित ते सांगा।।३३।। काळास समर्थ वदत। रक्त घे त्वरित। मम भक्तांचे दुःख सत्य। म्हणून केले यास्तव मी।।३४।। इकडे हरिकृपे नीट। गिरधरसिंह चोखट। झाला बरे चटपट। संतकृपेने तो।।३५।। रामसिंह एक भक्त। नांदत वर्धा शहराप्रत। अत्यंत विश्वासयुक्त। आठवी समर्थ नामाते।।३६।। उदर भरण्यासी। कपडे शिवे परियेसी। आठवी मौनी नामासी। सर्वकाळ तो।।३७।। देवेंद्रसिंह पुत्र झाला। तीन महिने होता तयाला। ताप अतिशय आला। म्हणून लागला रडण्या ते।।३८।। वैद्य डॉक्टर आणून। औषध दिले जाण। परि न येता गुण। श्वास झाला वर तो।।३९।। मांडीवर घेऊन मुलासी। रामसिंह आठवी देवासी। सुखी ठेव मम पुत्रासी। लागला रडाया दुःखभरे।।४०।। परी काठी पडे आंधळ्याची। तद्वत देवेंद्र गेला त्वरेची। असता माया बहुतांची। परलोका तो।।४१।। मातापिता रडती फार। पूर्व पापाचे गिरीवर। गेला आमुचा कुमार। देवेंद्रसिंह तो।।४२।। कुणाच्या मुखीचे अन्न काढीले। गाई वत्सा दूर केले। का संत-साधू ते निंदिले। म्हणून गेले पुत्ररत्न।।४३।। पंक्तीभेद केला असेल। लाविले दूषण संता घडेल। म्हणून पाप मजवरी पडेल। पूर्व जन्मीचे ते।।४४।। कुदळी, फावडे, टोपले घेऊन। आले रामसिंग गृही जन। तयारी करावी पूर्ण। स्मशान यात्रेची ती।।४५।। तव माता, पिता बोलती। एक करणे उपायाप्रती। किंमत न तयाची ती। होय कुणा ते।।४६।। तो उपाय खरा एक। मौनीतीर्थ अंगारा देख। राहिला होऊन निःशंक। विबुध हो आता।।४७।। मग नामस्मरण करून। मुखी तीर्थ अंगारा जाण। ''जय मौनी भगवान''। म्हणून पाजला सर्वा देखता।।४८।। भाव असल्यावर संतपाया। काळ नच धजे न्यावया। प्राण मुलांचे ते समया। टाकला श्वास देवेंद्रे तो।।४९।। हर्ष

झाला सर्वासी। हटविले काळासी। धन्य मौनीराज परियेसी। संत कली ठायाते।। ५०।। दत्तात्रये उठविला द्विजपुत्र। चित्रांगद जिवंत यमुनेत। भद्रायू तो खचित। शिव योगियाने तो।।५१।। सच्चिदानंद ब्राह्मण। ज्ञानेश्वरे उठवून। लिहविली ती जाण। ज्ञानेश्वरी त्या करे।।५२।। सावित्रीने सत्यवानाप्रत। जिवंत केले त्वरित। तोच न्याय वर्धेत। रामसिंह गृहाते।।५३।। नवल वाटले सर्वाला। जयजयकार केला। मौनीराज नामाचा भला। भक्तांनी अट्टाहासे तो।।५४।। मग फोटो मांडून सुंदर। पुजा केली अति छानदार। प्रसाद वाटिला सत्वर। भक्तांनी एकमेका।।५५।। उठला भाविकाचा पुत्र। मुख्य भाव व्हावा मात्र। उगेची लावता का नेत्र। आता तरी विबुध जन हो।।५६।। विश्वास भाव असता। तेथेच मौनीराज तत्त्वता। मिथ्या नच वार्ता। आला अनुभव सत्य माते।।५७।। या अध्यायी वर्णन छान। पुढे तर अमृताहून गहन। देऊन कथेस्तव कान। ऐका संताच्या त्या।।५८।।

।। श्री दासगणूचा वेडा श्रीरामलिखित श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ अध्याय अठरावा समाप्त।।

।। श्री मौनीबाबास अर्पण।।



१) श्री. हरिनारायणसिंग नागोरे यांच्या कुटुंबातील मंडळी.
२) श्री. पांडुरंगसिंग नागोरे यांच्या कुटुंबातील मंडळी.
३) श्री. शंकरसिंग नागोरे यांच्या कुटुंबातील मंडळी.
४) श्री. गणपतसिंग नागोरे यांच्या कुटुंबातील मंडळी.

# || अध्याय एकोणविसावा ||

श्री गणेशाय नमः।। जय जयाजी ॐकाररूपी शिवा। नमन तुज महादेवा। तुज नटलासी येधवा। सर्वाभपती पशुपते।।१।। मूळ स्वरूप तू कर्ता एक। विश्वरूप दिसे अनेक। तुझाच खेळ हा निःशंक। कळे विवेक करिता तो।।२।। सर्व परिवार तुम्ही निर्मिला। द्वैत नच मानावे मनाला। सर्व भावे शीव नटला। हीच भावना असावी दृढ।।३।। सादर होऊन आता। कर्ण देणे तत्त्वता। संतकथी सर्वथा। अनन्य भावे ते।।४।। समर्थ बंधू तिघे जण। संसारी वर्तती जाण। ऐका तयाचे महिमान। कसे असे ते।।५।। हरिनारायण नागोरे। बाबांचे वडील बंधू खरे। आकोल्यात नोकर बरे। तहसील क्लार्क ते।।६।। सुखदुःख नच चुकत। या न्याये झाली खचित। कन्या बिमार यथार्थ। हरिनारायणाची ती।।७।। तव विचार आठविला। हरिपत्नीस्तव चांगला। मौनीराज आळवू भला। जो स्वकुळीचा मायतात।।८।। फोटो मांडून छान। धूपदिप दिले लाऊन। मांडिले असे स्तवन। पती पत्नींनी ते वेळा।।९।। नच झोप नेत्राला। समर्थाचा धावा मांडिला। पाव या समयाला। मायबापा तू।।१०।। सहज झाले स्मरण। गुरूचरित्राचे पारायण। द्विजाहाती ते जाण। करविले हरिनारायणे।।११।। दया आली संतासी। जाऊन पुतण्याचे स्वप्नासी। दिला दृष्टांत परियेसी। हनुमान सिंहासी तो।।१२।। एक लहान मोटार। तीत बसून सत्वर। दोन बोटे साचार। दाविली समर्थांनी।।१३।। आनंद झाला सर्वासी। समर्थ पावले आम्हासी। जीवनदान दिले कन्येसी। दोन दिवसांनी ते।।१४।। अन्नदान केले अमित। दक्षणा द्विजाप्रत। हरिनारायण देत। हर्ष करून

ती।।१५।। हरिनारायण वदले। खरेच ईश्वर शोभले। आमुच्या वंशी भले। मौनीराज ते।।१६।। एकदा याच हरिनारायणाचा। आजारी पुत्र झाला साचा। गणपतसिंह नावाचा। अमरावतीमाजी तो।।१७।। दिन होता मंगळवार। घर मालकाने करून विचार। पाठविला तो तार। आकोल्यास त्वरेने।।१८।। परी करून विचार। धावा मांडिला सत्वर। जोडून दोन्ही कर। दाम्पत्यांनी ते समयी।।१९।। तुझाच आधार आम्हाते। विषमज्वर पुत्राते। ठेवी कुंकू कपाळी ते। कमळाबाईचे मौनीराया।।२०।। तार समर्थास आली। यावे सत्वर आकोल्याला। गणपतसिंह बिमार झाला। न पाहता वाट येणे।।२१।। समर्थ आले सत्वर। गणपतसिंह वदे गुरूवर। झालो तीन वेळ बीमार। वाटे न आता वाचतो मी।।२२।। समर्थ वदले न होई हताश। दुःख जाय विलयास। दिन बारा दिवसांत। होसी रोगमुक्त तू।।२३।। तेच खरे झाले बोला। दुःख पळाले समूळ। नीट झाला तात्काळ। गणपतसिंह समर्थकृपे।।२४।। हरिसिंह जावई सुंदर। पारायणा बसला सत्वर। सात दिनाचा नेम खरोखर। करून तो दृढभावे।।२५।। पूर्ण पारायणे झाली सात। गुण आला गणपतसिंहाप्रत। समर्थ पुतण्या निश्चित। पुत्र हरिनारायणाचा तो।।२६।। व्याधी येता शरीराप्रत। भोगणेच लागे खचित। चुके ना अजिबात। काही केल्या ती।।२७।। भक्ती प्रेम भरतापरी। चौघांचे अत्यादरी। रीत न भिन्न तिळभरी। बंधूची ती श्रोते हो।।२८।। तिघे संसारी वर्तत। बाबा विदेही त्वरित। तिघा परिवार बहुत। बाबांना नच काही।।२९।। तिसरे बंधू बाबांचे। पांडुरंग नागोरे साचे। असती मूर्तिजापूरचे। रहिवासी सांप्रत ते।।३०।। एकदा पत्नी सरस्वती। तापाने आजारी होती। तो वाढला अति। तेव्हा करी धावा बाबांचा।।३१।। भक्ति करिता गुण आला। ज्वर पत्नीचा निघून गेला।

म्हणून तो बहु हर्षल। कृपा झाली बाबांची।।३२।। मौनीबाबास सर्वजण। एकरूप दिसे जाण। म्हणून धावा तो ऐकून। केले संकट दूर त्यांचे।।३३।। आकारामपुत्र शंकर। नागपुरात वसे साचार। बुद्धीमान तसा चतुर। बहु असे जन हो।।३४।। समर्थ बंधू विद्या शिकले। मॅट्रीक पास झाले। हायकोर्टात काम चांगले। करीत शंकर नागोरे।।३५।। भक्ती, विश्वास, कष्ट। रात्रंदिन करी स्पष्ट। समर्थ बंधू एकनिष्ठ। वकिलीस्तव ते।।३६।। चिखलीस येत सत्वर। आधीच कधीत गुरूवर। होसी वकील झडकर। आले प्रत्यया त्या ते।।३७।। सर्व जग भावंडे तुमचीच। आम्ही करणे तुझीच। भक्ती ती हो खरीच। रंभाई पुत्रा।।३८।। आम्हा नच दूर लोटणे। तुझेच मी तान्हे। तुझीच आस करणे। सर्वस्वी आम्ही।।३९।। तू लक्ष्मण थोरला। हरिनारायण राम भला। पांडुरंग भरत शोभला। शत्रूघ्न मी बंधू धाकटा।।४०।। त्वा कुळाते उद्धारिले। साधू होऊन चांगले। विश्वास नाव वाढले। ''मौनी भगवान'' ते।।४१।। तू राजपूत वंशी दीप। उजळे कूळ आपोआप। दत्ताचेच तू स्वरूप। रामकृष्ण दयाळा।।४२।। शंकर वदे स्त्रियेसी। आठवला विचार मानसी। आळवू मौनी चरणासी। जो असे साधू खरा।।४३।। ज्याने स्ववंश उद्धारीला। कुलदिप जो बनला। तपयोगे तो भला। राजपूत कुळामाजी।।४४।। व्रत पौर्णिमेचे। प्रिये आपण करू साचे। रत्न शोभले कुळीचे। समर्थ मौनीराज ते।।४५।। पौर्णिमेचा जन्म म्हणून। असे नाम मौनी भगवान। अवघ्या जगात जाण। माहीत सर्वा ते।।४६।। विश्वास ठेवून चरणी। सेवा करू निर्वाणी। घे धाव शीघ्र मौनी। आपणांस्तव कांते।।४७।। ऐकून पतीचे वाक्यासी। कलावती मुदित मानसी। श्रध्दा धरून परियेसी। करू सेवा एकनिष्ठे।।४८।। लगेच शुभ दिनासी। पाहून तिथी नक्षत्रासी। बसले

पारायणासी। जीवनामृत ग्रंथाच्या ते।।४९।। व्रत पौर्णिमा छान। केली पुजास्तव पूर्ण। आला तयाते गुण। समर्थ कृपेने तो।।५०।। पावले संत दाम्पत्यासी। दिले पुत्ररत्न त्यासी। सुभाष नाम जयासी। जे निधान शंकरचे।।५१।। त्रेचाळीसावे वर्ष वया। लाभले पुत्ररत्न तया। समर्थ भक्ती न वाया। गेली तया दोघांची।।५२।। कुसुम कन्या शोभत। हरिनारायणाप्रत। पुतणी समर्थाची खचित। नात आकारामाची ती।।५३।। विवाह झाला तिचा। बरबडीत पती साचा। हरिसिंह सोनाये नावाचा। राजपूत सूर्यवंशी।।५४।। या कन्येस झाले संतान। नव महिण्याचे ते जाण। जन्मला पुत्र छान। परी मेला तो शीघ्रही।।५५।। म्हणून नवस केला। समर्थ चरणी भला। संततीचा लाभ झाला। तर काढीन जावळे मठी।।५६।। यापरी नवस केला पूर्ण। पावले मौनी भगवान। रणजितसिंह जाण। दिला पुत्र भक्ताते।।५७।। नवस केला पुरा। जावळे काढिले त्वरा। मठी करून विचारा। मांडीवर बाबांच्या ती।।५८।। कवळूसिंह रोगग्रस्त। औषधी बहु घेत। परी न ये गुण त्याप्रत। काही केल्या तो।।५९।। मग वदे जनास। जरी गुण ये खास। करीत मौनीबाबांच्या व्रतास। पौर्णिमेच्या मी।।६०।। यापरी नीट झाला। संत पावले त्याला। करीत असे व्रताला। कवळूसिंह तो।।६१।। या पुढचे कथन। पुढचे अध्यायी जाण। देणे संतकथेस्तव कान। सोडून आळस तो।।६२।।

।। श्री दासगणूचा वेडा श्रीरामलिखित श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ अध्याय एकोणविसावा समाप्त।।

।। श्री मौनीबाबास अर्पण।।



श्री परमहंस रामकृष्ण मौनीबाबा चिखली व परमहंस बद्रीबाबा मूर्तिजापूर यांची भेट
इ.स. १९५४ (शके १८७६)

# || अध्याय विसावा ||

श्री गणेशाय नमः।। जय जय जगज्जननी। आदीमाया प्रणवरूपिणी। हरिहरात्मक शिवपत्नी। मायबाई रेणुके।।१।। तूंच केले विश्व निर्माण। शिवास साह्य होऊन। न भिन्न तुम्ही द्वय जण। कालत्रयी अंबिके।।२।। आधी तूच निर्माण झालीस। मग त्रिगुणाते प्रसवलीस। सात्त्विक रजतिमास। निर्मिले सृष्टी आधी।।३।। त्रिगुणापासून तिन्ही देव। ब्रह्मा विष्णू सदाशीव। सृष्टि कार्यास्तव। निर्मिले त्वा आदीमाते।।४।। लक्ष्मी होऊन साह्य विष्णूस। ब्रह्मास सावित्रीरूपे विशेष। पार्वतीरूपे शंकरास। करी मदत सृष्टी कार्या।।५।। तुम्ही न बुध्दी द्याल। वेडा राम्या काय लिहील। काव्य नच होईल। तव कृपा विरहीत देवी।।६।। तुझी व गुरूची साथ न होई। ते कार्य तडीस न जाई। व्यर्थची हाव काई। गुरूकृपा न होता ती।।७।। काया जरी भिन्न। आत्मा एकच जाण। म्हणून वंदून चरण। वळतो कथेकडे विबुध हो।।८।। उबगला संसारात। म्हणून जाय भेटण्याप्रत। सोयऱ्याला त्वरित। जसा एखादा प्राणी।।९।। तसे समर्थास वाटले। मठी असता भले। जावे संत भेटीस वहिले। बद्रीबाबांच्या त्वरे।।१०।। यापरी विचार केला। लगेच मूर्तिजापुरला। सोडून चिखलीला। आले समर्थ वायुसम ते।।११।। बसून टांग्यात समर्थ। निघाले ते यथार्थ। भेटण्या बद्रीबाबाप्रत विठ्ठलराव गृहाते।।१२।। हे समजले बद्रीबाबास। मौनी येत भेटण्यास। म्हणून बसले टांग्यात निःशेष। करून विचार तो।।१३।। दोघांचे एक चित्त। म्हणून बसले खचित। टांग्यात सतत। एकाच दोघे ही।।१४।। आले विठ्ठलगृहासी। पुजून मग द्वय संतासी। केले नमन आदरसी।

त्या विठ्ठल भक्ताने।।१५।। आप्पास वरदान मौनी मुंगसाजीचे। विठ्ठलराव बद्रीबाबाचे। दोघेही वीर गाढे भक्तीचे। पाहा वऱ्हाडामाजी ते।।१६।। दाऊन चमत्कार जनासी। कार्तिक वद्य त्रयोदशीसी। समाधिस्थ परियेसी। झाले मूर्तिजापूरी ते।।१७।। शके अठराशे अठ्याहात्तर। गेले इहलोक सोडून सत्वर। मिळाली ज्योतीत ज्योत साचार। तया बद्रीबाबाची।।१८।। आणून विठ्ठलरावाचे मळ्यांत। बद्रीबाबाते खचित। केली समाधी सांप्रत। भाविकांनी तो।।१९।। मग विचार केला। मूर्ती स्थापण्याचा भला। लगेच काम मंदिराला। लाविले विठ्ठलरावांनी ते।।२०।। देऊळ बनविले टुमदार। मूर्ती बाबांची मनोहर। आणून ती सत्वर। केली प्रतिष्ठा विप्र करे।।२१।। मग म्हणती बसवू कळस। आणिले बहु संतास। आमंत्रणे देऊन खास। त्या विठ्ठलरावाने।।२२।। सर्वांनी विचार सुचविला। मौनी करे कळसाला। बसला सर्व कळे तयाला। चतुर असून विदेही तो।।२३।। यापरी करून विचार। कळस बसविला सत्वर। मौनीबाबांनी झडकर। दिले दान दक्षणा द्विजांते।।२४।। समान दृष्टी सर्वाभूती। विषम नच नेत्राप्रती। दिसे दोघांच्या कल्पांती। एक आत्मा सर्वांचा।।२५।। समर्थ मौनी भगवान। मी आणि श्वसूर जाण। नाम जयाचे शंकर पूर्ण। जो नर्शीत राहत असे।।२६।। ऐका श्रोते सावचित। श्री समर्थ कथेप्रत। पाप जळे अमित। परिसता संतकथा ती।।२७।। कर्णोकर्णी ऐकली मात। मौनी नांदे चिखलीत। शरण जाणे तयाप्रत। होण्या इच्छा पूर्ण ती।।२८।। यापरी विचार केला। चिखलीस आला। श्री समर्थ मठात। भक्त किसनदास भय्या।।२९।। समर्था घातले लोटांगण। विनवी कर जोडून। ऐका समर्था माझे वचन। दीन दुबळ्यांचे ते।।३०।। मम पुत्रास नच संतती। हीच चिंता गहन ती। जाळी मम रात्रंदिन ती। पाहण्या

नातवाते।।३१।। तुम्ही कृपा करून। चला आकोटास पूर्ण। देण्या सुनेस दर्शन। होण्या संतती लाभ तो।।३२।। देवाहून संत थोर। कृपेचे ते सागर। निर्दयी नच तीळभर। ऐसी साक्ष पुराणाची।।३३।। ऐकूण शेठजींचे वचन। समर्थ वदती त्याकारण। मी नच देवाहून श्रेष्ठ जाण। किसनदास भक्ता।।३४।। परी नच सोडी चरणासी। हट्ट धरिला मानसी। समर्थास नेईन आकोटासी। हाच दृढ निश्चय माझा।।३५।। लगेच करून पुजनासी। नमस्कार केला समर्थासी। मग दिले प्रसादासी। किसनदास भक्ता।।३६।। आणिक बोलती वचन। दे तव सुनेकारण। कृपा करील भगवान। होण्या संतती तिला।।३७।। लगेच प्रसाद सुनेसी दिधला। धरून दृढ भक्तीला। लगेच तिने तो सेविला। राहिली गरोदर श्रीहरीकृपे।।३८।। नव मास होता पूर्ण। प्रसूत झाली साध्वी जाण। ऐका अपत्याचे नामनिधान। पुष्पलता नामे ती।।३९।। संतकृपा झाली म्हणून। लालचंदास संतती जाण। अगाध समर्थाचे महिमान। काय न करिती ते।।४०।। मात्र विश्वास असावा। भक्ती करून अनुभव घ्यावा। तेव्हाच सुख होय जिवा। केल्या कृपा संताने।।४१।। या पुढचे कथन। पुढील अध्यायी जाण। असू द्या संतकथाते कान। सोडून सर्व चिंता ती।।४२।।

।। श्री दासगणूचा वेडा श्रीरामलिखित श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ अध्याय विसावा समाप्त।।

।। श्री मौनीबाबास अर्पण।।



**श्री परमहंस रामकृष्ण मौनीबाबांच्या चिखलीला नियमित दर पौर्णिमेला वारी केल्यामुळे सत्यनारायणाच्या पोटात वाढलेले कोंब नाहीसे झाले.**
**इ.स. १९५८ (शके १८८०)**

# || अध्याय एकविसावा ||

श्री गणेशाय नमः|| श्री सरस्वत्यै नमः|| श्री गुरूभ्यो नमः|| श्री कुलदेवताभ्यो नमः|| श्री कृष्णाय नमः|| जय जयाजी श्री गुरूराया। नमन असो तव माया। बुद्धी द्यावी सहृदया। संत काव्याते मज||१|| तू अससी महीपती। कलीयुगीचा निश्चिती। अमित रचले काव्याप्रती। न होय गणती शेषाते||२|| तुमचे नाम दासगणू। न करा मनी अनुमानु। रचण्या काव्य निधानु। साह्य तुमचे ते असो||३|| श्री गुरू दासगणू जाण। तसे मौनी भगवान। जातो द्वय जणा शरण। होण्या रोगमुक्त ते||४|| ऐका समर्थ कथा आदरे। जन्माजन्मी होय बरे। दुःखाचे न लागे वारे। तुम्हा संतकृपा होता||५|| जे वैद्य न करीत। तेच संताने होत। कळेल तुम्हांप्रत। वाचिल्या कथा बाबांची||६|| दामोदर मारवाडी। भक्ती बहु चोखडी। न करी कदा अडाअडी। ईशसंत सेवेस्तव तो||७|| खेर्डा ग्रामात वस्ती। शेठजीची निश्चिती। बुलढाणा त्या प्रती। जिल्हा असे विबुध हो||८|| पुतण्या एक सत्यनारायण। त्यास उदरव्यथा पूर्ण। रात्रंदिन नच चैन। तळमळे मच्छापरी तो||९|| पिता, चुलता म्हणती। पूर्व पापाची ही झडती। दूर न होय कल्पांती। झाले पाच वर्षे तया||१०|| परी देवही पावे ना। गुणही येईना। विचार केला तक्षणा। नेऊ दवाखान्यामाजी त्याला||१२|| दुःखापुढे नच किंमत। धनाची आम्हा प्रत। लावू पैसा अमित। पुतण्यास्तव आता||१३|| चौधरी डॉक्टर नामांकित। त्याने तपासले शरीराप्रत। श्वासनलिका अन्ननलिका जाण। तया फुटले कोम परीपूर्ण। द्वय ठायी ते उदरी||१४|| तरी करावे लागे ऑपरेशन। परि वाईट झाल्यास जाण। न

आम्ही जिमेदार पूर्ण। सांगतो स्पष्ट तुम्हाते।।१५।। दुःखाचा मायतात। असे चिखलीत सतत। आप्पाचे मळ्यात। नाम ज्याचे रामकृष्ण।।१६।। परास्तव जे जे दुःख होई। ते ते नीट करी मौनी आई। म्हणून निघाले घाई घाई। पिता-पुत्र ते जाण्या।।१७।। सोडून खेर्डा ग्रामासी। आले त्वरा चिखलीसी। नमन केले समर्थासी। अनन्य भावे ते।।१८।। मौनीस नमस्कार करून। कथिले सारे वर्तमान। सत्यनारायणाचे जाण। उदाराचे दुःख नथमलजीने।।१९।। समर्था पुष्कळ। धन लावले निश्चल। दूर होण्या केवळ। रोग उदराचा तो।।२०।। वैद्य, डॉक्टर पाहिले। औषध बहु घेतले। परी नच वाकडे जाहले। बाबा रोगाचे ते सर्वस्वी।।२१।। आखरी उपाय म्हणून। धरिले तुमचे चरण। नच केले ऑपरेशन। प्राण भीतीने आम्ही ते।।२२।। अकरा पारायणे ग्रंथाची। वारी करी पौर्णिमेची। व्याधी दूर तव पुत्राची। होय दत्तकृपेने।।२३।। नियमाने वारीस तू येणे। खंडीत नच करणे। हेच तुम्हा सांगणे। नथमल शेठजी मम ते।।२४।। भाव धरून मनात। केली पारायणे त्वरित। वाऱ्या त्याही खचित। न धरिता गुढी ती।।२५।। डॉक्टरांनी हात टेकले। तेच दुःख पळाले। सत्यनारायणाचे भले। समर्थकृपा होता जन हो।।२६।। जरी दुःख नीट झाले। वारीने नच सोडिले। एक हजार रुपये दिले। शके अठराशे ऐंशीत मंदिरासाठी।।२७।। चालवी नित्य वारीस। नाही मनी अविश्वास। दुःख गेले विलयास। होता भाव म्हणून तो।।२८।। एक निष्ठा धरावी। संत सेवा करावी। सोय ती पाहावी। मुख्य समर्थ सेवेची।।२९।। गेला कुडीतून प्राण। मौनीचे न सोडा चरण। देईल ती शिकवण। तुम्हा भव तरण्याची।।३०।। एकदा वारा सुटला। पाणी पडून अवकाळी भान। त्यायोगे कहर झाला। गुराढोरांना तो।।३१।। नथमल शेठ धांवा करी। मम बैल गांवाबाहेरी।

रक्षण तयाचे तू करी। समर्था तू त्वरे।।३२।। फोटो पुढे ठेविला। पठन करी स्त्रोत्राला। विघ्न गेले लयाला। समर्थ कृपेने ते।।३३।। तसेच अमरावतीस जाता। चोर मार्गी भेटले तत्त्वता। शेगांवाजवळ सर्वथा। शेठजीकारण ते।।३४।। परी धांवा मांडिला मनात। चोर नच कांहि करीत। रक्षण करी मौनीनाथ। नीज भक्ताचे ते।।३५।। धनराजसेठ देऊळगावांत। फुला नामे भगिनी सत्य। संतसेवा करीत। बंधुभगिनी ती।।३६।। गृहीचे श्रीमंत असती। परी कोणी केली भानामती। बिबे अंगावर येती। तशी फाशी गळ्यात ती।।३७।। श्रीमंत वाटे सुखांत। परी तो अवघा दुःखात। नच झोप त्याप्रत। चिंता सर्व काळ ती।।३८।। पुष्कळ उपाय केले। परी नच काही झाले। रोगाचे ठाणे उठले। नच शरीरातून ते।।३९।। तीन चार हजार रुपयांसी। होऊन खोरी परीयेसी। गेले खाऊन पैशासी। भुट्टे चोर ते पाहा।।४०।। एक बोले शेठजीस। काढीन भानामतीस। रुपये देणे पन्नास। गुण येता तुम्हा।।४१।। छाछूं करीत त्वरित। पैसा टाकीतो खिशांत। गेला पळून अजिबांत। पुन्हा काय दिसतो तो।।४२।। मग होऊन भगिणीस। आला लगेच चिखलीस। समर्थास वंदून निःशेष। सांगे दुःख द्वय जनाचे।।४३।। समर्थ वदले त्यास। येणे दोन वर्षे पौर्णिमेस। तू आमच्या मठास। अनन्य भावे अखंड।।४४।। हो म्हणून जोडी हात। मग भाव धरून सत्य। ये मठी वारी-प्रत। कित्येक मासी तो।।४५।। एकदा फुलाबाईस। सर्पदंश झाला पायास। रक्त लागले वाहण्यास। पायांतून ते।।४६।। फुलाबाई वदे बंधूराया। खरा वैद्य चिखली ठाया। आणून काय? तो वाया। जाय डॉक्टर आता।।४७।। समर्थ नाम घेऊन। विभूती लावता जाण। उतरले विषपान। धनराज भगिनीचे ते।।४८।। संसारी भाविक असती। तसे निंदकही नांदती। संत त्यामुळे पुढे

येती। केल्या निंदा अखंड ती।।४९।। आप्पाची पुतणी एक असे। पार्वती नाम जिचे असे। सर्वकाळ सेवा ती करीतसे। बाबांची साचपणे।।५०।। तन, मन, धन अर्पून। सेवा करी रात्रंदिन। परी असह्य पुत्रालागून। जाहले प्रल्हाद नामे तो।।५१।। म्हणे का कक्षरीते बाबाची। ही मम माता सेवा सांची। काय होईल दूर व्यथा भवाची?। दिल्यावर रत्न तयाने।।५२।। आणि निंदा करी रात्रंदिन। तसेच मातेशी भाषण। न करी त्या दिनापासून। सेवाही न करी तो बाबांची।।५३।। काशीनाथ आप्पा वदती। ऐक तू मम वचनाप्रती। ते संत साच असती। नको निंदू प्रल्हादा तू।।५४।। वर्षे झाली बारा त्यासी। ते साधू राहती चिखलीसी। व्यर्थची का पात्र दोषासी। होसी प्रल्हादा बाळा तू।।५५।। निंदा दक्षाने केली। म्हणून त्याची घेतली। त्याचेच कर्माने भली। आहूती शेवटी।।५६।। आपण जे करितो कर्म। बरेवाईट निश्चित। तेच भोगावे लागते परम। आपली क्रिया बाधक आपणाते।।५७।। संतनिंदा देवाही आवडे ना। दुर्वासामागे चक्र लागले ना?। अंबरिषाच्या निमित्ते जाणा। हे विसरू नको केव्हाही तूं।।५८।। परी न ऐके तो प्रल्हाद बाळ। ईश्वर क्षोभे झाला भ्रमिष्ठ तात्काळ। पुत्र पार्वतीचा अमंगळ। हिंडे वेड्यापरी सर्वदा।।५९।। श्रोते जन, जरी निंदा केली। तरी नच क्रोधाची उर्मी उठली। कैसी कमाल झाली। त्यांच्या शांतपणाची।।६०।। ज्याची करणी त्याला बांधते। कुणी न काही करी कुणाते। 'ज्याचे त्याला' मौनीबाबा म्हणते। ध्यानी असू द्या हे।।६१।। एकदा समर्थ शेगांवांत। गेले गजानन मंदिरात। रमले सहज स्थितीत। स्वानंद भावे ते।।६२।। मग मंदिरांतून चालले। समर्थ फिराया भले। गांवांत ते वहिले। सहज गत्या ते।।६३।। वैराग्य वस्त्र आगळे। निंदका नच कळे। म्हणती हे ढोंगी चाळे। नंग्याचे असती कलित ते।।६४।। काठोडे एक निंदक।

करे मारी निःशंक। समर्थाते न करता विवेक। खरा खोटा तो मनी।।६५।। लाज नच यासी। हिंडतो रस्त्यासी। स्त्रिया खाली महीसी। पाहती लज्जेमुळे।।६६।। कृषीवल ओंब्या झोडीत। त्यापरी समर्था मारीत। नाही नच म्हणत। समर्थ त्या दृष्टास्तव।।६७।। आत्मा नच मार खात। मग कां करू हरकत?। आपेच शिणतील हात। तयाचे ते मारता।।६८।। मार मारून कर शिणले। फळ ते त्यास मिळाले। पोटशूल भारी उठले। त्या काठोड्यास ते वेळा।।६९।। समर्थ हरिस्मरण करीत। तो शरण बाबाप्रत। आला तो दृष्ट त्वरित। म्हणे पापी बहु मी असे।।७०।। माझी करणी घ्या पदरात। कृपा करा पोट बहु दुखत। ना तरी जातो यमपुराप्रत। मम करणीमुळे समर्था।।७१।। एवढा अपराधी गहन। क्षमा ती करून। दूर केले व्याधी लागून। त्या निंदकाच्या।।७२।। जसे बाबा सागर शांतीचे। तसे तुम्ही आम्ही क्रोधाचे। न होय सहन ओझे माशीचे। बसता नाकावरी ती।।७३।। निंदा नच करावी। सोय सर्वांत धरावी। सेवेची ती बरवी। भाविक जनहो।।७४।। विठ्ठल रूक्मिणीचे दर्शन। पुढील अध्यायी छान। द्या संतकथाते कान। सोडून आळस तो।।७५।।

।। श्री दासगणूचा वेडा श्रीरामलिखित श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ अध्याय एकविसावा समाप्त।।

।। श्री मौनीबाबास अर्पण।।



श्री परमहंस रामकृष्ण मौनीबाबांनी शंकरला पंढरीस न नेता
शेगावलाच विठ्ठलरखुमाईचे दर्शन करून दिले. इ.स. १९५७ (शके १८७८)

# || अध्याय बाविसावा ||

श्री गणेशाय नमः|| श्री सरस्वत्यै नमः|| श्री नवग्रहाय नमः|| श्री म्हाळसाकांताय नमः|| श्री गुरूभ्यो नमः|| जय जयाजी श्रीकृष्णा। नमन असो नारायणा। बुद्धी द्यावी मज दीना। संतकाव्यास्तव प्रभू||१|| तुझ्यापासून त्रिभूवन। झाले बा सर्व निर्माण। इच्छा तुझीच म्हणून। ॐरूपा विष्णू भगवंता||२|| आयु जाय झरझर। करा नाम व्यापार। देह असे क्षणभंगूर। जाय केव्हा ना कळे||३|| शरण जा संतासी। मौनीराज यासी। तोच ने पैल तटासी। आपणाते त्वरे||४|| एकदा समर्थ शेगांवात। शंकरा घेऊन येत। गजानन मंदिरात। गेले दर्शनास्तव ते||५|| शंकर भाविक फार। समर्थभक्त खरोखर। सेवा करी झडकर। सोडून आळस तो||६|| मौनीराज शंकर। घेत दर्शन सत्वर। गजाननाचे साचार। तो भेटले पुरुषोत्तम पाटील ते||७|| ते बोलती समर्थासी। चला तुम्ही पंढरीसी। पाहण्या बाप ऋषीकेशी। मालक सर्व त्रिभुवनाचा||८|| तेच समर्थ त्यासी वदती। मी नच ये पंढरीप्रती। जाणे मज मठा शीघ्रगती। चिखली माजी भक्तास्तव||९|| पौर्णिमेस भक्त येतील। माते न देखता होतील। दुःखी करिती हळहळ। मजस्तव ते अंतरी||१०|| म्हणून तुम्हीच जावे। सांगा मम नमन अनन्य भावे। सर्व असे विठ्ठलास ठावे। मम मनीचे सुख, दुःख ते||११|| पाटलाची वारी म्हणून। गेला तो पंढरीस जाण। तो इकडे काय वर्तमान। झाले शेगांवी ते ऐका||१२|| बाबाचा नियम कडक। परगांवी गेले देख। परी करून विवेक। येती पौर्णिमेस्तव मठी||१३|| आग्रह जरी झाला। नच राहती परगांवला। त्वरे येती मठाला। वारी निमित्ये ते||१४||

माय, तात सर्वांचा। नच लोभ कुणाचा। सरळ ये मठी साचा। परगांवाहून तो।।१५।। तव शंकर हताश झाला। म्हणे विठ्ठल भेट का दीनाला। पूर्व पुण्य नच दर्शनाला। आपुले ते असे।।१६।। सर्व शुभ गोष्टीत। पूर्व पुण्य विशेष। लागे निःशेष। मानवाचे विबुध हो।।१७।। यापरी बसला दुःखात। शंकर मग मंदिरात। तव समर्थ तया वदत। येणे रिती श्रोते जन हो!।।१८।। नच होई नाराज चित्तात। विठ्ठल रुक्मिणी रथांत। आले पहा मंडपात। घे दर्शन त्वरे तू।।१९।। शंकर वदे मनात। समर्थ मम दिलगी करीत। मना हर्ष होण्याप्रत। काहीतरी ये वेळा।।२०।। शंकर नच उशीर। करी तू चतूर। दर्शन घे सत्वर। वाट पाहत तुझी श्रीहरी।।२१।। विश्वास ठेऊनी वचनी। शंकर उतरला वरूनी। जो होता माडीत निर्वाणी। गजानन मंदिराच्या।।२२।। पाच वाजतांची वेळ। घेतले दर्शन तात्काळ। न करता गरबळ। शंकराने मुदीत मने।।२३।। आनंद झाला शंकरासी। म्हणे देवदर्शन मजसी। वर्णू किती समर्थासी। पुरविली आस मनाची।।२४।। चरण धरून विनवी। क्षमा मज असावी। न कळली थोरवी। तुमची मज काही।।२५।। चिखलीमाजी भक्त। शेवंताबाई नांदत। माळी जिची जात। आडनांव भराडे ते।।२६।। शेवंताबाई गेली। देऊळगांवा भली। तेथे गोष्ट एक घडली। अपघाताची ती।।२७।। विचार नच दृष्टास। विष घातले म्हातारीस। पंधरा दिन आजारी खास। देऊळगांवी झाली ती।।२८।। बेशुद्ध झाली म्हातारी। दत्तात्रय पुत्र निर्धारी। तो धावा त्वरे करी। समर्थ रामकृष्णाचा।।२९।। धावा ऐकून भक्ताचा। आला मायबाप दिनाचा। शेगांवाहून त्वरे साचा। देऊळगांवी रात्री।।३०।। लगेच पुजन केले। समर्थ तीर्थ दिले। म्हातारीस चांगले। पिण्याते दत्तूने।।३१।। चरण तीर्थ उदरांत। जाता ते खचित। शुद्धीवर येत। ती म्हातारी श्रोते हो।।३२।।

एकदा दत्तात्रय काम करी। मोठ्यांत हमाली बरी। पोटास्तव काहीतरी। करणे बहुधा गरिबांने।।३३।। दहाबारा पोती असती। बेशुध्द झाला त्वरित गती। नच शुध्दी कशाची ती। तया दत्तात्रयाते।।३४।। परी शुध्दीवर येऊन। करी मना नामस्मरण। समर्थाचे जे परिपूर्ण। अनन्य भावे तो।।३५।। धावा ऐकून भक्ताचा। भार काळी ओझ्याचा। झाला भास तो साचा। तया वेळी दत्तुते।।३६।। खरंच पोती पडली। मग हाक ठोकीली। आली मनुष्ये वहिली। तत्क्षणी धावून तेथे।।३७।। सर्वांनी काढून पोती। पाजून उदक त्याप्रती। सावध शीघ्रअति। झाला दत्तात्रय भराडे।।३८।। यापरी जीव वाचला। समर्थकृपे भला। भाव म्हणून पावला। मौनीराज तो।।३९।। शंकुतला नामे कुमारी। दत्तुची भगिनी खरी। शेवंता माय बरी। असे ते जन हो।।४०।। इस गर्भ राहिला। प्रसुत समयी त्रास इजला। होय तो भला। नवमासांत तर तो।।४१।। म्हातारी वदे समर्था। मठी येऊन तत्त्वता। सुखरूप पुत्र होता। काढीन जावळे तव मठी।।४२।। यापरी नवस करून। म्हातारी गेली गृही जाण। तो जाहली बाळंतिण। सुखरूप कन्या ती।।४३।। पुत्र झाला तिस। बहु आनंद सर्वांस। झाला असे खास पुत्रप्राप्तीमुळे।।४४।। सव्वा महिन्यांचा बाळ। आणून मठावर निश्चल। काढिली ती जावळं। समर्थ मांडीवरी तिने।।४५।। भाव म्हणून उतरले विष। वाचविले पुत्रास। न होतो आयास। दिले पुत्रफळ ते।।४६।। भाव धरा, भाव धरा। मौनी संत येती घरा। येण्या उशीर नच जरा। समर्थाते जन हो।।४७।। वसंता न आला कचेरीसी। बंधू त्याचा आला चिखलीसी। कुठे हरवला पुसे मौनीसी। लवकरच येईल म्हणे समर्थ।।४८।। अकरा रुपयाचा प्रसाद वाटला। नवस बोलला तो फेडला। संतपदी लीन झाला। बंधू वसंताचा।।४९।। एकदा

शेगांवात। समर्थ गेले दवाखान्यात। एक स्त्री येऊन दर्शन घेत। केला नवस ते वेळा।।५०।। मज गुण आला जर। पाच रूपयाचे पेढे साचार। वाटीन ते मठावर। झाल्या रोगमुक्त मी।।५१।। समर्थ कृपा झाली। बिमारी दूर वहिली। स्त्रियेची ती केली। घेतले दुःख स्वांगी।।५२।। आवरक्ताची हागवण। समर्थकृपे बसली म्हणून। वाटी पेढे बाई छान चिखलीस बाबामठी ती।।५३।। संत दयाळू फार। दुःख घेतले आपणावर। हागवण महिनाभर। तसे अन्न नच पोटात।।५४।। बाळकृष्ण भक्त। सोमवारी येत। दर्शना त्वरित। धोत्र्याहून तो मठी।।५५।। येऊन घे दर्शन। धुनीतील अंगारा लावून। ने घरी पुडीत बांधून। सर्व लेकरा-बाळांते।।५६।। एकदा गार दिसली। धुनीमाजी भली। कमरेस बांधली। प्रसाद म्हणूनी त्वरे।।५७।। गांवातल्या जनासी। गार दाखवी सायासी। मज पावले समर्थ त्वरेसी। तो रूप आले खडीसाखरेचे।।५८।। प्रसाद म्हणून भक्षिली। त्याला महती कळली। समर्थाची ती भली। सांगे धोत्रामाजी सर्वा ते।।५९।। आता ऐका चमत्कार। मनी सुख होईल अपार। भक्तकथा ऐकता साचार। प्रेमळ भाविक मने।।६०।। पुंडलिक महाराज गोरेगांवचे। असती काटेपूर्णतिरीचे। अवतार शोभती कृष्णाचे। ज्यांचे कुळ धनगर ते।।६१।। चैत्र शुद्ध पंचमी खचित। जन्माला पुंडलिक भक्त। त्या दिवसानिमित्त। मांडिला उत्सव गोरेगांवी।।६२।। फक्त होते गोरेगांवी संत। मौनीबाबा, कोंगसाजी खचित। अनंतबुवा, दादा धुनीवाले यथार्थ। तसेच हरिबाबा ते।।६३।। काही पाच रत्ने बसली माडीवरी। अंगदरावाचे निर्धारी। त्या गोरेगांव ग्रामांतरी। आनंदी सुखी सर्वकाळ ते।।६४।। माडीवरी आली बाई। म्हणू लागली हे गुरूमाई। व्यर्थ यावे आम्ही या ठाई। मारण्या बालक आमुचे।।६५।। नाहाक आले यात्रे लागून। पुत्र गेला नदीत

बुडून। तो जाईल आता मरून। विझेल दिवा मम वंशाचा।।६६।। कोणी म्हणती घ्यावे संतदर्शन। तेणे जळेल पाप मुळातून। कोणी म्हणती संत हे भगवान। मग का बुडू दिला नदीत।।६७।। कलीत संत देव म्हणवितात। त्यांनी जोडीला साक्षात। तप करून जगन्नाथ। ऐशा गप्पाच मारीत फिअति।।६८।। साधू म्हणावे ज्ञानेश्वरास। ज्याने जिवंत केले नेवाशास। त्या सच्चिदानंद विप्रास। तो मेला होता पूर्णपणे।।६९।। यापरी दुःख करी अनिवार। तव वदती मौनी गुरूवर। कोठे पुत्र आहे वदे सत्वर। बाई आम्हाते।।७०।। घेऊन संगे दादा धुनीवाले। मौनीसमर्थ मुलाजवळी आले। कृपा दृष्टीने बालका पाहिले। तव आला शुद्धीवर बालक तो।।७१।। हे पाहून अघटित। बाई चरणी लागत। आपण खरेच संत। केली व्यर्थ निंदा मी।।७२।। ईश्वररूप मौनी भगवान सदा। वैराग्य पुतळा धुनीवाले दादा। न करी आता निंदा कदा। प्राण गेल्यावर ही मी।।७३।। यापरी करी स्तुतीला। मोद न समर्थ मनाला। आले निघून बिऱ्हाडाला। शीघ्रगती तेथून ते।।७४।। पुढे वर्णन होईल छान। बाबांचे ते गहन। तुम्ही संतकथे देणे कान। सोडून आळस तो।।७५।।

।। श्री दासगणूचा वेडा श्रीरामलिखित श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ अध्याय बाविसावा समाप्त।।

।। श्री मौनीबाबास अर्पण।।



श्री परमहंस रामकृष्ण मौनीबाबांनी सौ. शांताबाई आंबेकर हिला बुलढाणा येथे
श्री गजानन महाराज यांचे रूपात दर्शन दिले. इ.स. १९५७ (शके १८७८)

# || अध्याय तेविसावा ||

श्री गणेशाय नमः। श्री सरस्वत्यै नमः। श्री नवग्रहाय नमः। श्री गुरूभ्यो नमः। श्री कुल देवताय नमः।। जय जयाजी मूळस्वरूप ॐकारा। शिव, विष्णू, सावित्रीवरा। नमन तुज जोडून करा। सर्वकाळ असो ते।।१।। श्रोते व्हा सादर। संत कथा गोड फार। होय श्रवणे उद्धार। तुमचा क्षणमात्रे तो।।२।। अन्नात मुख्य धृत। भक्तीत श्रवण निश्चित। नवविध भक्ती घरा येता। कशी ती ऐका तुम्ही।।३।। कायिक वाचिक मानसिक। तपही घडत निःशंक। नच मिथ्या तिहीत देख। असे ग्रंथामाजी ते।।४।। नच सोडणे संसार। अरण्य नच पाहणे सत्वर। ठायीच करा व्यापार परमार्थाचा तो।।५।। म्हणून जीवनामृत ग्रंथ। मालनिका यथार्थ। तयार करविला परार्थ। मौनीराज योगीयाने तो।।६।। तुम्ही न होणे बैमान। द्या संतकथेस्तव कान। होईल समूळ पाप पूर्ण। जळून भस्मसांत ते।।७।। आता कथा सुरू येथून। म्हणून देणे कर्ण छान। माल घेणे विकत पूर्ण। जीवनामृतांतील तो।।८।। ऐका भाविक भक्तजण। शांताचे माहेर ते जाण। देती तुम्हाते सांगून। आज मी विबुध हो।।९।। शेगांवी किसन नामे भक्त थोर। सुंदराबाई पत्नि खरोखर। तयाचीच कन्या ती साचार। शांता नामे असे हो।।१०।। ही शांताबाई मास्तरीन। भाविक अति छान। दत्तात्रय पती जाण। तियेचा तो असे।।११।। आडनांव आंबेकर। डोणगांवी घरदार। म्हणती भावसार। जयाते जगी या।।१२।। सरकारी नोकर असून। पतीस माने देवासमान। न बोले केव्हा उतरून। राखी मान बहुपरी।।१३।। जेथे पतिपत्निचा विचार। तेथेच राहे रमावर। अनुभव पाहा

खरोखर। सती अनुसयेचा तो।।१४।। संकल्प केला मनी। नंगे दर्शन मजलागुनी। गजानना द्या तुम्ही पूर्णपणी। जरी असला शुद्ध भाव मम।।१५।। यापरी करून नियम। पारायण चालले सप्रेम। गजानन वदे ती नाम। मुखाने वारंवार ते।।१६।। मी समर्था तुमची कुमारी। माहेरांत मम वस्ती खरी। ठाऊन जना अत्यादरी। शेगाव ते तुमचे।।१७।। कसोटीस पाहून तोषले श्री गजानन। दिले मग दर्शन। त्यांनी त्याच रूपे ते।।१८।। दिले कैशापरी दर्शन। ते ऐकावे संपूर्ण। भाविक तुम्ही श्रोतेजन। एकाग्र मने करूनी।।१९।। तेराव्या पारायणी। गृहा आले समर्थ मौनी। मंगळवार ते दिनी। वेळ सहा वाजण्याची।।२०।। पाहून संतास। हर्ष पती-पत्नीस। झाला तो विशेष। विसरले पुजनाते।।२१।। हेच गजानन असती। वारंवार चरणा लागती। रोमांच शरीरी उठती। त्यांच्या हर्षयोगे ते।।२२।। मग नमस्कार केला। वदले बाबा तयाला। तुम्ही का विसरला। पुजेस माझ्या समूळ ते।।२३।। मीच असे गजानन। देती बाबा आठवण। आलो तुमची भक्ती देखून। ये ठाया मी भक्तवरा।।२४।। मग करून विचार। मांडिला पुजेचा प्रकार। भक्ताने तो खरोखर। ते वेळी विबुध हो।।२५।। चार देहाचा चौरंग केला। दश खिळे ठोकीले तयाला। पंच विषय खांब जयाला। केळीचे जणू ते।।२६।। पंच प्राण डोहाळे भले। पंच तत्त्व दोर शोभले। प्रेमाचे आसन टाकिले। बसण्या रामकृष्णाते।।२७।। भाव भक्तिचे गंध कपाळी। प्रेम अक्षता तात्काळी। लावी म्हणे भक्ती भोळी। समर्था माझी ती।।२८।। दया, क्षमा, शांती विरक्ती। हाच हार समर्थाप्रती। सद्भावाची आरती। केली ते वेळा।।२९।। जोडून दोन्ही हात। समर्थाते म्हणत। दिले बळी आपणाप्रत। काम, क्रोध, वस्त हे।।३०।। पूजा झाल्यावर समर्था भोजन सुंदर। पाक करून सत्वर। दिले ते वेळी।।३१।। त्या

योगे भक्ती बसली। पतीपत्नीची वहिली। भक्तीची चव कळली। तया दाम्पत्याते।।३२।। मुख्य भावची कारण। म्हणून घडले दर्शन। तया दाम्पत्याकारण। श्री समर्थ रामकृष्णाचे।।३३।। आता शंकर मोहिते बंधू प्रभाकर। बेपत्ता झाला झडकर। मग शोध करिती सत्वर। शंकरादी जन नागपूरी।।३४।। परी नच तपास लागला। मग तार समर्थास केला। की मम बंधू हरवला। नच पत्ता मुळी तयाचा।।३५।। समर्थ वदती शंकरा। सोडी चिंता भक्तवरा। सातव्या दिवशी घरा। येईल तव बंधु तो।।३६।। समर्थ वाक्य खरे झाले। सातव्या दिनी ये त्वरे। प्रभाकर तो अत्यादरे। बंधू शंकर मोहितेचा।।३७।। आनंद वर्तला सर्वांसी। धन्य संत मौनी परीयेसी। अनुभव त्यांचा आपणासी। आला पूर्ण पणे तो।।३८।। आम्ही न पाहिला क्रोध जवळी। अगदी शांतमूर्ती आगळी। मौनी वसे चिखलीस्थळी। सांप्रतच्या काळी जन हो।।३९।। बरा एकांतवासात। मठामाजी चिखलीत। ब्रह्मस्वरूपांत खचित। निमग्न सर्वकाळी मी।।४०।। पुढच्या अध्यायी देख। जन्मोत्सव होय सुरेख। चिखलीत जाऊन पारख। पौष पौर्णिमेस एकदा।।४१।।

।। श्री दासगणूचा वेडा श्रीरामलिखित श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ अध्याय तेविसावा समाप्त।।

।। श्री मौनीबाबास अर्पण।।



**श्री परमहंस रामकृष्ण मौनीबाबांचे जन्मोत्सवाचे पहिल्या यात्रेच्या वेळीचा चिखली येथे झालेला पहिला काला. इ.स. १९५१ (शके १८७२)**



**श्री परमहंस रामकृष्ण मौनीबाबांच्या जन्मोत्सवानिमित्त चिखलीस यात्रा प्रारंभ.**
**इ.स. १९५१ (शके १८७२)**

# || अध्याय चोविसावा ||

श्री गणेशाय नमः|| श्री सरस्वत्यै नमः|| श्री नवग्रहाय नमः|| श्री गुरूभ्यो नमः|| श्री कुलदेवताय नमः|| जय जय दत्तात्रय अत्रिसुता। तुज माता अनुसया तत्त्वता। सोमवंशी जनन सर्वथा। तुमचे दिगंबरा प्रभू||१|| ऐका भाविक जन। भक्षिता कात्याची एक लाही जाण। आपुले चुके जन्ममरण। खरोखर पूर्व पुण्ये मिळे ती||२|| कलीत श्रेष्ठ किर्तन काला। देवही त्याकरिता वेडा झाला। त्याने आषाढीचा मांडला। सोहळा काल्यानिमित्ते||३|| पौर्णिमेस काला पंढरीत। होतो जाऊन पहा मठात। ज्ञानेश्वर, निवृत्ती आनंदे सेवित। होते पवित्र काला तो||४|| पौर्णिमेस काला करून साजरा। लाविले वाटे संत घरा। तयी करूनी विचार। पंढरीते त्या विबुध हो||५|| त्यापरी ऐका कथा साजिरी। मग कळेल संतपदाची थोरी। भाव ठेवा संतचरणावरी। तरच कळेल महत्त्व ते||६|| श्री मौनीसत चिखलीत। उदास भावे असती राहत। काशीनाथ आप्पाच्या मळ्यात। तल्लीन सदा ब्रह्मसुखांत ते||७|| शके अठराशे बाहात्तरांत। भाविक आले दर्शना मठांत। धोत्र्याचे ते लोक खचित। चिखलीत मौनीबाबांच्या||८|| तव बाबा वदती त्यांस। काला करावा पौर्णिमेस। आणिक संतमहंतास आणावे त्या स्थानी||९|| भक्त वदती बाबांस। आम्ही पाचारू संतांस। करू पूर्ण काल्यास। यथानुशक्ती आमच्या||१०|| श्री संत मौनीराज यांचा। जन्म असे पौर्णिमेचा। म्हणून पौर्णिमेस साचा। होय जन्म आणि यात्रा पौषमासी||११|| निमंत्रण दिले संतांसी। येण्या गोपालकाल्यासी। भाविकांनी परगांवच्या परियेसी। बाबांच्या भक्तवरांनी||१२||

चिखलीत नथ्थू मिस्त्री राहत। अतिभाव धरून मनांत। अर्पिला पाळणा त्वरित। त्याने बाबास्तव तो।।१३।। बाबास बसवून पाळण्यात। सुवासिनी नावे ठेवित। दोर धरून हातांत। लागले म्हणाया पाळणे।।१४।। वस्त्रे बाबांच्या अंगावर कृष्णरूप खरोखर। जना दिसे तो साचार। ह्या सोहळ्यासमयी।।१५।। च्याऊ म्याऊ घुगऱ्या खाऊ। खेळण्या रामकृष्ण नेऊ। ब्रह्मगांवीच दूर जाऊ। जन्ममरण चुके तेथे।।१६।। बुलढाण्याची मथुताई। चांदीची गडवा देई। तांब्याचे गंगाळ तेही। देई आत्या अनंतबाबाची।।१७।। देव संत गुरू या ठायी। जाता न करावी घाई। रिक्त हस्ते नच जाई। रीत शास्त्रात कथिली ती।।१८।। खडीसाखर, पपई, पेढे न्यावे बत्तासे ते ही। तूप, नारळ, कापूर तोही। न्यावा संतदर्शना जातांना।।१९।। शुद्ध असेल जर मन। तर तेच करावे अर्पण। चुकती भवयातना कठीण। असल्या श्रद्धा संता ती।।२०।। कुकल्पना जरी मनात। फल नच ये भक्तीप्रत। काय जाऊन चिखलीप्रत। फायदा अभाविकांना तो।।२१।। एकदा प्रेमीभक्त सारे। बाबाजवळी आले त्वरे। केले साष्टांग नमन प्रेमभरे। भक्तवरांनी चिखलीच्या।।२२।। भक्तजन वदती बाबांस। पौष पौर्णिमा जवळ आली खास। आता यात्रा भरवू चिखलीस। समर्था आपुल्या कृपेने।।२३।। समर्थ वदती ऐका तुम्ही भक्त। मज न आणावे उजेडांत। काय करावे कीर्तीत। लौकिक बरा नव्हे जगी।।२४।। जो लौकीकामागे लागला। तो संतत्वाते मुकला। हे पक्के ठावे मजला। पुराणीही पाहावे वाचून।।२५।। परी भक्त नच ऐकती। हट्ट धरून बसती। खिन्न मुद्रा झाली अति। दिसती उदास सर्व ते।।२६।। मग तयांचा पाहून भाव। मनी द्रवले संतराव। वदती वचन अभिनव। त्या खिन्न भक्ताते।।२७।। तुम्ही जरी इच्छेने धरिले। तरी करा तयारी पहिले। कां

की दिवस बहु थोडे राहिले। पौष पौर्णिमा येण्याते।।२८।। जगजीवनभाई दुकानदार। 'देणगी द्या थोडी फार'। असे लोकां सांगे सत्वर। बसून दुकानावरी तो।।२९।। या कार्याची देखरेख सारी। पंढरीनाथ अध्यक्ष स्वतःकरी। संगे घेऊन भक्त विचारी। चैन नसे त्याचे जीवा।।३०।। दूरदूरचे भाविक आले। नागपूरापासून चांगले। यात्रेविषयी आधीच कळले। त्यांना वर्तमान पत्रान्वये।।३१। मठ बाबांचा रंगविला। सर्व संत झाले गोळा। यात्रा भरली जशी कुंभमेळा। सर्व भक्ता सोयी युक्त।।३२।। मग आलेल्या संतासी। स्नाने घालून परियेसी। पुजिले भाविकांनी त्यासी। आरत्या प्रेमभरे करूनी।।३३।। पौष शुद्ध पौर्णिमेला। बारा वाजण्याचे समयाला। बाबांचा जन्मोत्सव केला। साजिरा सर्व भक्तांनी।।३४।। बिजली लावून मोटारीला। सूर्यासम केले प्रकाशाला। मग काढिले मिरवणूकीला। बहु श्रद्धेने चिखलीत।।३५।। याच न्यायेकरून। दरवर्षी चिखलीत जाण। मौनीबाबांची यात्रा जी कअतिल भक्तजन। ती अति शुभ असे।।३६।। मौनीबाबा वारकरी होते आधी। वारी करूनी पाहिला कृपानिधी। धरली मौन वृत्ती साधी। अठरा वर्षे गेली होऊनि।।३७।। मठामागच्या निंबाखाली। द्वादश वर्षे तपास झाली। समर्थांनी कष्टदशा साहिली। शीत, उष्ण आणि नाना परीची।।३८।। त्या वृक्षाखाली बसून। आणि करून अनुष्ठान। करिता या ग्रंथाचे पारायण। पुरेल इच्छा मनाची।।३९।। तो वृक्ष असे कल्पतरू। त्याचा महिमा काय वर्णन करू?। नका मज ते विचारू। घ्यावा अनुभव प्रत्यक्ष।।४०।। तो असे पूर्वीपासून। तेथेच केले अनुष्ठान। समर्थांनी दुःख साहून। सावलीत बसून तयाच्या।।४१।। घेण्या दर्शन तयाचे। लोक येती दूरदूरचे। मोटारीत बसून साचे। आप्पाच्या मळ्यात ते।।४२।। जन्माचे दोष जाती। त्यांची

घ्या प्रचिती। जाऊन तुम्ही चिखलीप्रती। त्वरा करून भक्त हो।।४३।। जो असे भाग्यवंत नर। त्यासच दिसतील गुरूवर। तयाचेच जाणे होईल सत्वर। चिखलीस संतदर्शना।।४४।। आणिक गोल ओटा समोर। त्या जागी बसून बारा वर्षभर। बाबांनी तप केले साचार। साहून प्रखर शीत उष्णता।।४५।। त्याचे घ्यावे दर्शन। मनोकामना होईल पूर्ण। हयगय नच करा जाण। तुम्ही मठावरी जाण्याची।।४६।। बाबा नच भीड ती। कुणाच्या धनाची ती। सदा मग्न राहती। पाहा ब्रह्मस्वरूपी ते।।४७।। परी जन गमती फार। करू यात्रा साचार। बाबांच्या खरोखर। जन्मदिनाची ती।।४८।। यापरी विचार केला। चिखलीचे भाविकांनी भला। त्याच वर्णू गोड कथेला। पुढे येईल अध्याय तो।।४९।।

।। श्री दासगणूचा वेडा श्रीरामलिखित श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ अध्याय चोविसावा समाप्त।।

।। श्री मौनीबाबास अर्पण।।



**श्री परमहंस रामकृष्ण मौनीबाबांचे मोठेगांव येथील पहिल्या यात्रेच्या वेळी झालेले संतसम्मेलन.**
**इ.स. १९५२ (वैशाख शुद्ध एकादशी, शके १८७४)**

# || अध्याय पंचविसावा ||

श्री गणेशाय नमः|| श्री सरस्वत्यै नमः|| श्री कुल देवताभ्यो नमः|| श्री दत्तात्रय नमः| श्री मौनीराजाय नमः|| जय जयाजी पंढरीराया|| नमन असो हरि तव पाया| मज बुद्धी द्यावी सहृदया| श्री मौनी काव्याते||१|| श्रोते भक्तजन| जा तुम्ही शीघ्रपूर्ण| दर्शन घेण्याजाण| चिखलीत समर्थाचे||२|| देह जाय आपुला| म्हणून घेणे काला| जा पौष पौर्णिमेला| यात्रेवरी तुम्ही त्वरे||३|| पंचम् यात्रा येता| लागली चिंता भक्ता| यात्री झटणे सर्वथा| म्हणती आपुल्यास ते||४|| आप्पाने उपकार केला| संत गावी ठेविला| न करिता कार्याला| होय आपुले हांसे||५|| झटावे सर्व सत्य कर्मासी| तुकाराम वदले गाथ्यासी| पाहा वाचून परियेसी| असे खरे किंवा खोटे ते||६|| आठवी यात्रा होत| समर्थाच्या खचित| जन्मदिनाची सत्य| श्री दत्ताचे कृपेने||७|| नववा अवतार विटेवर| काल्याचा त्यांनीच झडकर| दाविला पहा तो प्रकार| श्री भक्ताते विठ्ठले||८|| संताते म्हणे श्रीहरी| कलीत श्रेष्ठ खरोखरी| काला अत्यादरी| असे मज प्रिय तो||९|| नव खंड असे पृथ्वी| नव नारायणाची थोरवी| नवमी तीथ बरवी| म्हणून काला थोर तो||१०|| प्रेम, भाव, भक्ती, विरक्ती| दया, क्षमा तशी नीती| हरिनाम अखंड चित्ती| सामान हे काल्याचे||११|| हरिनाम खिचडी काला| आवडे बहु संताला| तोच करावा भला| संसारातून भाविके||१२|| नववी यात्रा छान| केली भाविकांनी पूर्ण| स्व-खर्च लावून| चिखलीच्या प्रेमभरे||१३|| पुढे ही यात्रा चालेल| नच केव्हा चुकेल| संत कार्य सतत राहील| कायम ते विबुध हो||१४|| प्रत्येक पौर्णिमा येता| जावे चिखलीस तत्त्वरता| आळस न करणे सर्वथा| जाण्या यात्रे ते||१५|| परमार्थात आळस| सोडून वर्तणे खास|

शिकवण आपणांस। मौनी समर्थाची असे।।१६।। संतकृपा म्हणून। यात्रा येती भक्तजन। नेमिल बहु जाण। कट्टर ते असती।।१७।। भक्त तुम्ही येणे। यात्रेस पूर्णपणे। हेच सांगणे। ग्रंथातून ते।।१८।। प्रत्येकाने ज्ञानी गुरू केलाच। पाहिजे श्रोते हो साच। ऐसा वदे भागवतात। स्वयं हरि उद्धवाते।।१९।। शके अठराशे त्र्याहात्तरांत। यात्रा होती रिसोडांत। जे असे वाशीम तालुक्यांत। शिवरात्रीनिमित्ते। अमरदासाची।।२०।। ईश्वरी माया फिरली। मोठेगांवची पुण्याई फळा आली। म्हणून मौनीराज मूर्ती गेली। त्या ग्रामी सहजची।।२१।। कुणी म्हणती ईश्वर आला। कुणी वदती दत्तची अवतरला। अति प्रेमे करून नमनाला। वागती ते येणे परी।।२२।। कुणी नेले काजू, अंजीर। कुणी प्रसाद केला चवीदार। ताजे दूध टाकून सत्वर। भाविकांनी तेथल्या।।२३।। यापरी ढीग लागला सत्वर। पक्कान्न फळांचा बाबासमोर। वदती समर्थ आणा भाकर। आणिक चटणी, कंदर्प तो।।२४।। त्या दिवशी असे उपवास। भाकर कोण करी गृहास। खेद वाटे साहेबरावास। द्यावी कशी भाकर समर्था।।२५।। मग म्हणे आणा करून। खीरपोळी समर्थाकारण। त्याची आई गेली गृहालागून। पाक तयार करण्याशी।।२६।। तव समर्थ पाकगृही गेले। शिळी भाकर, कंदर्प, तेलही घेतले। आनंदाने तेथे जेवले। दिला ढेकर तृप्तीचा।।२७।। जेवून तृप्त झाले मौनी। मग गेले रिसोडा लागुनी। यात्रा पाहून आले परतुनी। सत्वर मोठे गावी ते।।२८।। कुणी नाचती आनंदात। मुखे हाच शब्द निघे जाण। रामकृष्ण मौनी भगवान। विसरले देहभान ते।।२९।। आणि वदती समर्थाप्रत। एक इच्छा जाहली मनांत। की भरवावी यात्रा खचित। आमचे गांवी संतांची।।३०।। तयी वदती बाबा वचन। मौन्य म्हणून दाविले लिहून। येऊ संतरत्ने घेऊन। ऐका नामे जयांची।।३१।। श्री अनंतबाबा आकोल्याचे। श्री पांडुरंग बाबा मंगरूळचे। परमहंस दोघेही साचे। बोलवावे तयांना।।३२।।

नंगेबाबाचे शिष्य डव्ह्यात। बिदोडेबाबा नाम सत्य। संसारी जीवनमुक्त झाले जे पूर्णपणे।।३३।। श्री बद्रीबाबा मूर्तिजापूरचे। श्री परशरामबाबा पिंपळोदचे। श्री पुंडलिक संत गोरेगावचे। रमाकांत अवतार जणू।।३४।। न्हाव्याचे वंशी जन्मली। मीरा जनी सम भली। संत सखु नामे जी शोभली। तीही ये बरोबरी।।३५।। श्री हरिबाबा सांगळूदचे असती। सावता माळी दुजे दिसती। श्री नामदेव बाबाही शीघ्र येती। यात्रेकारण मोठे गांवी ते।।३६।। लागले नवे साल चौऱ्याहत्तराचे। मुदीत झाले जन मोठेगांवचे। म्हणती येतील संत आमुचे। उद्धरण्या आम्हाते।।३७।। पुण्य करिता अपार। एकदा मिळेल ईश्वर। परी भाग्यविण न साचार। भेटती संतरत्ने ती।।३८।। मोठेगांवी संत मेळा भरला। तोच झाला दिवाळी दसरा। रथी हा मौनी शोभला। अतिप्रेमे करिती पुजन।।३९।। संत आहेत जिवंत। तोवरी न त्यांची किंमत। गेल्या मग वसे अश्रू ढाळीत। म्हणून भक्तीत घाला काळ तो।।४०।। गांवी गंगा वाहते जरी। तिची न किंमत तीळभरी। परका येऊन स्नान करी। जाई घरी पवित्र होऊनी।।४१।। जशी सेवा भावे मनात। तसेच फळ देता रमाकांत। आपण कवठवृक्ष लावता दारांत। कोठून आम्रफळ येई त्या।।४२।। जाणून हे खूप ध्यानी ठेवा। विदूरगृही राहणे का आवडे देवा?। त्याचा भावचि घे ठेवून केशवा। सर्वकाळ बरोबरी।।४३।। पुढचे अध्यायी होय कथन। बद्रीनारायणाचे ते वर्णन। तेथे मौनव्रत सोडिले गहन। धरले होते जेथे समर्थांनी ते।।४४।।

।। श्री दासगणूचा वेडा श्रीरामलिखित श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ अध्याय पंचविसावा समाप्त।।

।। श्री मौनीबाबास अर्पण।।



श्री परमहंस रामकृष्ण मौनीबाबा यांनी १८ वर्षे पाळलेले मौनव्रत बद्रीनारायणास
वैशाख वद्य द्वादशीचे दिवशी सोडले त्यावेळी त्यांचेबरोबर असणारी मंडळी. इ.स. १९५६ (शके १८७८)

# || अध्याय सव्वीसावा ||

श्री गणेशाय नमः।। श्री सरस्वत्यै नमः।। श्री गुरूभ्यो नमः।। श्री कुलदेवताय नमः।। जय जयाजी पुंडलिक वरदा। देवाधिदेवा गोविंदा। बुध्दी दे काव्याते सदा। तव भक्तांच्या विठ्ठला तू।।१।। जे जे जगात असती संत। ते ते मानावे भगवंत। शिकवण दे आम्हा खचित। शास्त्र पुराण, वेद ते।।२।। याच न्यायेकरून। आता वन्दू रामकृष्ण। न करिता अनुमान। मनामाजी ते।।३।। समर्थास मौनव्रत। म्हणून भक्त चिंताग्रस्त। विचार करून मनांत। आपुल्या पुरा तो।।४।। दामोदर पुत्र शांताराम। भाविक अति निस्सीम। समर्थाच्या मनी बहु प्रेम। तया भक्ताच्या तो।।५।। मनाचा भाविक फार। कान्ता तशा खरोखर। असती तीन साचार। ऐका नामे तयाची ती।।६।। पती-पत्नीचा जेथे विचार। तेथेच राहे शारंगधर। असे हा शास्त्रविचार। कथिला व्यासाने ग्रंथामाजी।।७।। येत चिखलीस शांताराम। भक्त तो निस्सीम। कान्ता घेऊन त्या सप्रेम। यात्रेस्तव समर्थाच्या।।८।। बाबा नच करिती कदा। भाषण मुखाने आपदा।.न देखवे ते सदा। शांताराम नेत्राते।।९।। विचार करून अंतरी। वदे समर्था अत्यादरी। मम एक विनवणी ती खरी। ऐका तुम्ही गुरूवरा।।१०।। तुम्ही राहता सदा ध्यानात। आणखी विदेह स्थितीत। आणिक धरिले मौनव्रत। जे असे दुर्धर भारी ते।।११।। भक्त इच्छा पुरवी सदा। वाटे ऐकावे बोल एकदा। हिच विनवणी बहुधा। तुम्ही माझी असे समर्था ती।।१२।। सहज बोलणे हाच उपदेश। संताचा असे विशेष। ऐसे वदती संत आम्हास। गाथ्यांतून ते सर्व काळ।।१३।। ऊंऽ ऊंऽऽ करता काय समजणे।

आम्ही नच ते शहाणे। हे तुम्हीच गुरूवरा जाणणे। सहृदया दिनबंधो ते।।१४।। अन्नपूर्णा, गुलाबबाई, सोनाबाई। आग्रह केला मौनी व्रत सोडा पाही। बोला आम्हासी उपदेश काही। हिच विनवणी अनन्ये भावे।।१५।। ऐकून सर्वाचे वचन। वदती तया रामकृष्ण। माझा असे नेम कठीण। ऐक शांताराम तू।।१६।। मी धरिले मौन व्रतासी। पूर्वी बद्रिकाश्रमासी। अठरा वर्षे झाली तयासी। ये वेळा ती।।१७।। तेथेच जाऊन त्वरे। मौनव्रत सोडीन बरे। ऐका मम बोल खरे। ये वेळी तुम्ही ते।।१८।। ऐकून समर्थ वचन सत्वर। केली तयारी झडकर। घेतली माणसे बरोबर। एकोणवीस जण ते पाहा।।१९।। वैशाख शुध्द षष्ठीसी। शके अठराशे अठ्ठयाहत्तरात निःशेषी। सोडून तया चिखलीसी। निघाले समर्थ यात्रेस्तव।।२०।। तव हळहळले जन मानसी। वार्ता पसरली परियेसी। संतराज जासी तिर्थयात्रेसी। शांताराम पाटलाबरोबरी।।२१।। मग येऊन मठावर। केला सर्वांनी नमस्कार। वदती येणे रीती झडकर। नच लावणे उशीर दयाळा।।२२।। समर्थ तया म्हणती। दुःख न करा चित्ती। मी येईन शीघ्रगती। पौर्णिमेस्तव विबुध हो।।२३।। चिखलीहून ते निघाले। आग्रास्तव आले। घेऊन भक्त ते आपुले। जी नामे असती ग्रंथात।।२४।। एक दिन मुक्काम करून। रूद्र प्रयाग ते छान। अठ्ठेचाळीस मैल ते पूर्ण। निघाले पायीपायी ते पाहा।।२५।। शांताराम विचार करी। पायी नच चालविणे अत्यादरी। घोडे केले झडकरी। भाड्याने ते त्वरेसी।।२६।। तव समर्थ वदती तयासी। मी नच बसे अश्वावर अहर्निशी। 'पण' हाच केला मानसी। की पायीच तिर्थयात्रा करीन।।२७।। सिंहस्त असे पर्वणी। कुंभमेळा त्या निमित्यानी। असे पवित्र तो क्षेत्रालागुनी। कथू नावे कुठवर ती तुम्हा।।२८।। पौर्णिमा पवित्र चिखलीवर। मुक्काम असे रामपूर चट्टीवर। क्षेत्र जे

पवित्र फार। असे केदारनाथ रस्ताते।।२९।। नियम पाटलाचा म्हणून। केले ग्रंथाचे पारायण। समर्था पाटावर बसवून। अनन्य भावे ते।।३०।। नंतर झाल्या पूजन। केले बहु अन्नदान। तृप्त केले सर्वजण। समर्थ भक्ताने ते क्षणी।।३१।। यापरी करून सोहळा। तो पातली निद्रेची वेळा। तव वदती समर्थ सकळा। नच करावे जागृत मजसी।।३२।। असे नियम माझा चिखलीचा। ही नच अतृत वाचा। भाव खरा माझ्या भक्तांचा। असे मम ठायी तो पुरा।।३३।। लगेच करून विचार। निघाले समर्थ झडकर। आले मठाते सत्वर। आकाशमार्ग ते वेळी।।३४।। नच दिसती समर्थ कुणा। दुर्गाताई घेत दर्शना। रामभाऊ जाणे खुणा समर्थाच्या त्या।।३५।। रामभाऊते नच झाले दर्शन। शेवंताबाई भाविक जाण। मठांत अंगणी येऊन। नाचती प्रेमभरे ते।।३६।। समर्थ प्रताप तो आगळा। गणपत माळी देखे ते वेळा। समर्थ देव नच निराळा। कलीमाजी मौनी प्रभूते।।३७।। हा प्रकार जे घडला। तिथी होती पौर्णिमा ते वेळा। करून गुप्तरूपे सोहळा। चिखली ठायी तो मठी।।३८।। यापरी दाऊन चमत्कार। समर्थ गेले झडकर। क्षेत्र रामपूर चट्टीवर। जेथे असती भक्तजन ते।।३९।। समर्थाची ऐसी रीत। निद्रिस्थांना उठवीत। चार वाजता खचित दररोज नियमाने ते।।४०।। परि एक आश्चर्य अघटीत। समर्थ राहिले ते निद्रिस्थ। नच तया कुणी करी जागृत। ते वेळी जन हो।।४१।। संताचा महिमा बहु थोर। स्वर्ग गंगा करी विचार। घेणे दर्शन मी सत्वर। जे असती प्रीय विष्णू-शिवाते।।४२।। संतमहिमा श्रेष्ठ देवाहून। श्रीकृष्ण वाहातसे जीवन। पैठणात ते पूर्ण। एकनाथ गृही जन हो।।४३।। 'सं' नामे अक्षरांत। चिन्मय स्वरूप वसत। संत तयाते जाणत। म्हणून श्रेष्ठ देवाहून ते। 'त' नामे अक्षरांत। माया ती नांदत। नच संताच्या द्वारी

येत। कां की ज्ञानवैराग्य राखण ते।।४४।। म्हणून संताचा अपमान। नच करणे कुणीही जाण। होय तेणे वंशखंडण। माहीत सर्वा शास्त्रांतून ते।।४५।। घडेल तर सेवाच करा। निंदा ती कदा नच करा। होईल संसारी मातेरा। संतनिंदेस्तव तो।।४६।। मग आली स्वर्गगंगा भूवरी। बाराशे फूट उंचावरून झडकरी। वंदिले समर्थ चरण सत्वरी। श्रीकृष्णासम ते।।४७।। यमुना वंदी श्रीकृष्णासी। वसुदेवा नेता गोकुळासी। तीच झाली रीत परियेसी। रामकृष्ण मौनीप्रभुची।।४८।। येता गंगेसी पूर अतोनात। सामान गेले कुणाचे खचित। वाहून त्वरे यथार्थ। विबुध जन हो ते वेळा।।४९।। सामान सुमान वाहून गेले। 'बचाओ' हमको वहिले। हेचि शब्द येती ऐकण्या भले। सर्वांच्या कानावरी ते।।५०।। अन्नपूर्णा शांताराम पत्नी। म्हणे आज नच ठिक स्थिती। म्हणून जयजयकार करिती। मौनी नामाचा वारंवार तो।।५१।। ऐकून सर्वांची विनवणी। अंगुष्ठ लादिला तत्क्षणी। निरसले विघ्न निर्वाणी। स्वर्गगंगा तिथेच ती।।५२।। यापरी दाऊन चमत्कार। भक्त रक्षिले झडकर। म्हणून संत महिमा थोर। देवाहून असे तो।।५३।। वैशाख वद्य दशमीसी। शके अठराशे अठ्ठयाहत्तरात परियेसी। दोन वाजण्याचे समयासी। आले बद्रीनारायणा ते।।५४।। जोडूनीया द्वय कर। समर्थ वदती साचार। ठेवूनी चरणी शिर। करिती प्रार्थना प्रभुची ती।।५५।। धन्य धन्य नारायण। तूंच व्यापक सकळ त्रिभूवना। नच रिते स्थळ जाणा। तुम्हाविणे लक्ष्मीपते।।५६।। तव ठायीच मौनव्रत धरिले। आता येथेची ते सोडिले। अठरा वर्षे पूर्ण झाले। तव कृपेने दयाळा।।५७।। कर्ता करविता तूच एक अससी। चालविले मम नियमाशी। त्याच देवा अहर्निशी। निर्विघ्नपणे ते नर नारायणा।।५८।। माझ्या नव्हते मनात देवा। मौनव्रत सोडणे येधवा। परी भक्तीस्तव केशवा।

सोडणे भाग आले मसी।।५९।। होते एकादशी व्रत म्हणून। मौन नच सोडी रामकृष्ण भगवान। येता द्वादश तिथी छान। सोडिले मौनव्रत ते समर्थाते।।६०।। मग करूनिया स्नानासी। सर्वांनी पुजिले ईशसंतासी। तसेच केले अन्नदानासी। समर्थ भक्तांनी ते।।६१।। बद्रीनारायणाची रीत असे। आरती कुणा म्हणू नच देतसे। शांताराम तो अर्पितसे। अकरा रुपये नरनारायणाते।।६२।। याचा अर्थ हाच सुचविला। समर्थ अकरावा रुद्र जन्मला। आज सोडिले मौन व्रताला। ठेऊन तुम्हांस साक्ष ते।।६३।। पौर्णिमेस जो जन्मत। तो पूर्ण चिन्मय स्वरूप होत। हारपे तयाचे द्वैताद्वैत। लीन सर्वाभूती समदृष्टी तो।।६४।। म्हणून समर्थ परमहंस बनले। नग्न स्थितीत ते रमले। भय तया नच कुणाचे उरले। तपबळे ते श्रोते हो।।६५।। कथा पुढची गोड गहन। पुढील अध्यायी होय वर्णन। संत कथेस्तव देणे कान। सोडून आळस तो।।६६।।

।। श्री दासगणूचा वेडा श्रीरामलिखित श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ अध्याय सव्वीसावा समाप्त।।

।। श्री मौनीबाबास अर्पण।।



श्री परमहंस रामकृष्ण मौनीबाबांनी श्री. शांताराम पाटलास मथुरा येथे श्रीकृष्ण रूपांत दर्शन दिले.
इ.स.१९५६ (शके १८७८)

# || अध्याय सत्ताविसावा ||

श्री गणेशाय नमः।। श्री सरस्वत्यै नमः।। श्री गुरूभ्यो नमः।। श्री कुलदेवताय नमः।। श्री दत्तशंकराय नमः। जय जयाजी गौरीकुमझ्रा। विद्या द्यावी या पामरा। देवाधिदेवा विश्वहरा। प्रभू पार्वतीसुता।।१।। भक्ती सोपी दिसत। परी कठीण असे खचित। पुसावी संतालाच ती रीत। जाऊन शरण अनन्य भावे।।२।। काशी, प्रयाग, गहेसी वहिले। अयोध्याते शीघ्र आले। सर्व तीर्थ पाहून आले। रामकृष्ण समर्थ ते।।३।। भक्त मंडळी बरोबर। आजारी झाला शांतरामकुमार। नाम जयाचे दिगंबर। ताप एकशे चार डिग्री तो।।४।। पुत्र जरी दुःखित। पाटील मग्न संतसेवेत। नच तया पुत्राची किंमत। संतसेवेपुढे ती।।५।। समर्थ म्हणती पाटलास। आजार तो तव पुत्रास। तू कां करीसी सेवेस। नच चिंता कशी पुत्राची?।।६।। समर्थाचे ऐकून वचन। शांताराम वदला जाण। नच पुत्राची किंमत पूर्ण। तव सेवेपुढे ती दयाळा।।७।। प्रत्येक जन्मात अपत्य प्राप्ती। परि नच घडे संतसेवा ती। स्पष्ट वदतो दयाळा तुम्हाप्रती। होय संतसेवा याच जन्मी ती।।८।। पाहून तयाचा भाव। समर्थ वदती अभिनव। गुण ये तव पुत्रा अपूर्व। सव्वा महिण्यामाजी तो।।९।। समर्थ वाक्य खरे झाले। रोग ते दूर पळाले। शांताराम पुत्राचे वहिले। समर्थ कृपेने पाहा।।१०।। माता-पिता जन्म देती। परि नच कर्माचे सांगाती। जन्म-मरण दूर करिती। फक्त समर्थ ते।।११।। देवाहून थोर संत असती। चिंतिले अर्थ पुरविती। म्हणून शरण जावे शीघ्रगती। मौनी समर्था ते।।१२।। मग समर्थ आले मथुरेसी। वेळ चार वाजण्याची परियेसी। ते बंद देवद्वार निश्चयेसी। होते श्रोते जन हो।।१३।। शांताराम पाटला समवेत। बसून सर्व मंदिरात। त्रासून गेले जन खचित। आज नच कृष्ण दर्शन आपणाते।।१४।। मंडपांत गर्दी फार।

धर्म ये शरीरा सत्वर। चालले लोट भूंवर। शरीरांतून ते वेळा।।१५।। कां रुसला कृष्ण आम्हावरी?। नच दर्शन दे झडकरी। जीव उतावीळ भारी। दर्शनास्तव आमुचा तो।।१६।। यापरी करून खेदासी। अश्रू येत नेत्रांसी। भक्त शांताराम पाटलाशी। किती मी अभागी असे।।१७।। अभावी मी कदापीही नसे। मम संगे मौनीप्रभू असे। तोच माते श्रीकृष्ण दिसे। असल्या भावना दृढ ती।।१८।। गीता शास्त्रात वदे श्रीकृष्ण। संत तो मीच जाण। अर्जुना तूज सांगतो खूण। मम जीवाची ती।।१९।। यापरी करून विचार। ठेविला विश्वास मौनी चरणावर। बसला महीठायी सत्वर। होऊन प्रसन्न मनामाजी तो।।२०।। देह गेला जरी जावो। पांडुरंगी दृढ भावो। मौनीच मज कृष्णरावो। असे अनन्य भावे तो।।२१।। भगवान मौनी विचार करीत। की कृष्णरूप दावणे त्वरित। नच करिता वेळ तो खचित। शांताराम भक्ताते।।२२।। मग वदले शांतारामासी। दावीन कृष्णरूप तुजसी। नच होई बा दुःखी मानसी। मानी मम वचन सत्य तूं।।२३।। भाषण करिता मौनी भगवान। झाले साक्षात ते श्रीकृष्ण। श्याम सुंदर मूर्ती जाण। तशी चतुर्भुज ती।।२४।। शंख, चक्र, गदा, पद्म करी। थोर मुगुट शोभत शिरी। सावळा पितांबर धारी। दिसे भगवान मौनी तो।।२५।। समर्थ वदत शांतारामासी। घे तू मम दर्शनासी। साक्षात उभा तुजपाशी। असे मी ये वेळा।।२६।। पाहता मूर्ती मनोहर। चरणी केला नमस्कार। आला चित्ती पूर्ण विचार। दिसला कृष्ण बासरीवाला।।२७।। ही अंतर्खूण समर्थ जाणत। लगेच बासरी शोभे करीत। शांताराम पाटलाते दिसत। प्रत्यक्ष कृष्ण कुंजवनीचा।।२८।। मग साष्टांग नमन करून। घेत मौनी श्रीकृष्णाचे दर्शन। गेला भिन्नभाव तो मावळून। समर्थ भक्ताचा तो।।२९।। म्हणून संत देवच असती। अशी साक्ष पुराणे देती। समर्थे दाविली प्रचिती। निजभक्त पाटलाते।।३०।। विश्वास होता म्हणून। झाले

तया श्रीकृष्ण दर्शन। ही नच वृथा वल्गना जाण। फल असे विश्वासाचे।।३१।। विश्वांत विश्वासे तराल। अविश्वासे बुडाल। नच तीळमात्र भक्ति घडेल। समर्थ रामकृष्ण मौनीची।।३२।। देवसंतावरी विश्वास ठेवावा। भेद नच चित्ती मानावा। सुविचार करून पुजावा। मौनी गुरूराज तो।।३३।। मग सोडून मथुरेसी। जाऊ म्हणती वृंदावनासी। शांताराम दारा वदे तयासी। नाम जिचे सोनाबाई।।३४।। समर्था सुजले माझे चरण। नच होय चालणे मज जाण। नच करणे चिंता पूर्ण। होय नष्ट व्यथा द्वय दिनी।।३५।। समर्थ वाक्य खरे झाले। चरण ते सत्वर उतरले। विभूती लाविता भले। समर्थ नामाची ती।।३६।। मग करून गोकुळ वृंदावन। आले सर्व आकोल्याकारण। पाटलाचे गृहास्तव पूर्ण। जे होते बरोबरी ते।।३७।। मग सवेच करून विचार। केले मावंदे झडकर। शांताराम पाटलाने खरोखर। आकोल्यामाजी स्वगृहाते।।३८।। दगडू मल्हारी मुकदम। यांनी केली मावंदे उत्तम। खामगांवी जाऊन निस्सीम। समर्था समवेत ती।।३९।। तुळसाबाई चतूर। केले मावंदे सत्वर। सिरसोलीत बरोबर। नेऊन नग्न दिगंबराते।।४०।। धनराज मारवाडी। गोष्ट न करी कदापि तेढी। केली तयारी तातडी। मावंदयास्तव त्याने।।४१।। गरीब दत्तु भराड। गरिबीमुळे हात जड। त्यासीही मनी आवड। मावंदे करण्याची ती।।४२।। गरिबाची भाजी-भाकर। मौनी समर्था प्रिय फार। हा असे योग्य विचार। समर्थ मौनीप्रभुचा तो।।४३।।

।। श्री दासगणूचा वेडा श्रीरामलिखित श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ अध्याय सत्ताविसावा समाप्त।।

।। श्री मौनीबाबास अर्पण।।



**श्री परमहंस रामकृष्ण मौनीबाबांचा धावा करता**
**मुंडगांव येथील बेशुद्ध रत्नकला शुद्धीवर आली.**

# || अध्याय अठ्ठाविसावा ||

श्री गणेशाय नमः।। श्री सरस्वत्यै नमः।। श्री गुरूभ्यो नमः।। श्री कुलदेवताय नमः।। श्री रामकृष्णाय नमः।। जय जयाजी श्रीकृष्णा। देवाधीदेवा रुक्मिणीरमणा। बुध्दी द्यावी मज दिना। काव्यास्तव ती सर्वदा।।१।। आता दुसरी कथा मनोहर। ऐका श्रोते तुम्ही चतुर। दाविला समर्थे चमत्कार। निज भक्तास्तव तो।।२।। नच दाखविता महतीसी। दिले जीवदान भक्तांसी। कथा गोड ती अहर्निशी। अमृतापरी चविष्ट।।३।। तुळसाबाई समर्थाची सून। तीस शोभे रत्नकला कन्येसमान। जी मुंडगांवी दिली पूर्ण। तालूका आकोट तो तया।।४।। रत्नकला राहता गरोदर। करून अंतरी पूर्ण विचार। आणिले सिरसोलीते सत्वर। समर्थ स्नुशे ते।।५।। नव मास होता पूर्ण। एकाएकी घुरे येऊन। पडली धरणीवर जाण। निमाला गर्भ त्यामुळे तो।।६।। गर्भ निमाला उदरांत। रत्नकलाही बेशुध्द होत। नच वाचण्याचा भरवसा खचित। तया रत्नकलेचा तो।।७।। म्हणून सर्व जण घाबरले। रामकृष्ण मौनीते आठविले। तसे धूपदिपाते लाविले। समर्थ नावाने तो।।८।। जोडोनिया दोन्ही करासी। सर्वहि विनविती समर्थासी। देणे जीवदान रत्नकलासी। केला धावा येणेपरी तो।।९।। मनी धरिला दृढ भाव। पावले रामकृष्ण मौनीदेव। दिले जीवदान ते अभिनव। रत्नकलेशी तेधवा।।१०।। गर्भ जरी निमाला उदरांत। रत्नकला ठेविली सुरक्षित। रामकृष्ण प्रभूने खचित। श्री दत्तकृपेने ती।।११।। मृत्यु तिचा हटविला। म्हणून येत पौर्णिमेला। हो अनन्य भावे दर्शनाला। रत्नकला ती श्रोतेजन हो।।१२।। पाहा केवढा अधिकार। केला काळ तोही दूर। हे करू शके का नर?। आता तरी उघडा नेत्र ते।।१३।। समर्थ बरोबरी नच करणे। 'रामकृष्ण' नाम स्मरणे। भाव धरून समर्थ भक्ताने। करावे अखंड चिंतन ते।।१४।। करिता नाम स्मरणासी। जळून जाती पापाच्या राशी। ऐसे

महत्त्व असे नामासी। कळे हरिभक्ताते।।१५।। तिर्थात गंगा श्रेष्ठ। तिथीत पौर्णिमा वरिष्ठ। परमहंसात मौनी चोखट। तेवी संतकथा श्रेष्ठ ती।।१६।। श्री क्षेत्र वाशिमांत। आनंदराव द्वीज वसत। तसा असे संतभक्त। आडनांव देशपांडे ते।।१७।। प्रभाकर, नीळकंठ, माधव। सुनंदा, कुसुम, लता अभिनव। ऐसी संतती दे तयाला केशव। पूर्व पुण्ये ह्या जन्मी ती।।१८।। आनंदराव पुत्र माधव म्हणती। उदरास्तव करी नोकरीप्रती। अशी रीत प्रत्येकाचीच ती। करणेच लागे धंदा तो।।१९।। विनाशकाली विपरीत बुध्दीसी। सहज आठवले मनासी। कर्म नच चुके कुणाशी। जे लिहिले असे विधीने ते।।२०।। सहज बसलासे मोटारीत। लताबंधू तो त्वरित। गर्दी असे अतोनात। नच बसण्या मिळे जागा ती।।२१।। गर्दी होता भयंकर। माधव पडला महीवर। बेशुध्द झाला अनिवार। तशी माणसे वरती दहा-वीस।।२२।। ते समर्थ होते मठाप्रत। तशी पौर्णिमाही खचित। त्या निमित्ते आरती ओवाळीत। परी समर्थ निद्रिस्थ ते।।२३।। मौनीराज वदे तयासी। नच जागृत करणे मजसी। हेच सांगणे तुम्हांसी। मम सुजन हो।।२४।। कां की मम एक भक्त। पडलासे संकटात। मज धांव घेणे त्वरित। ब्रीद साच मम असे ते।।२५।। सुनंदा बंधूस नेत दवाखान्यात। औषधोपचार करण्याप्रत। श्री समर्थाते आठवित। माधवास्तव सदा ती।।२६।। ऐकून भक्तवचन। मौनीराज गुप्तरूपे जाऊन। केले निज भक्ताचे रक्षण। तया माधवाचे ते।।२७।। यापरी जीवदान दिधले। प्राण तयाचे वाचविले। हे मठी भक्तांना नच कळले। केले समर्थ कर्तव्य ते।।२८।। तो समर्थ उठले त्वरित। वदती निज भक्ताप्रत। एक भक्त संकटात। तारीले तयाते मी जाऊन।।२९।। तव अनुभव सर्वांसी आला। खराच मौनीराज शिणला। संकटी रक्षित भक्ताला। कळले आज सकळांते।।३०।। समर्थ भक्त कुसुम अत्यंत। एकदा स्वप्नी जाऊन मौनीनाथ। प्रसाद म्हणून पैसा देत। तिज आनंदराव कन्येते।।३१।। त्वरित जागृत होऊन। सांगे सर्वा शुभ स्वप्न। मज स्वप्नी प्रसाद देऊन। झाले गुप्त समर्थ ते।।३२।। लगेच आला प्रसादाचा गुण। सुनंदा

झाली पास पूर्ण। सर्वात पहिला नंबर आलासे जाण। प्रभाकर भगिणीचा तो।।३३।। यशवंतराव भाविक फार। तरनोळीत ज्याचे घर। विश्वास संतपायावर। साहेबराव पुत्र तो।।३४।। तया गृही एक गाय। जी विश्वाची माय। काळी कबरी, करी बहु सोय। यशवंत भक्त तियेचा।।३५।। ती गाय आंधळी जाहली। डाव्या डोळ्याने चांगली। दवाखान्यात त्वरे नेली। केले औषधोपचार ते।।३६।। केले बहुत उपायांला। परी नच गुण ये धेनूनेत्रांना। शेवटी नवस करी समर्थाला। येणे रिती श्रोतेजन हो।।३७।। जरी मम धेनूस गुण आला। मी येईल यात्रेला। धरून आदरे नियमाला। पौष पौर्णिमेच्या त्या।।३८।। यापरी करून भाषण। केले समर्थास साष्टांग नमन। विभूती धुनीतील घेऊन। वेगे गेला स्वगृहाते।।३९।। अंतरी विश्वास भारी। विभूती लावी अत्यादरी। धेनुच्या नेत्राभितरी। समर्थ नामाने तो।।४०।। भाव होता म्हणून। नेत्र होय छान। आला धेनूते त्वरे गुण। यशवंतरावाच्या त्या।।४१।। दोन महिण्याची गाय बिमार। गुण आला झडकर। धरिता विश्वास संतपायावर। तया यशवंताने तो।।४२।। श्रध्दा कुणी धरिली। फळप्राप्ती जाहली। नच ती वाया गेली। ऐका श्रोते जनहो।।४३।। सुखदुःख हे संसारी। मानवा भेटण्या ये निर्धारी । न चुके अत्यादरी । ब्रह्मलिखित ते।।४४।। कर्म चुकते कशाने । खरी संत सेवा केल्याने । शास्त्र वेद पुराणे । देती ग्वाही आपणांते।।४५।। पुढच्या अध्यायी वर्णन। होय चमत्कारांचे गहन । जे ग्रंथ लेखकाचे श्वशुरास घडले छान । श्री मौनीबाबांचे ते ।।४६।।

।। श्री दासगणूचा वेडा श्रीरामलिखित श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ अध्याय अठ्ठाविसावा समाप्त ।।

।। श्री मौनीबाबास अर्पण ।।



श्री परमहंस रामकृष्ण मौनीबाबा, चिखली. मौनीबाबा जीवनामृत ग्रंथाचे लेखक – श्रीराम महाराज.
मौनीबाबा जीवनामृत ग्रंथाचे अवलोकन कर्ता – श्री. शंकरराव मोहरील, मु. नर्सी, जि. हिंगोली.

# || अध्याय एकोणतिसावा ||

श्री गणेशाय नमः।। श्री सरस्वत्यै नमः।। श्री गुरूभ्यो नमः।। श्री कुलदेवताय नमः।। श्री नवग्रहाय नमः।। जय जयाजी रुक्मिणीरमणा। सकळ त्रिभुवन वंद्य नारायणा। सकल शिरोमणी भूषणा। नमन असो तुज आदरे मम ते।।१।। उदंड कथिले ज्ञान। अथवा योग-याग साधन। श्रद्धेवीण फोल जाण। न ये फळ कालत्रयी ते।।२।। शकुंतला घुगे मेडशीची। असून भाविक मनाची। चिखलीस्तव जाय साची। येता पौष पौर्णिमा ती।।३।। जन तूप, नारळ टाकिती धुनीत। समर्थ टाकीत सुवर्णमनी खचित। पांच सुवासिनीचे त्वरित। घेऊन दरवर्षी ते।।४।। अहो शकुंतला, शांताबाई। कमल, कान्ता, कलावतीबाई। जाणती समर्थाच्या सर्व सोई। जे भक्त बाबाचे ते।।५।। सुवर्णमणी टाकिता धुनीत। चमत्कार घडला अघटीत। मेडशी नामे ग्रामांत। ऐका एकाग्र चित्ते।।६।। जो मणी धुनीत टाकिला। तो देवगृहामाजी निघाला। पंढरी पत्नीने देखिला। न लागता क्षण एक तो।।७।। जो मणी निघे देवघरांत। शकुंतलाबाई चिखलीत। ती नच होती गृहाप्रत। ऐका श्रोते जन हो।।८।। मणी पाहून हर्ष झाला। म्हणे हा होता मी टाकिला। बाबांच्या धुनीत भला। चिखलीत मठामाजी।।९।। भाव ठेवा संतचरणी। कथा चाले निर्वाणी। सदा दिसे गंगेवाणी। निर्मळ पाहा ती।।१०।। नर्सी नामदेव प्रख्यात। कयाधूतिरी सत्य। इंगोली तालुक्यांत। प्रसिद्ध दक्षिणेस।।११।। द्विज देविदास ईशभक्त। श्रीमंत अति गावांत। मोहरील ज्या म्हणत।

नर्सीमाजी ते।।१२।। परी वडीलपुत्र शंकर। मौनीभक्त खरोखर। नेम कडक फार। वागे धर्माने तो।।१३।। यांचा स्वभाव भोळसर। वाची रामायण सत्वर। गीता सहस्त्रनाम झडकर। नाम हो देवाचे ते।।१४।। वासुदेवानंद सरस्वती। मंत्र गुरू निश्चिती। जीवदान दे शीघ्रगती। चातुर्मासामाजी ते।।१५।। निज गुरू मौनीसंत। समान मानी निश्चित। देविदास पुत्र। शंकर नर्सीकर तो।।१६।। जरी गुरू समाधीस्थ। मौनीस मान देत। स्वामी शिष्य सत्य। देविदास पुत्र तो।।१७।। मग जास्तच भक्ती बसली। पारायणे सुरू केली। जीवनामृताची भली। जो असे ग्रंथ मौनीचा।।१८।। म्हणे समर्था कधी भेटसी। मम अभाग्यासी?। दे दर्शन पातक्यासी। योगीवरा तू।।१९।। मम गुरू गरूडेश्वरी। खर्च न जाण्या अत्यादरी। माझी सर्व गरीबी पूरी। न खाण्या अन्न ते।।२०।। तव काय घडले वर्तमान। श्रोते देणे तुम्ही कान। करीत अनुष्ठान। अठराशे ऐंशीत ते।।२१।। श्री दत्त मंदिरांत। पुजा अर्चन करी सत्य। ग्रंथ शंकर तो वाचित। समर्थ मौनीचा।।२२।। म्हणे एकदा स्वप्न पडले। श्री गुरू चांगले। मंदिरांतून त्वरे आले। तो वाटले मज नवल ते।।२३।। आसनाहून उठलो। दर्शनास्तव सरसावलो। चरण वंदिता झालो। मम श्री गुरूचे।।२४।। तो देखिला नग्न दिगंबर। केवळ शिव अवतार। मज दिसला सत्वर। नारायणस्वामी सानिध्याते।।२५।। केला मग नमस्कार। वदले मम गुरूवर। मीच मौनी रूपे भूंवर। असे वत्सा शंकरा।।२६।। यापरी स्वप्नी दर्शन। देत मौनी भगवान। पाहता त्वरे उठून। तो झाले अदृश्य ते।।२७।। उठून बसता आसणी। केली तयाची विनवणी। त्रीपदी गोड निर्वाणी। असे मम गुरूकृत

जी।।२८।। ध्यास मौनीचा लागला। कधी भेटेन संताला। विचार चालला अखंड मनी तो।।२९।। जो स्वप्नात देखिला। तोच मनांत ठेविला। अल्पही विसरे ना भला। मौनी गुरूवरा तो।।३०।। परस्परा पुसे देविदास पुत्र। मौनी दर्शना जाणे त्वरित। मज चिखलीप्रत। येणे असल्यास चला तुम्ही।।३१।। कुणी नच सोबत। आले एकटे सत्य। चिखलीस यथार्थ। मठी समर्थाच्या ते।।३२।। केला नमस्कार। समर्थ चरणावर। स्वप्नी दिले दर्शन साचार। त्वाच मायबापा ते।।३३।। तुम्ही जरी नग्नताधारी। गुरूचेच रूप निर्धारी। भिन्न भावना नच खरी। मम मनी मौनीराजा।।३४।। कायेत जरी फरक। आत्मा एकची देख। तुळशीदास तो चोख। तूच कलीचा मौनी समर्था।।३५।। मम गुरू श्री दत्तभक्त। तुम्हीही अति विरक्त। दोघेही परमहंस सत्य। नच भेद तुमच्यांत तो।।३६।। तुमच्या पादुका चिखलीत। मम गुरूच्या त्या नर्सीत। तुम्हा असो दंडवत। साष्टांग मौनीवरा।।३७।। मी नच शंकर। तव टांचेचा कंकर। तोडी अहंकार। समूळ मनाचा तो।।३८।। मी संसारी फसलो। मायेत गुंतलो। शरण तुम्हा आलो। तुळसीदासा मौनी प्रभू।।३९।। ऐकून शंकरचे वचन। झाले मौनी प्रसन्न। तू माग वरदान। जे इच्छित मनामाजी ते।।४०।। तव वदे शंकर। मज न लगे ईश्वर। व्हावे शाश्वत झडकर। जे न भंगे कल्पांती।।४१।। त्या परीच मागणी। समर्थ चरणी। नच दुसरी विनवणी। समर्था ती दयाळा।।४२।। समर्थ वदती मुळाकडे। नच हिंडणे कुणीकडे। रामायण तू पढे। रात्रंदिन शंकरा ते।।४३।। म्हणून मूळ धरिता हाती। फांद्या कुणीकडे जाती। ठेव खुण चित्तांत ती। शंकर भक्ता तू।।४४।। मग विचार केला। पुष्य नक्षत्राला। रामचरित ग्रंथाला।

दिला प्रसाद म्हणून तो।।४५।। प्रसाद त्यास देऊन। वदती समर्थ रामकृष्ण। यावेच करणे पारायण। चातुर्मासांत ते।।४६।। मात्र निष्ठा असावी। तेव्हाच कळे चवी। ग्रंथाची बरवी। नच अपयश ते कल्पांती।।४७।। जे जे जगांत दिसे। ते ते रामरूप असे। पुन्हा सवेच नासे। मूळस्वरूप एक खरे।।४८।। यापरी दे शिकवण। मस्तकी कर ठेऊन। दिला आशीर्वाद जाण। नर्सीकर भक्ताते।।४९।। आनंद झाला मानसी। समर्थ देता ग्रंथासी। तसे आशीर्वादासी। देवीदास पुत्राते।।५०।। यापरी नियम धरिला। पारायणाचा वहिला। चातुर्मासामाजी भला। श्री दत्त मंदिरात नर्सी तो।।५१।। पुढील अध्यायी वर्णन। होय चमत्कारांचे गहन। जे ग्रंथ लेखकास घडले छान। श्री मौनीबाबांचे ते।।५२।।

।। श्री दासगणूचा वेडा श्रीरामलिखित श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ अध्याय एकोणतिसावा समाप्त।।

।। श्री मौनीबाबास अर्पण।।



श्री परमहंस रामकृष्ण मौनीबाबांना गणपत माळी, मु. खामगाव, जि. बुलढाणा यांनी
जन्मोत्सव यात्रेचे वेळी पालखी समर्पित केली.
इ.स.१९५७ (शके १८७८)

# || अध्याय तिसावा ||

श्री गणेशाय नमः। श्री सरस्वत्यै नमः। नवग्रहाय नमः। श्री कुलदेवताय नमः। श्री गुरूभ्यो नमः।। जय जयाजी शिवशंकरा। सकल पुज्यांत तू सुरवटा। भूषण गौरीहरा। पावे दिनाते तू देवा।।१।। ऐका कथा मनोहर। ठेऊन विश्वास खंबीर। मेरूसम साचार। परीसा कथा ती।।२।। मीच एकदा बिमार। झालो अंबादास कुमर। जांभरून ग्रामी सत्वर। कर्मास्तव तो।।३।। ज्वर विषम निघाला। देह कष्टत भला। पार नच दुःखाला। भरंवसा नच मम तो।।४।। कुणी नच म्हणती। वाचेल हा निश्चिती। देई जीवदान याप्रती। समर्था ईशसंता।।५।। शुध्दी नच मजला। कोण आला गेला। खबर नव्हे ते वेळा। मज श्रोते हो।।६।। तव स्वप्न अवचित। चार वाजण्याची सत्य। वेळ ती खचित। होती विबुध हो।।७।। मज नच शुद्ध खरी। आले समर्थ नग्नता धारी। शिर ठेविले पायांवरी। मी स्वप्नामाजी ते।।८।। तव वदत मौनी। नीट तू होसी शीघ्रक्षणी। न चिंता करी तू मनी। झाले मग अदृश्य ते।।९।। खरेच स्वप्न झाले। दुःख समूळ पळाले। काळाचे भय चुकले। समर्थ कृपेने ते।।१०।। नच निष्ठूर व्हावे माय। माझे मौनीराज गुरूराय। धरिता तुझे मी पाय। न लोटी बालका।।११।। मी होईन तव द्वारीचा श्वान। तुझे अंगण राखीन। भक्तीचा तुकडा तो खाऊन। निजहितास्तव ते।।१२।। केरसुणी होईल मठी। केर काढीन उठाउठी। पदरी धरी जगजेठी। मायबाई मौनीवरा।।१३।। विश्वासाचे फळ। मौनी पावे तात्काळ। मज कळला केवळ। अंबादास पुत्र तो।।१४।। त्यांचीच कृपा होत। काव्य वेडेवाकडे सत्य। मठांत लिहीत। अंबादासपुत्र तो।।१५।। पंढरीनाथ दया करावी। मौनीसेवा घेई आम्हा करवी। मी व श्वशुर येत लवकरी। चिखलीस दर्शनास्तव ते।।१६।। 'मौनीबाबा' नाम उच्चारी।

तेणे गंडांतर गेले दूरी। प्रत्यक्ष अनुभव अंतरी। आहे आम्हा दाम्पत्याते।।१७।। आम्हा सर्वांवर कृपादृष्टी आपुली। सदाच असावी मम माऊली। नाम घेता तेथेच प्रगटली। पाहिजे तव मूर्ति मौनीस्तव।।१८।। दारव्हा तालुका असे। त्यात तरनोळी गांव विलसे। अवधूत भक्त राहतसे। देशमुख कुळांत तो।।१९।। मठी आला चालून। वैशाख पौर्णिमा जाण। घालिता झाला लोटांगण। समर्थ चरणी ते वेळा।।२०।। विटला देव संसारासी। तारा तारा या दासासी। ठेवा आपुले पायासी। नका दूर करूं आता।।२१।। ऐसी विनंती करूनी। मंगल स्नान ते घालूनी। चौरंगावरी बैसवूनी पुजिले षोडशोपचारे।।२२।। मग अति नम्र होऊनी। अर्पितले समर्थचरणी। तांब्याचे गंगाळ आणि। ताट तांब्या प्याला तो।।२३।। दोन तोळ्याची सुवर्ण मुद्रिका। झगा, उपरणे, पटका। धोतर नेसविले देखा। अवधूत भक्ताने।।२४।। कल्पना जसी असे ज्याला। तसे जग दिसे तयाला। काय करावे आपण तयाला। सांगा सांगा विबुध हो।।२५।। माळी गणपत भोळा। येत पाहण्या सोहळा। यात्रेचा तो डोळा। खामगांवाहून तो।।२६।। मोटारीत बसून। ऐल स्थळी येत जाण। झाली नभोवाणी पूर्ण। ते वेळा भक्तवराते।।२७।। ''तुझं होय संतदर्शन। शिव अवतार गहन। ध्यानात सदा मग्न। दिगंबर वृत्ती तयाची''।।२८।। भयभयीत अंतरी। विश्वास देवावरी। देव कर्तव्य थोर भारी। सुचे ना काही त्या।।२९।। विश्वरूपाते भ्याला किरीटी। गणपत स्थिती चोखटी। तीच झाली उठाउठी। शुद्धीवर येत हरिस्मरणे।।३०।। आला तो चिखलीत। फिरे मग यात्रेत। देवी दर्शनाते घेत। लागली चिंता ती।।३१।। ज्योतीबा माळी सोयरा। आला तयाचेंच घरा। चर्चा निघाली त्वरा। नग्न संत काशीनाथचे मळ्यात ते।।३२।। लगेच उगवतां दिन। गणपत ये मठी जाण। प्रसाद करी ग्रहण। समर्थास्तव दिलेला तो।।३३।। होते भक्त मठावर। विनविती खरोखर। भोजनास्तव साचार। समर्थाप्रत ते।।३४।। दोन

दिन उपवासी। खूण त्यानांच माहीत खासी। गोष्ट पटली माळ्यासी। सत्य आकाशवाणी ती।।३५।। मग पूजा, आरती करी। समर्थ हासले निर्धारी। गणपतीते हर्ष भारी। केला नमस्कार तो।।३६।। तुम्ही धन्य भक्त माळी। वश केला मौनी वनमाळी। उपासी द्वय दिन सावळी। मूर्ती समर्थाची ती।।३७।। हे भक्तवचन परिसून। हळहळला गणपत पूर्ण। ये नेत्रांतून। तयेवेळी तो डाब हो।।३८।। मग यात्रा झाल्यावरी। 'लक्ष असो द्या बाळावरी'। म्हणूनी नमस्कार तो करी। गेला खामगावांते।।३९।। अहर्निशी धंदा नाम। जय जय मौनीराम। हेच संसारी धरिले काम। माळी भक्ताने ते।।४०।। येई प्रत्येक मासी। तो समर्थ मठासी। घेण्या मौनी दर्शनासी। सर्वपरी बारा पौर्णिमेस।।४१।। गणपत माळी चतुर। केला स्वमनी विचार। साधावे कार्य सत्वर। पालखीचे समर्थकृपे।।४२।। कामदार लावून। घेत पालखी करून। त्वरे निघाला जाण। खामगावांहून तो यात्रे ते।।४३।। टाळ मृदंग विणा। चालले करीत गर्जना। मौनीराम कृष्णा। देण्या पालखीस।।४४।। खामगांवाहून निघाला। चिखलीस मौनी पाहिला। पालखी अर्पित समर्थाला। मग काढिली मिरवणूक ती।।४५।। शके अठराशे अठ्ठ्याहत्तरांत। पौष शुद्ध पौर्णिमेस खचित। पालखी गणपत माळी देत। तयांतची निघे सर्गात आता।।४६।। अमृतापरी कथा गोड। मोडेल भक्तीची खोड। घडेल मोक्षाची जोड। कथा परिसता ती।।४७।।

।। श्री दासगणूचा वेडा श्रीरामलिखित श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ अध्याय तिसावा समाप्त।।

।। श्री मौनीबाबास अर्पण।।



श्री परमहंस रामकृष्ण मौनीबाबांचा ध्यानस्त फोटो.

# || अध्याय एकतिसावा ||

श्री गणेशाय नमः।। श्री सरस्वत्यै नमः।। श्री गुरूभ्यो नमः।। श्री नवग्रहाय नमः।। श्री कुलदेवताय नमः।। श्री सर्व संताय नमः।। जय जयाजी दशरथनंदना। सीतापती नारायणा। नमन तुज मनमोहना। दासगणू शिष्याचे।।१।। चित्ती भाव धरा खचित। संपत आला जीवनामृत। सादर व्हा त्वरित। ऐकण्या कळसाध्याय हा।।२।। देह जाईल न लागता क्षण। चतुर देखणा विलक्षण। जळे। अग्नीत जाण। केव्हा तरी तो।।३।। होईल सार्थक म्हणून। सर्व विश्वाचे संपूर्ण। लावली एकतीस दुकान। समर्थ रामकृष्णाने ती।।४।। भाव विश्वास प्रेम सुविचार। व्हावे गिऱ्हाईक झडकर। नच लावणे उशीर। येण्या आपण मठी तो।।५।। विश्वास ठेवून। घेणे माल पारखून। साधण्या परत्र जाण। चुकविण्या जन्ममरण ते।।६।। एकतीस मंदिराप्रती। मौनी बांधावी निश्चिती। समर्थ भक्त येण्या शीघ्रगती। घेण्या दर्शन मौनीचे ते।।७।। ही नच वृथा वैखरी। उद्धार होय सत्वरी। विश्वास ठेवल्यावरी जीवनामृतावरी तो।।८।। मौनी ग्रंथ नच कादंबरी। अवघी लीला असे खरी। भाव धरल्या अंतरी। फळ ये विश्वासू जना।।९।। मौनीची सेवा करा। हा ग्रंथ स्वरूप खरा। तोच उभा मंदिरा। जे असती एकतीस ते।।१०।। हा ग्रंथ श्रेष्ठ मानणे फार। संशय नसो तीळभर। पारायण करणे सत्वर। संशयविरहीत ते।।११।। झाल्या मौनीचे दास। नच तुम्हा दुःखाची खास। चुकेल लक्ष चौऱ्यांशी त्रास। आणि जन्ममरण ते।।१२।। निंदकाच्या कानी। अक्षर नच पडणे निर्वाणी। लघुत्व ये भक्तीत पूर्णपणी। पडता व्यर्थ शब्द ते।।१३।। जे जे

शब्द ग्रंथात असती। ते ते रत्न मानुनी छान अति। हार घालतो समर्थाप्रती। शंकरराव जामात हा।।१४।। असती मुख्य बिल्वपान। एकतीस तुळसी जाण। घेऊन करांत पूर्ण। वाहातसे समर्थ शिरी।।१५।। नव ग्रहांत सूर्य खचित। नृप तो मनुत्यांत। चिरंजीवात रामदूत। तेवी थोर ग्रंथ हा।।१६।। वाचावा हा ग्रंथ म्हणून। भक्ती ठेवावी छान। अनुभव घेणे पूर्ण। समर्थ भक्ताने तो।।१७।। एक पुष्प वाहून भावे। वंदन ग्रंथा करावे। कार्या त्वरित जावे। न ये अपयश ते केव्हाही।।१८।। जे जे संत दिसती। जीवनामृतांत ती। मौनी समजणे त्याप्रती। मुख्य ध्येय असो।।१९।। किती जन्म घ्याल। संतसेवा न घडेल। याच देही होईल। मौनीग्रंथाची ती।।२०।। एकतीस हार विश्वासासे थोर। समर्थ कंठी सत्वर। घाली पार्वतीपुतण्या।।२१।। ऐका भाविक जन। कोण्या अध्यायी वर्णन। अवतरणीकेत ये पूर्ण। ग्रंथामाजी ते।।२२।। भोजनाच्या शेवटी। दहीभात वाटी। न करता अटाअटी। जीवनामृत ते।।२३।। मुख्य स्वरूप धृत। हा ग्रंथ जीवनामृत। मौनी हा साक्षात। घेणे वाचून अनुभव तो।।२४।। पहिले अध्यायी वर्णन। कथन होय गणपती। सरस्वती देव गुरू निश्चिती। होय वर्णन ते।।२५।। दुसऱ्या अध्यायी श्रावणाचे वर्णन। गंगाबाईस अपत्ये तीन। समर्थमाता रंभाई ती पूर्ण। आकाराम पिता शोभे।।२६।। तिसऱ्या अध्यायी वर्णन। सिरसोली पुण्यभूमी म्हणून। समर्थ जन्म होय पूर्ण। श्री दत्तकृपेकरून ते।।२७।। चौथे अध्यायी वर्णन। वैराग्य समर्थाते जाण। झाले दत्तदर्शन। भक्तीमुळे ते।।२८।। पाचवे अध्यायी गहन। ऐका श्रोतेजन। कान तो देऊन। काय कथा ती असे।।२९।। स्त्री काशी करिता बोध। भक्तीत न ये बाध। झाले वैराग्य अगाध। हेच कथन पै ते।।३०।। कनक कांतेचा त्याग केला। धरिले कठीण व्रताला।

हेच वर्णन पंचमोध्यायाला। होय श्रोते हो।।३१।। घेऊन नामाचा अनुभव त्वरित। समर्थ गेले सातपुड्यांत। तेथे बांधून झोपडीप्रत। केले तपाते पाहा।।३२।। सहाव्यांत षडविकार। चार धाम, सप्त पुरी खरोखर। दावण्या मार्ग साचार। ठावे सर्व विश्वाते।।३३।। द्वादश ज्योतिर्लिंग। परस्त्री करी तपा व्यंग। परी समर्थ अभंग। हेच कथन पै ये ठाई।।३४।। चिखलीची कथा सुंदर। झडकर आले साचार। मंदिरांत सत्वर। शंकराच्या ते।।३५।। सातव्यात केली अटी। वस्त्रासवे पाडिली तुटी। नच जवळ ठेविली वाटी। हेच कथन पै असे।।३६।। चैत्र शुद्ध पाडवा म्हणती। आले आप्पाचे मळ्याप्रती। निंबाखाली करी वस्ती। स्मशानाजवळी ते।।३७।। आठव्याचे वर्णन। काय कथा गहन। देणे तुम्ही कान। समर्थकृपे।।३८।। शीत, उष्णापासून खरे। शरीरी कष्ट होय पुरे। हळहळले आप्पा बरे। दे बांधून झोपडीते।।३९।। डॉक्टर धिर्णीकर। नामे लक्ष्मण खरोखर। व्यथा केली दूर। वाचे संतती निर्मलाबाईची।।४०।। आता नववा अध्याय गोड। परशराम मौनीची जोड। पिंपळोदी तोड। ज्ञानचर्चेची ती।।४१।। अध्याय दहावा खरा। प्रथम मठ बांधिला पुरा। वास्तव्य होय गुरूवरा। हेच वर्णन ये ठाया।।४२।। अकरावा अध्याय आदित्य। तेच समजा मौनी चरित्र। दुसरा मठ त्वरित। बांधी काशीनाथ तो।।४३।। पैनगंगा भरली दोथडी। आले भक्त तातडी। पौर्णिमेस त्वरित जोडी। करण्याते समर्थपायाची।।४४।। अध्याय बारावा मात्र। चुकता क्षणभरी पुत्र। आणून दे समर्थ स्वतंत्र। बुलढाण्यामाजी तो।।४५।। सिद्धविनायक पुत्र घेऊन घरी। आप्पा येत सत्वरी। काळ टळला अत्यादरी। म्हणती समर्थ कृपेने।।४६।। अध्याय तेरावा रत्न बरे। पांडुरंग भेटे समर्था त्वरे। महादेवकन्या प्रसूत आदरे। तिर्थ अंगारा सेविता।।४७।। चौदाव्या अध्यायी शेगांवी

उघडे कुलूप। हातलाविता आपोआप। चमत्कार चार पाच खूप। मौनी दाविती भक्तांते।।४८।। पंधराव्या अध्यायी कळा। मौनी बिदोडे प्रताप आगळा। पडती एकमेकांचे गळा। झाली भेट द्वय संताची ती।।४९।। सोळाव्यात रामभाऊ थोर भक्त। हरविलेले सोने होमांत। दाखविले त्या खचित। बुलढाण्यामाजी ते।।५०।। शांता दुःखित असता। नीट होय समर्थामुळे तत्त्वता। सोळाव्याची संपली वार्ता। वरीलप्रमाणे ती।।५१।। सतराव्याध्यायी कथन। अरविंदास पादुका देऊन। गंडांतर दिले टाळून। आणि मागती दान समर्थ ते।।५२।। अठरावे अध्यायी। जागा घेत पाही। मंदिरास्तव लवलाहि। काशीनाथ आप्पा ते।।५३।। भार्गवपुत्रा कृपा केली। ईटगांवी वस्ती भली। भक्ती समर्थाची जडली। खरा मौनीभक्त तो।।५४।। देवेंद्रसिंह मृत झाला। तो समर्थे उठविला। वर्धा गांवी स्टेशनला। हीच कथा अठराव्यांत ती।।५५।। ऐका कथा एकोणविसाव्यांत। वाचविला गणपत। तसे त्याचे बहिणीप्रत। दिले आयुष्य बाबांनी।।५६।। समर्थ बंधू शंकर। पुत्र झाला झडकर। कुसुमताई सहि सत्वर। होती पुत्र ते।।५७।। विसावा थोर। भेटले ते हरिहर। ठेवून भाव खरोखर। मूर्तिजापुरते।।५८।। देवळाचे गान महिमान। कळस बसवी मौनी भगवान। बद्रीच्या तो छान। तसे वर्णन स्वामी मंदिराचे।।५९।। एकविसावे अध्यायी कमाल। सत्यनारायण बाळ। वैद्य संताते नमाल। होता नीट मजसमान ते।।६०।। धनराजची भानामती। तया भगिनीची ती। सर्पाची विषवस्ती। उतरली समर्थकृपे।।६१।। बाविसावा गोड भारी। शंकरा भेटली श्रीहरी। शेवंताचे विष उतरवी खरी। वाचवी तिचे पुत्रास।।६२।। तेवीसावे अध्यायी कथा छान। दत्तात्रय कांता करी पारायण। होण्या गजाननदर्शन। धरून भाव अंतरी तो।।६३।। होता तेरावे पारायण।

समर्थ दिले दर्शन। गजाननरूपे गहन। आंबेकर शांताबाई ते।।६४।। चौवीसावा अध्याय श्रेष्ठ। मिळून भक्त सुभट। धरिली चिखलीची वाट। भरे यात्रा मौनीबाबाची।।६५।। नथ्थू मिस्त्री भाविक। पाळणा वस्त्र अमोलिक। दागिणे ते अचूक। दे जन्मदिनी समर्थाच्या।।६६।। पंचविसाव्यात कथन। मोठे गांवी यात्रा छान। भरवी भक्त पूर्ण। वामनराव तो।।६७।। सर्व लहान थोर संत। यात्रेस्तव येत। हेच पाहा कथन। पंचविसाव्यात पूर्ण पै।।६८।। सव्वीसाव्याध्यायी। समर्थ भक्त बद्रीनारायणा जाई। मौनव्रत सोडी ते ठाई। रामकृष्ण मौनी तो।।६९।। सत्ताविसाव्याध्यायी कथा। कृष्णरूप तत्त्वता। दाखविले सर्वथा। शांताराम पाटलाते।।७०।। येऊन गृही मावंदे करी। हीच कथा बरी। मनोहर खरी। वर्णन झाले ये ठायाते।।७१।। अठ्ठाविसाव्याध्यायी पडता मोटारीतून। माधव तो जाण। वाचवी रामकृष्ण। हेच वर्णन पै येथे।।७२।। एकोणतिसाव्यात चमत्कार। होमातला मणी सत्वर। सापडला झडकर। निजगृही शकुंतलाते।।७३।। आणि कथा ती गोड। समर्थाची चिखलीत जोड। शंकरची मोडली खोड। देऊन प्रसाद ग्रंथाचा।।७४।। तिसाव्या अध्यायी कथा गहन। स्वप्नात दृष्टांत देऊन। रोगमुक्त। केला जाण। वेडा रामा तो।।७५।। तरनोळी गावचा। अवधूत भक्त साचा। नेम करी मनाचा। आला चालून मठी तो।।७६।। तसा हा अध्याय कळस। मौनी मंदिरास। बसवू ते खास। समर्थ कृपेने।।७७।। जन्ममरण दूर करी। असता निर्धारी। एकतीस पायरी। जाण्या वैकुंठाते।।७८।। जीवनामृत ग्रंथ हिरा। मौनी शिरी मुगुट बरा। एकेका शब्दाचा पुरा। घालू तयाते।।७९।। असती कमल फुले। वाहता समर्थास शोभले। एकतीस चांगले। वाहिले समर्थ शिरी ते।।८०।। बुध्दी दाता

रामकृष्ण। अनृत नच भाषण। करी अवलोकन शंकर जाण। समर्थकृपे ग्रंथ तो।।८१।। जे जे चिंताल मनी। ते ते देईल मौनी। अनुभव घेणे मनी। करून भक्ती ती।।८२।। ग्रंथ नच ठेवणे अपवित्र स्थानी। सदाचार संपन्न गुणी। सेवा करणे रात्रंदिनी। समर्थ भक्ताने ती।।८३।। पापरूपी मातंग माजले। म्हणून एकतीस केसरी भले। मौनीवरे निर्मिले। करण्या पराभव तो।।८४।। गोमयाने भूमी सारवून। चौरंग मांडून छान। रांगोळ्या शोभायमान। तसा नव ग्रह कलश तो।।८५।। दिप तुपाचा लावणे। आसन शुभ्र घेणे। पारायण मग करणे। होऊन पवित्र ते।।८६।। इच्छा होय पूर्ण मनीची। पूजा करून ग्रंथाची। तशी महती अन्नदानाची। हो ग्रंथानिमित्ते ती।।८७।। ग्रंथ रामकृष्ण स्वरूप। भजता जळेल पाप। भक्ती उपजे आपोआप। समर्थ कृपे ती।।८८।। मठावर पौर्णिमेस येता। तीच ग्रंथाची योग्यता। कळेल तुम्हा वाचिता। खरे खोटे ते।।८९।। मान गुरुपुष्यनक्षत्राचा। जीवनामृत ग्रंथाचा। विशेष दिवस पौर्णिमेचा। पारायणास्तव तो।।९०।। श्रावण मासांत। एकेका अध्यायाप्रत वाचिता खचित। सहज घडे पारायण ते।।९१।। शनिवारी निराहार राहून। ग्रंथ वाचणे जाण। सेवा गुरुवारी पूर्ण। श्रावणांत ती जन हो।।९२।। आषाढ मार्गशीर्ष मासांत महत्त्व थोर। पारायण करणे सत्वर। नवमीस सुरू करणे खरोखर। पारायणाते।।९३।। म्हणजे पौर्णिमेस होय बरी। समाप्ती अत्यादरी। ग्रंथाची निर्धारी। समर्थ भक्तांनो।।९४।। आषाढ पौर्णिमा गुरूचे पुजन। मार्गशीर्ष मासांत दत्तजन्म। म्हणून करा पारायण। ग्रंथाचे सप्तदिनी।।९५।। तशी पौष पौर्णिमा। समर्थ जन्माची खचित। बाबांच्या ती निश्चित। म्हणून वाचणे ग्रंथ हा।।९६।। या तीन पौर्णिमेस। पारायण करणेच खास। चुकूं नये नियमास। मौनीराज भक्ताने।।९७।।

जीवनामृत ग्रंथाचे होता पारायण। पुरणाचा करणे नैवेद्य जाण। मनोरथ होतील पूर्ण। इच्छित सर्व जे जे।।९८।। झाली ग्रंथाची अखेर। करा मौनीचा गजर। तसा चरणी नमस्कार। ग्रंथरूप मौनीच्या तो।।९९।। समर्थे ठेविला मस्तकी हस्त। म्हणून लिहिला वेडावाकुडा ग्रंथ। तो अर्पण असो समर्थाप्रत। अल्प सेवा दिनाची ती।।१००।। मी फक्त ग्रंथ सांगितला। दत्तात्रय आंबेकराने तो लिहिला। नच करिता अनुमानाला। उदार भावाने तो।।१०१।। आंबेकरासी समर्थ भक्ती म्हणून। लिहिला ग्रंथ रात्रंदिन। एकतीस दिवसांत संपूर्ण। न करिता चिंता भवाची।।१०२।। जसा सुदामा गरीब ब्राह्मण। पोहे देत श्रीकृष्णाकारण। तेवीच मम दिनाचे जाण। शब्दरूपी पोहे हे।।१०३।। दुर्बुद्धी दुष्ट वासना। न उपजो भक्ताचे मना। हीच पुरवी मम कामना। रामकृष्ण प्रभू दयाळा।।१०४।। तव कृपे ग्रंथ रचिला खरोखर। तुला असो मम निरंतर। नमस्कार वारंवार। साष्टांग भावे तो।।१०५।।

।। श्री दासगणूचा वेडा श्रीरामलिखित श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ अध्याय एकतिसावा समाप्त।।
।। श्री मौनीबाबास अर्पण।।

।। तत्सत श्रीकृष्णार्पणमस्तु।। श्री रामकृष्ण मौनीबाबाकी जय।। पुंडलिक वरदे हरिविठ्ठल।।
।। ज्ञानदेव तुकाराम।। पार्वतीपते हरहर महादेव।। अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त।।

**||श्री मौनीबाबा जीवनामृत ग्रंथ||**

**हरिभक्त परायण संतकवि श्री श्रीराम महाराज विरचित श्री मौनीबाबा जीवनामृत**

**लघु ग्रंथातील एकंदर ओवी संख्या – १८३८**

| अध्याय | ओवी संख्या |
|---|---|
| १ | ३२ |
| २ | ६२ |
| ३ | ५३ |
| ४ | ९० |
| ५ | ६४ |
| ६ | ७५ |
| ७ | ६५ |
| ८ | ५५ |
| ९ | ४९ |
| १० | ४५ |

| अध्याय | ओवी संख्या |
|---|---|
| ११ | ७७ |
| १२ | ५८ |
| १३ | ५९ |
| १४ | ५६ |
| १५ | ६७ |
| १६ | ७४ |
| १७ | ५२ |
| १८ | ५८ |
| १९ | ६२ |
| २० | ४२ |

| अध्याय | ओवी संख्या |
|---|---|
| २१ | ७५ |
| २२ | ७५ |
| २३ | ४१ |
| २४ | ४९ |
| २५ | ४४ |
| २६ | ६६ |
| २७ | ४३ |
| २८ | ४६ |
| २९ | ५२ |
| ३० | ४७ |
| ३१ | १०५ |

# || आरती मौनीबाबांची ||

आरती मौनीबाबाला । करितो वंदुनी चरणाला ||धृ.||
अति स्नेहाळ शांत मूर्ती । भक्ता प्रेमें वश होती ||
भजती नित्य दत्ताला ।
मौनी जपती प्रभूमाला ।
पावन करिती लोकांना ।
चला हो जाऊं, प्रेमभरे पाहू ।
वंदन करू या चरणाला । आरती मौनीबाबाला ||१||
येऊन रामनवमीला । उपकृत केले जनतेला ।
बोध ते करिती लोकांना।
करा हो हरिच्या भजनाला ।
असा उपदेश करिती जनतेस ।
लावी भक्तीस अभक्तास । आरती मौनीबाबाला ||२||

मौनीबाबा नाम यांचे । दिसे मज खरेच की साचे ।
भोळ्या शंकर सांबाचे । गुण ते खरे अंगी यांचे ।
अंगावरच्या वस्त्राला ।
वाहिले प्रभूच्या चरणाला ।
धारा देतील शांतीला ।
असा तो संत, तसा श्रीमंत । चरणी नत होत ।
कृष्णाकर जोडुनी पदकमला । आरती मौनीबाबाला ।।३।।



# || पुष्पांजली ||

पुष्पांजली ही तुम्हां अर्पितो मौनी गुरुराया ।
तव गुण गाण्या बुध्दी द्यावी सर्वांच्या हृदया ||धृ||
गंध, अक्षता, फुले सुवासिक, अर्पुनी तव चरणी ।
पावन करुनी घ्यावे आम्हा चुका आमच्या विसरुनी ||
तव रुप कळण्या किती कष्ट हे दिधले आम्हांसी ।
शीत उष्ण सहन करुनी अढळ धरिले शांतीसी ||
पचवुनी विषा दावी स्वरुपा नमन तुम्हां करितो ।
नानाविध बहुरुपी करणी करण्याला धजतो ||
दीनदयाळा भक्तवत्सला शरण तुम्हा आलो ।
अल्प बुद्धीने तव गुण गाण्या वर्णाया धजलो ||

सदा मस्तीने मस्त बनुनी स्वरूपा निरखुनी ।
रात्रंदिन बा रमसी गमसी भजनांच्या ध्यानीं ।।
पुष्पांजली ही तुम्हा अर्पितो मौनी गुरूराया ।
तव गुण गाण्या बुद्धी द्यावी सर्वांच्या हृदया ।।

।। भगवान रामकृष्ण मौनीबाबा की जय ।।

